


रविवार

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, १४ मे २०२३


# पुरोगामी महाराष्ट्रातील सत्तेचे महानाट्य!

आधुनिक केसरी

**पुरोगामी महाराष्ट्रातील सत्तेचे महानाट्य नऊ महिने चालले.याकडे देशाचे लक्ष लागले होते! सत्तेचा संघर्ष करताना उध्दव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याची घोडचूक केली.तीच त्यांच्या अंगलट आली.तरीही पण 'मी पुन्हा सत्तेत येईल' हे जे त्यांचे स्वप्न होते ते भंगले आहे.तसेच शिंदे समर्थक १६ आमदारांच्या अपात्रेचा प्रश्नात न्यायालयाने हस्तक्षेप करण्यास नकार दिला व तो राज्याच्या विधानसभा अध्यक्षाकडे सोपविला आहे.विशेष म्हणजे !शिंदे व फडणवीस यांची सत्ता कायम ठेवली आहे.सर्वोच्च न्यायालयाने तर तत्कालिन राज्यपालांच्या या निर्णयावर शिक्कामोर्तब केले आहे. म्हणजे !न्यायालयाने ठाकरे व महाविकास आघाडीच्या दोन महत्वपूर्ण मागण्या फेटाळल्या,आहेत हे तर स्पष्ट आहे. या निकालातून महाविकास विकास आघाडीचे 'नाक कापले' गेले,तरी छिद्र आहे'.असे झाले आहे !ते निकालातील वस्तुस्थिती लपवित आहेत.कोर्टाच्या टिप्पणीपेक्षा अंतिम निकाल हा महत्वपूर्ण असतो.ते टिप्पणीवर समाधानी आहेत.आता नेते शरद पवार व उध्दव ठाकरे यांनी 'नैतिकते' ची पाठशाळा सुरु केली आहे.**





कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850


महाराष्ट्रात २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर सत्तेचा खेळ शिवसेनेचे नेते उध्दव ठाकरे यांनी सुरु केला. कारण काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने भाजपा व शिवसेनेच्या विरोधात निवडणूक लढविली होती. त्यावेळी भाजपा व शिवसेना युती केली होती. शिवसेनेचे नेते ठाकरे यांनी पंतप्रधान मोदी व गृहमंत्री शहा यांच्या नेतृत्वखाली युतीच्या प्रचारसभेत व्यासपीठावर जाऊन काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेसच्या विरोधात मते मागितली होती.महाराष्ट्रातील जनतेनी भाजपा व सेनेच्या बाजूने कौल दिला. तेंव्हा २०१४ विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत २०१९ मध्ये भाजपा व शिवसेनेच्या संख्याबळात थोडीशी घट झाली. तरी पण भाजपाने १०५ व सेनेने ५६ जागेवर विजय मिळवत स्पष्ट बहुमत मिळविलेले होते. त्यामुळे युतीला राज्यात सत्ता स्थापनेस अडचण नव्हती. राष्ट्रवादी काँग्रेस ५४, काँग्रेसने ४४ जागा जिंकल्या. तेंव्हा जोड काँग्रेसने पराभव मान्य केला व विरोधी पक्षात बसण्याचे मान्य केले होते. पण अचानकपणे ठाकरे यांनी सत्तेसाठी 'रडीचा डाव' खेळला! भाजपा नेत्याने शिवसेनेला मुख्यमंत्रीपद देण्याचे शब्द दिलेला होता, असे म्हणत, भाजपाबरोबर सत्ता स्थापनेस नकार दिला.त्यांनी भाजपाच्या नेत्यावर विश्वासघाताचा आरोप केला. भाजपा नेते शहा व राज्याचे नेते फडणवीस यांनी ठाकरे यांना तसा शब्द दिलेला नव्हता, ते स्पष्ट केले, तरीही ठाकरे मुख्यमंत्रीपदाचा हट्ट धरुन बसले. राजकारणात बंद खोलीत झालेल्या चर्चेवर निकालापर्यत ठाकरे यांनी मौन पाळले. प्रचार दरम्यान त्यांनी या विषयावर तोंड उघडले नव्हते! त्यांना कोणत्याही परिस्थिती भाजपाशी नाते तोडावयाचे होते. त्यासाठी हे कारण शोधले! त्यातून ठाकरे यांनी भाजपाबरोबर युती तोडण्याचा निर्णय घेतला,ते मोदी आणि शहावर ते वैयक्तीक टीका करत होते ! यामुळे भाजपा -शिवसेनेत संघर्ष वाढत गेला. त्यामुळे शहा यांनी ठाकरे यांना धडा देण्याचा निर्णय घेतला असावा! फडणवीस यांनी याबाबत केंद्रातील नेत्यांकडून पाठबळ मिळत गेले. दुसरीकडे ठाकरे यांचे खास दूत संजय राऊत हे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांची गुप्त भेट घेतली व सत्तेसाठी पवार यांचेसमोर मैत्रीचा हात पुढे केला.

राजकारणात चाणक्य मानले जाणारे शरद पवार यांना तर महाराष्ट्रात भाजपा व शिवसेनेला संपवायची संधीच मिळाली. कारण राऊत यांनी शिकार आणलेली होती! पवार हे नेहमी समविचारी पक्षाने एकत्र येण्याची भाषा करतात. मग शिवसेना हा समविचारी नसताना व तो हिंदुत्ववादी पक्ष असताना त्यांचेशी तडजोड का केली ? पवारांनी सत्तेसाठी शिवसेनेशी मैत्री केली का ? तेंव्हा पवारांची नैतिकता कोठे गेली होती ? सत्तेचे हे जाळे पवार व राऊत या जोडीने टाकले.त्यात ठाकरे अलगद सापडले,त्यात ठाकरेंना आपली राजकीय शिकार होत आहे, हे आजपर्यंत कळालेले नाही! ठाकरे यांनी शिवसेनेचे पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व न ठेवता, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस सोबत जाण्याचा निर्णय घेतला ती चूक केली, असे वाटत नाही. याचे पक्षावर परिणाम होतील काय ?शिवसेनेत नाराजी वाढेल काय ? याचा विचार त्यांनी केलाच नाही. मी शिवसेनेचा पक्षाचा मालक आहे, तेंव्हा मी जो कोणताही निर्णय घेईन तो आमदारांनी मान्य केला पाहिजे. हे लोकशाहीत बसते काय ? ठाकरे हे पक्षाचे प्रमुख आहेत, ते वारसदार राजे नाहीत! त्यांनी जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींच्या भावनांचा व मताचा विचार केला नाही, ते आपला निर्णय आमदारावर लादत गेले! ठाकरे आणि पक्ष आमदारात संवाद नव्हता, या कारणामुळे सेनेत दोन गट पडले! त्यात पक्षातील आमदारांना 'गद्दार' म्हणणे, पन्नास खोके म्हणून त्यांना हिणवले गेले, हे शोभणारे नव्हते. शरद पवारांना तर महाराष्ट्रात भाजपाला सत्तेपासून रोखण्यासाठी हाच मार्ग योग्य वाटला! श्रीमती सोनिया गांधी यांची भेट घेवून त्यांचे इतर नेत्यांचे मन वळविले!त्यात ते यशस्वी झाले! पवारांनी ठाकरे यांना मुख्यमंत्री व्हावे, हे त्यांनी कानात सांगितले! ठाकरे यांनी मान्य केले. त्यांना सत्तेचा मोह आवरता आलेला नाही. पक्षाच्या बैठकीत यावर चर्चा करुन निर्णय घेतला आला असता. दुसरे शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेना काँग्रेस सोबत कधी जाणार नाही,जर गेलो तर शिवसेनेचे दुकान बंद करीन! असे वचन दिले होते! त्यांनीच महाराष्ट्रात हिंदुत्वाच्या मुद्दावर १९९५ मध्ये भाजपा व शिवसेनेची युती केली. यात युतीचा सत्तेचा फार्मुला ठरविला. ज्या पक्षाचे संख्याबळ अधिक त्यांचा मुख्यमंत्री असेन! ते तत्व भाजपा व शिवसेनेने मान्य केले. यात राज्यात पहिला सेनेला मुख्यमंत्रीपद मिळाले आणि मनोहर जोशी मुख्यमंत्री झाले. बाळासाहेब ठाकरेंचे महाराष्ट्र विधानसभेवर भगवा फडविण्याचे जे स्वप्न पूर्ण करण्यात भाजपाचा वाटा आहे. बाळासाहेबांना मुख्यमंत्री होता आले असते, पण त्यांनी सत्तेचा कधी मोह आला नाही. पण पक्षाचे सूत्रे सन्मानाने आपल्याकडे ठेवले! दुर्देवाने उध्दवजी यांचा विसर पडला. सत्तेची फळे चाखण्याचा आनंद घेतला पण तो फारकाळ टिकत नसतो, पक्षाचा किंगमेकर' राहण्याचा जो मान व सन्मान व आनंद कायम असतो. हेच ठाकरे यांना समजले नाही. पित्याने दिलेल्या शब्दाला ते जागले नाहीत! त्यांनी आपल्या शिवसेना आमदारांना विश्वासात न घेता काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस बरोबर घरोबा करणे पंसत केले. राज्यात शिवसेनेची सत्ता व मुख्यमंत्री त्यांचा असताना आमदारात नाराजी वाढत होती, सरकारात त्यांची कामे होत नव्हती. त्यात ठाकरे मुख्यमंत्री असून पक्षाच्या आमदारांना भेटत नव्हते!

करोनाच्या काळात तर ते घरी बसून राज्य चालवित होते सत्तेसाठी महाराष्ट्रातील जनतेशी व भाजपाशी त्यांनी 'गद्दारी' केली नाही काय ? ठाकरे कुटुंबात पहिल्यांदा पिता व पूत्र २८ नोव्हेबर २०१९ मध्ये सत्ताभोगी बनले आहेत. आपण लोकशाहीत आपण जनतेचा जनतेचा जनाधार अनादार करत आहोत, याची लाज पक्षाच्या वाटलेली नाही. आज पवार व ठाकरे यांना 'नैतिकते'चा धर्म आठवतो आहे! यात शरद पवारांनी सारख्या नेत्यांने 'नैतिकते'चे धडे द्यावेत! याचेच आश्चर्य वाटते! १९७८ व १९९९ मध्ये शरद पवारांनी काँग्रेस पक्षात ज्या तत्वासाठी बंड केले. नंतर ते काँग्रेस नेत्यांचे घरांचे उंबरठे झिझवत आहेत. इतका लाचारपणा दिल्ली दरबारी पहावयाला मिळला! महाविकास आघाडीचे सरकारचे दोन मंत्री जेलमध्ये गेले. तसेच पत्रकारांना,सामान्य माणसाना हातकड्या घालून जेलमध्ये टाकले गेले! तेंव्हा त्या मंत्र्यानी 'नैतिकते' आधारावर राजीनामा द्यावा, असे सांगितले गेले का नाही ? पण दोन वर्षानंतर मात्र महाविकास आघाडीला भाजपाने धक्का दिला. महाराष्ट्रात ११ जून २०२२ राज्य सभेच्या निवडणुक झाली. यात भाजपाचा ६ वा उमेदवार निवडून येणार नाही,असा दावा पक्षाचे नेते करत होते.यावेळी आघाडीचे १० मते फुटली व भाजपाचे धनंजय महाडीक विजयी झाले! यावेळी ''गद्दारा'च्या मतावर संजय राऊत हे खासदार झाले. पण त्यांनी आजपर्यंत नैतिकता आधारावर खासदाकीचा राजीनामा दिलेला नाही. त्यानंतर विधान परिषदेच्या २१ जून २००२ च्या निवडणुकीत पुन्हा महाविकास आघाडीचे मते फुटली आणि भाजपाचे प्रशांत लाड विजयी झाले, विधानपरिषदेचा निकाल लागला. इकडे शिंदें यांचे नेतृत्वाखाली आमदार सुरतला पलायन करत होते.आमदारांची संख्या वाढत गेली, तेंव्हा पक्षात बंड झाल्याचे लक्षात आले.हे बंड शिवसेनेच्या विरोधात नव्हते! तर ठाकरे नेतृत्वाच्या विरोधात होते!शिंदे आमदारांची संख्या ४२ पर्यत गेली. या बंडाचा सुगावा मात्र महाविकास आघाडीतील धुरंधर नेत्यांला लागला नाही. भाजपा नेते फडणवीस यांच्या चाणक्य नीतीमुळे खुद्द पवार घायाळ झाले! तेंव्हा ठाकरेंनी पवाराप्रमाणे पक्षात झालेले बंड शमविण्याचा शहाणपणा दाखविलेला नाही. सत्ता येते,जाते, पण पक्ष वाचला पाहिजे,याचे प्रयत्न केले गेले नाहीत. पण ठाकरेंचा अहंकार आडवा आला. यात राऊत यांनी सेनेच्या आमदारांना अर्वाच्य भाषेत शिव्या व धमक्या देण्यास सुरवात केली. त्यामुळे सेनेचे बंडखोर अधिक संतापले! शिवसेनेतील दोन गटात तणाव वाढत गेला, त्यास राऊत यांचे शिवराळ भाषा कारणीभूत ठरली पवारांच्या सूचने नुसार राऊत हे आग ओतण्याचे काम करत होते. आजही राऊतांचा रोज सकाळी भोंगा सुरुच असतो! मराठी वृत्त वाहिन्याचे पत्रकार त्यांचे घरासमोर बसून असतात की काय ? ठाकरेंनी पक्षापेक्षा सत्तेला महत्व दिले! बहुसंख्य खासदार व आमदार, अनेक कार्यकर्ते शिंदे गटात सामील होत गेले! महाविकास आघाडी सरकार अल्पमतात आले. तेंव्हा ठाकरे यांनी अविश्वास ठरावाला सामोरे जाण्याचे आव्हान दिले असते! त्यांना पराभव होवून नामुश्कीची भीती वाटत होती.यामुळे त्यांनी राजीनामा देणे पंसत केले. २९ जून २०२२ ला ठाकरेंनी तत्कालिन राज्यपाल कौश्यारी भेटून तीन ओळीत राजीनामा दिला. त्यात कारणे दिली नाहीत! त्यांनी सत्ता संघर्षाला सामोरे जाण्याचे धाडस केले नाही. त्यांनी घोडचूक होती. त्यामुळे राज्यपालांनी शिंदे व फडणवीसला दि. ३० जून २०२२ रोजी सरकार स्थापनेसाठी बोलावले तो निर्णय योग्य होता. न्यायालयाने शिंदे संवैधानिकपणे सत्तेत आले, हे मान्य केले आहे. यात भाजपाने 'जश्यास तसे ' प्रमाणे ठाकरे व पवार यांना धडा शिकविला! त्यात राज्यपाला कोठे चुकले ?! त्यानंतर विधानसभेत विश्वासदर्शक ठराव मांडला, गेला शिंदे सरकारने जिंकला! महाविकास आघाडीचा पराभव झाला! यावेळी काँग्रेस व इतर आमदार मतदानाला गैरहजर राहिले! या पक्षातही या गद्दारीवरून काँग्रेस पक्षात वाद झालेला होता. ठाकरेंच्या राजीनाम्यानंतर तीन पक्षांनी नवीन नेता निवडला नाही, अथवा पक्ष स्थापनेचा दावा केला नाही.तरी पण सर्वोच्च न्यायालयाने राज्यपालांच्या कार्यपध्दतीवर ताशेरे ओढले,आहत, हे नवीन नाही. दिल्ली आम आदमी सरकारच्या प्रकरणात सुध्दा न्यायालयाने राज्यपालाबाबत ताशेरे ओढले आहेत! राज्यपालांना राजकारणात ओढणे चुकीचे आहे!त्यात पवार, ठाकरे व त्यांचे पुत्र आदित्य यांनी न्यायालयाच्या ताशेऱ्यांच्या आधारावर राज्यपालांच्या कार्यपध्दतीवर टीका करत आहेत. भारतीय घटनेनुसार राज्यपालाची नियुक्ती होते! देशात ५५ वर्षात काँग्रेसने तर राज्यपालाचा बाहूले म्हणून वापर केला. त्यांचा सत्तेसाठी वापर केला! विरोधी पक्षाचे १३१ वेळा राज्य सरकारे बरखास्त केले ते घटनाबाह्य नव्हते काय ?! देशातील सात तत्कालिन राज्यपालांची कारकिर्द अत्यंत वादग्रस्त ठरलेली आहे! तेंव्हा पवारांनी राज्यपालांच्या विरोधात कधी तोंड उघडले नाही. काँग्रेसने आपल्या राजवटीत राज्यपालामार्फत अनेक घटनाबाह्य किस्से व इतिहास वाचावयास मिळेल!पण आता ठाकरेंना निवडणूक आयोग, राज्यपाल यंत्रणा नकोशी वाटत आहे! तसेच माजी राज्यपाल कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान केला नाही! याचा निर्वाळा न्यायालयाने दिला आहे.महाविकास आघाडीचे नेते मात्र राज्यपालपदाचा अवमान करत होते. वास्तविक महाविकास आघाडी व राज्यपालात सलोख्याचे संबंध राहावेत, यासाठी प्रयत्न झाले नाहीत, त्यामुळे महाविकास आघाडी सरकारला फटका बसला. त्यामुळे १२ आमदारांच्या नियुक्तीचा प्रश्न रेंगाळत पडला! सर्वोच्च न्यायालयाने शिंदे सरकारच्या बहुमताच्या चाचणीला स्थगिती देण्याची मागणी केली, ती न्यायालयाने फेटाळली! ठाकरे यांनी राजीनामा देण्याची घाई केल्याने महाविकास आघाडीचे नेते म्हणत सरकार कोसळण्याचे खापर ठाकरेवर फोडत आहेत. तेंव्हा मात्र हेच नेते संघर्ष करत रहा! आम्ही तुमच्या पाठिशी आहोत, अशी चिथावणी देत होते! पवार म्हणतात,'मी पुस्तकात नमुद केले आहे'! हे सामान्य माणसाला कळते! शरद पवार हे जर कायदे पंडित होते, तर त्यांनी ठाकरे यांना राजीनामा न देण्याचा सल्ला का दिलेला नाही. तेंव्हाच पवारांनी सल्ला दिला असता तर महाविकास आघाडीचे सरकार वाचले असते! पण मी आधीच सांगितले होते, असे म्हणत, सरकार कोसळण्यास ठाकरे हेच जबाबदार आहेत, हेच त्यांना सांगावयाचे आहे. ही जबाबदारी ते आपल्या अंगावर, पक्षावर घेवू इच्छित नाहीत, हे मागचे कारण आहे. माणसाच्या स्वभावाचे गुण असतो,तो घटना घडल्यानंतर मी सांगितले होते, असेच ठामपणे सांगत असतो! अशी जी शेखी मिरविण्याची सवय असते, तेच पवार करत आहेत. शिंदे गटाने आपल्याकडे संख्याबळ अधिक असल्याने निवडणूक आयोगाकडे शिवसेना पक्ष व धनुष्यबाण मिळविण्याचा दावा केला! निवडणूक आयोगाने दोन्ही बाजूनी सुनावली घेतली होती! निवडणूक आयोगाने शिंदे गटाला धनुष्यबाण चिन्ह दिले. घटनेनुसार निवडणुक आयोग संवैधानिक संस्था आहे. दहाव्या अनुसूचि 'सिम्बॉल आर्डर' परिच्छेद १५ अन्वये विधानसभा अध्यक्ष व केंद्रीय निवडणूक आयोगाला सुनावणी घेण्याचे अधिकार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. ठाकरेंनी केंद्रिय निवडणूक आयोगाच्या निकालावर आगपाखड केली. तसेच,'रखेल' अश्या अर्वाच्य शब्दाचा वापर करुन संवैधानिक संस्थेचा अवमान केला. न्यायालयाच्या निकालात पहाता,ठाकरे गटाचे प्रतोद हे अधिकृत आहेत, असे स्पष्ट केले. यात शिंदे गटाचे प्रतोद गोगावले यांनी काढलेला व्हिप अवैध असल्याचे म्हंटले.व्हिप काढण्याचा अधिकार पक्षाला असतो, गट नेत्याला नसतो. सर्वात गंभीर टिप्पणी राज्यपालांच्या कार्यपध्दतीवर केली गेली. तत्कालिन राज्यपालांनी बहुमत चाचणीसाठी ठाकरे जे पत्र दिले होते, त्यात सात कारणे दिली होती, वास्तविक त्यांना असा उताळवीणापणा करण्याची गरज नव्हती. यामुळे एका राजकीय पक्षाची बाजू घेत आहेत का, असे वाटते! निवडणूक आयोगावर ताशेरे ओढलेले आहेत. यात वैधतेची शहानिशा करण्याची आवश्यकता होती. आयोगाने निर्णय अपुऱ्या माहितीच्या आधारावर दिला. कोणताही गट मूळ पक्ष आपला असल्याचा दावा करू शकत नाही, अशी टिपणी केली केली आहे. आयोगाच्या निर्णयाच्या विरोधात ठाकरे गटाची याचिका न्यायालयात प्रलंबित आहे. आयोगाच्या त्या निकालात सुधारणा होऊ शकते.त्यामुळे शिवसेना पक्ष व चिन्हाचा निर्णय लागवयाचा आहे. यात ठाकरे यांनी पुन्हा पक्ष व चिन्ह मिळूही शकते,याची त्याचीआशा उरली आहे. पण यासाठी त्यांना चार ते पाच महिने प्रतीक्षा करावी लागणार आहे, ठाकरे यांनी राजीनामा दिल्याने न्यायालयाने पुन्हा आघाडी सरकार पुन्हा स्थापित करण्यास नकार दिला. त्यामुळे पुन्हा महाविकास आघाडी सत्तेत येईल, ही ठाकरे गटाची मागणी होती ती पूर्ण झालेली नाही. तेंव्हा न्यायालयाचा निकाल हा शिंदे शिवसेना व फडणवीस सरकारच्या बाजूने लागलेला आहे! हे मान्य करावेच लागेल. विधाससभेचे अध्यक्ष काँग्रेसचे नाना पोटोले हे होते,त्यांनी राजीनामा दिला.उपाध्यक्ष हिरवळ यांनी अपात्रेची नोटीस बजावली होती. त्यांना आमदाराना अपात्र करण्याचा अधिकार आहे काय ? महाविकास आघाडीला शिंदे समर्थक १६ आमदाराच्या अपात्रेचा निर्णय घेता आलेला नाही. आता याबाबतचा निर्णय घेण्याचा विधानसभा अध्यक्षाकडे निर्णय सोपविला आहे. या अरूणाचल प्रदेश मधील २०१४ मधील घटनेबाबत उल्लेख केला गेला. या राज्यात काँग्रेसचे बहुमत मिळाले होते! पण मुख्यमंत्री नवाब तुर्क व कालिखो पुल यांच्यात वाद झाला. यात पूल यांना पक्षातून काढण्यात आले.यातून काँग्रेसमध्ये बंडखोरी झाली. तेंव्हा विधानसभा अध्यक्ष नबाब रेबिया यांना अध्यक्षपदावरुन काढण्यात आले होते. राजकीय संघर्षातून राष्ट्रपती राजवट व नवीन सरकार अश्या घटना घडल्या! या राजकीय वादातून पूल यांनी गळफास घेवून आत्महत्या केली होती. त्यामुळे 'नबाब रेबिया' प्रकरणाचा महाराष्ट्र सत्ता संघर्षाला फायदा होणार नाही. कारण यात विधानसभा अध्यक्षावरील अविश्वास ठराव प्रलंबित असताना सोळा आमदारांना अपात्र करण्याचा अधिकार आहे काय ? याचा फेर अवलोकनासाठी हे प्रकरण ७ न्यायमूर्ती घटनापीठाकडे देण्याचा निर्णय न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे न्यायालयाने हे प्रकरण बाजूला ठेऊन युक्तीवाद करण्याचा सल्ला दिलेला होता. या प्रकरणाचा निकाल येण्यास तीन ते चार वर्षाचा कालावधी लागू शकतो.तसेच पक्ष व चिन्ह देण्याचे अधिकार निवडणूक आयोगाला आहेत, हे पण याबाबतची सुनावणी व्हायची आहे.यात न्याय मिळेल, अशी ठाकरे गटाला आशा आहे. न्यायालयाचा निकाल गोंधळात टाकणारा आहे. यात दोन्ही गट आपल्या सोयीप्रमाणे अर्थ काढत आहेत.यात न्यायालयाची टिप्पणी, संबंधित यंत्रणेला निर्देश दिले आहेत काय ? नंतर १६ आमदारांच्या अपात्र निर्णयावर वाद वाढण्याची शक्यता आहे.सत्ता संघर्षात शिंदे गट, ठाकरे गट चुकले! तत्कालिन राज्यपालांचे निर्णय चुकीचे, निवडणूक आयोग निर्णय चुकीचा,तरी मग शिंदे सरकार वाचले ? पण भविष्यात इतर राज्यात असा असा राजकीय संघर्ष टाळण्यासाठी न्यायालयाने केंद्र व राज्य सरकार,अयोगाला निर्देश दिले आहेत काय ? हे पहावे लागेल. एकंदरीत ठाकरे आणि महाविकास आघाडीचा सत्ता संघर्षात पराभव झाला आहे,हे सत्यच आहे.

# उगवतीचे रंग




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


## कोण कुणाकडे राहतंय ?

आधुनिक केसरी

प्रख्यात लेखक, कवी, गीतकार प्रवीण दवणे यांच्याकडे एकदा काही कामानिमित्त जाण्याचा प्रसंग आला होता. त्यावेळी त्यांचे आईवडील दोघेही त्यांच्याकडे राहत होते. दोघेही बरेच वयस्कर झाले होते. त्यांचे बाबा थोडं फिरण्यासाठी म्हणून बाहेर गेले होते. आई घरी होती. त्या माऊलीनेच आम्हा दोघांसाठी चहा करून आणला. मी दवणे सरांना विचारले, ' आईबाबा तुमच्याकडे राहतात ? ' त्यांनी मोठे छान उत्तर दिले. ते म्हणाले, ' विश्वासराव, मी आईबाबांकडे राहतो. ' ते असं काही म्हणतील याची मी कल्पनाच केली नव्हती. मीच जरा ओशाळलो. खरंच आपण थोडं काही करायला लागलो की स्वतःला किती मोठं समजतो ! ज्या आईबाबांनी आपल्याला लहानाचं मोठं केलं, त्यांनाच आपण म्हणतो की ते माझ्याकडे राहतात. खरं म्हणजे आपण उलट म्हणायला हवं. दवणे सर जेव्हा म्हणाले ना की मी आईबाबांकडे राहतो, तेव्हा वाटलं खरंच किती छान आहे नाही असं म्हणणं ! आपण जोपर्यंत लहान असतो तोवर कसली काळजी ? आईबाबा असतात ना. त्यांच्या छत्रछायेखाली खुशाल राहावं. भलेही ते आता काही करू शकत नसतील. पण त्यांचे आशीर्वाद तर सदैव असतात ना सोबत !
आपण सारखं माझं माझं करत असतो. पण खरं तर आपलं असं काय असतं ? गोंदवलेकर महाराज आपल्या प्रवचनात एका ठिकाणी म्हणतात, ' आपली रामावर खरी भक्ती असेल तर आपण ज्या घरात राहतो, ते घर रामाचे आहे असे म्हणावे. मी रामाच्या घरात राहतो आहे अशी भावना असू द्यावी. ' एकदा आपल्या मनात ही भावना दृढ झाली की मी राहतो ते घर माझ्या आईवडिलांचे आहे, रामाचे आहे आणि मी सुद्धा त्यांचा आहे की मग अहंकाराला थारा उरतोच कुठे ! एकदा का हे घर त्यांचे आहे असे म्हटले की मग आपण त्यांना जसे आवडते तसेच वागू. त्यांना घरामध्ये वाईट गोष्टी आलेल्या आवडणार नाहीत अशी आपली पक्की भावना झाली की मग आपणच त्या वाईट गोष्टींपासून दूर राहू. घरामध्ये चांगल्याच गोष्टी होतील. अनीतीचा, भ्रष्टाचाराचा पैसा येणार नाही.



# आनंदी पहाट



## सकारात्मक पालकत्व गरजेचे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

लहान मुलांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी पालकत्वामध्ये तीन आवश्यक घटक असतात. प्रथम, काळजी मुलांना हानीपासून वाचवते. काळजीमध्ये भावनिक तसेच शारीरिक आरोग्याचाही समावेश होतो. दुसरे म्हणजे, नियंत्रणामध्ये मुलांची आणि इतरांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी सीमा निश्चित करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे क्रियाकलापांच्या सतत विस्तारित क्षेत्रांमध्ये समाविष्ट असते. मुलांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी पालकत्वाचे प्रमुख चार प्रकार दिसून येतात. आज बाल मानसशास्त्रात वापरल्या जाणाऱ्या चार मुख्य पालक शैली म्हणजे परवानगी देणाऱ्या, अधिकृत, दुर्लक्षित आणि हुकूमशाही ह्या होत. चांगल्या पालकत्वामध्ये मोठ्या प्रमाणात सातत्य आणि दिनचर्या यांचा समावेश होतो, ज्यामुळे मुलांना नियंत्रणाची भावना मिळते; म्हणजे अपेक्षा, शिस्त आणि लवचिकता निर्माण करण्याच्या रणनीती आणि मुलांचे विकासाचे वय यांच्याबाबतीत अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी मुलांचे सामाजिकीकरण करणे हे चांगले पालकत्वाचे उद्दिष्ट आहे. सदोष पालकत्व तेव्हा घडते, जेव्हा पालक त्यांच्या मुलांच्या सर्वोत्तम हितापेक्षा त्यांच्या स्वतःच्या आवडींना प्राधान्य देतात. काही पालक असे निर्णय घेतात, कि जे त्यांच्या मुलांच्या हिताचे नसतात. याचा अर्थ असा नाही की, चांगले पालक होण्यासाठी तुम्ही तुमच्या मुलाच्या गरजा नेहमी तुमच्यापेक्षा जास्त ठेवाव्यात. पालक म्हणून, तुम्ही तुमच्या मुलाच्या मूलभूत मूल्यांवर, जसे की धार्मिक मूल्ये आणि त्यांच्या भविष्याशी संबंधित समस्या, जसे की शैक्षणिक निवडींवर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करत असता. तुमचे तुमच्या मुलाशी असलेले नाते जितके मजबूत असेल तितका तुमचा प्रभाव जास्त असेल, कारण तुमचे मूल तुमचे मार्गदर्शन घेईल आणितुमच्या मताची आणि समर्थनाची कदर करेल.

## जपलं तर वाढेल....

आधुनिक केसरी

जपलं तर वाढेल रोप... जपलं तर टिकेल नातं... जपलं तर राहील घर... जपले तर टिकतील संस्कार... मूल्य जपली तर देशाचा विकास होईल. म्हणजे जपण्याला किती महत्त्व आहे. प्रत्येक गोष्ट जपून ठेवली तर ती टिकेल, वाढेल, रुचेल, पचेल, राहील. जसे आपण वस्तूला जपतो तसेच नात्यालाही जपलं पाहिजे. नात्याला हळुवारपणे प्रेमाने जपले तर ते अखंड राहील. आठवणी जशा आपण कडू गोड दोन्हीही जपत असतो. कडू आठवणीने डोळ्यात पाणी येते तर गोड आठवणीने चेहरा खुलतो. चेहऱ्यावर हास्य फुलते. तेव्हा गोड आठवणीच जपल्या पाहिजे. जसे की माणूस आहे तोवर काही किंमत नसते. पण माणूस गेल्यानंतर त्याच्या सगळ्या चांगल्या आठवणी येतात. त्याच्या कर्तुत्वाची किंमत तो गेल्यानंतरच कळते. तोपर्यंत पिकते तिथे विकत नाही.
असंच आपल्या मुलांना जपलं पाहिजे. त्यांचं बालपण, त्यांचे आरोग्य, त्यांचा आनंद, त्यांच्या बाललीला, त्यांच्या कलाकृती सगळंच कसं जपलं पाहिजे. खास करून मुलांचे बालपण आणि त्यांचे मानसिक आरोग्य जास्त जपावे.
त्याचवेळी आपलं त्यांच्याकडे बारीक लक्ष असावं. आईला मुलांचा चेहरा वाचता आला पाहिजे. नातं निरामय भावनेने जपावं. ज्ञानेश्वर माऊलीने मुक्ताईला जपले तसे. सागरासारखं मुलांना अथांग राहायला शिकावं .भरतीचा गर्व नाही, ओहोटीची लाज नाही. आयुष्यात हजारो सुखदुःखाच्या पायऱ्या असतात. प्रत्येक पायरीवर यश मिळेलच असं नाही. पण प्रत्येक पायरी चढलीच पाहिजे. तेच आपले यश आहे. जसे की चावीने कुलूप उघडते व बंद सुद्धा होते. तसेच शब्दाने तोंड बंदही होते. तर कधी मनमोकळेही होते. एखाद्या वस्तूला आपली नजर ठरवत असते ती कशी आहे ? कोणाला तीच वस्तू खूप उपयोगी वाटते, तर कोणाला निरोपयोगी. वाचण्यासाठी पेपर असतो, भजेवाल्यांसाठी तो रद्दी असतो. जपला तर पेपर, फेकला तर रद्दी. आपल्याला मुलांना जपायचं आहे .उद्याचे सुजान नागरिक घडवायचे आहे. मानवतेचा सागर होऊन.....

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515
भाग-73

## शेतकऱ्याचा घोडा

आधुनिक केसरी


असं करता करता कोरडी विहीर बरीचं भरली आणि कठडा जवळ येताचं तो घोडा तो कठडा ओलांडून बाहेर आला.... आयुष्यात वेगळे तरी काय होतं ??? आपण खड्यात पडलो तर, आपणास काढायला कोणीतरी एकचं येते पण आपल्यासाठी खड्डे खणणारे आणि खड्यात पडल्यावर माती लोटणारे आपल्याला गाडण्याचा प्रयत्न करणारे बरेचं भेटतात. म्हणून स्वतःवर नेहमी विश्वास ठेवा ....आपले डोके नेहमी शांत ठेवा समस्या कीतीही मोठी असो....शांत मनाने ती हाताळा.... खड्ड्यात,पडलो आणि कोणी पाडलं ह्या बद्द्ल दुखः करण्यापेक्षा,त्यातून बाहेर कसे पडायचे हा विचार करा.... झटका ती माती आणि त्या मातीची एक एक पायरी करत... हळूहळू यश प्राप्ती करीता वर या.
मस्त रहा,आनंदी जगा....हेच जीवनाचे सार आहे.



## सत्समागम हा सर्व साधनांचा राजा !

आधुनिक केसरी

मनुष्यजन्माला येणे, संतांची भेट होणे, आणि त्यांना ओळखून त्यांचा सहवास होणे, या तिन्ही गोष्टी फार दुर्घट आहेत. म्हणूनच संतसमागमासारखा लाभ नाही असे म्हणतात. सत्समागम म्हणजे सर्व साधनांचा राजा होय. काही मागण्याची इच्छाच संत नष्ट करतात, मग मिळवायचे कुठे राहते ? संत बनणे व्यावहारिक दृष्ट्या काही सुखाचे नसते. एखाद्या स्नानसंध्याशील आणि सदाचरणी माणसाच्या अंगावर तेज दिसते, कारण देहाला धरून झालेल्या कर्माचे ते तेज असते; पण एखाद्या सत्पुरुषाच्या देहावर बाहेर तसे तेज दिसणारही नाही. आत वावरणाऱ्या भगवंताच्या ज्ञानाला योग्य असा सत्पुरुषाचा देह असतो. देहाच्या आधाराने भोगण्याची या जगामधली जी सुखे आहेत, त्यांचे मार्ग सत्पुरुषापेक्षा आपण प्रापंचिक लोक जास्त जाणतो, परंतु देहाच्या पलीकडे असणारे आणि कायमचे टिकणारे, आणि देहाला विसरून आणि देवाला स्मरून जे मिळवायचे, असे भगवंताचे सुख आहे. ते प्राप्त होण्याचा मार्ग समजावून घेण्यासाठी



आपण सत्पुरुषाकडे गेले पाहिजे. विषय तृप्तीसाठी जावे आणि निर्विषय होऊन यावे. हा संतसंगतीचा परिणाम. असा जो असेल तोच संत, नव्हे प्रत्यक्ष भगवंत होय. अशांची संगती केव्हा होईल ही तळमळ असावी. संत आपल्याला सत्यस्वरूपाची ओळख करून देतात. सत्पुरुषाने आखून दिलेल्या मार्गाने कायावाचामनाने जे कर्म केले जाते ते पौरुषच होय. आगगाडीत बसणारी सर्व माणसे, मग ती कोणत्याही क्लासमध्ये बसणारी असोत, इतकेच नव्हे तर बिनतिकिटाची माणसेदेखील, गाडीबरोबर सरळ म्हणजे शेवटच्या स्टेशनापर्यंत जाऊन पोहोचतात; त्याचप्रमाणे संतांची संगत करणारी सर्व माणसे भगवंतापर्यंत पोहोचतात. त्यांच्यामधली बिनतिकिटाची, म्हणजे दुष्ट, पापी, दुराचारी, त्याज्य, आणि अयोग्य, अशी माणसेसुद्धा तरून जातात; मात्र कोणीही गाडी तेवढी सोडता कामा नये. हाच सत्संगतीचा महिमा. परमार्थ साधण्यासाठी सत्संगती फार उपयोगी पडते. ही संगती तीन प्रकारची असते : एक, संताचा प्रत्यक्ष देहामध्ये सहवास; दोन, संताने सांगितलेल्या मंत्राचा सहवास; आणि तीन, संताच्या विचारांची संगत. संगतीचा परिणाम नकळत होतो, म्हणून सत्संगती धरावी. आपण ज्याकरिता जन्माला आलो ते कारण फक्त संतच उमगले; म्हणून त्यांना शरण जावे. संत स्वतः समाधान मिळवून ते दुसऱ्याला देतात, हे त्यांचे आपल्यावर केवढे उपकार आहेत !
**संतांजवळ जे समाधाम असते ते आपल्याला लाभले , म्हणजे संताची प्रचीती आली असे समजावे .**

## निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

प्राप्तव्यमिति तत् तत्र
नैवावशिष्यते पुनः ।
सफलं हर्षदं सर्वं
संजायते न संशयः ॥5 ॥
प्राप्तव्य असे ते तेथे
पुन्हा उरतच नाही. सर्व काही सफल
आणि मोदप्रद होते,
यात संशय नाही.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**वह अन्धे जग जीव हैं, बिना ज्ञान कर कर्म ।
कर्म में करता बन्धिया, बन्धन भी निष्कर्म
।।३६।। (स्वर्वेद चतुर्थ मण्डल प्रथम अध्याय) ०४/०१/३६ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :** ते संसारी जीव अंध आहेत, जे ज्ञान-हीन होऊन कर्म करतात. अज्ञानमय कर्मबंधनात जीव बांधला गेला आहे. प्रकृतीशी असंग झाल्यावर कर्म आणि बंधन दोन्ही रहात नाही. अज्ञानामुळेच कर्म आणि बंधन जीवात्म्याला प्राप्त होतात.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.**

## सुक्ष्म आशंकानिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

ब्रम्हज्ञानी पुरूषाला सर्वत्र ब्रम्हस्वरूपचं दिसतं हे आपण अभ्यासलं आहे. त्याशिवाय त्याला दुसरं काही दिसत नाही. अज्ञानी पुरूषाला मात्र त्याच ब्रम्हस्वरूपामध्ये द्रुष्य जगाची अनुभूती येते. ब्रम्हस्वरूपामध्ये असे कोणतेही गुणधर्म नाहीत की ज्या ब्रम्हाच्या जोरावर त्याला ब्रम्हाची प्रचिती येईल. अशा वेगवेगळ्या स्थितीत पण विरूध्द दिसणारे ब्रम्ह कसे दिसते. याचा आपण आता विचार करू. ज्ञानी पुरूषाचा अनुभव खरा आहे. वेदांतामध्ये यास "अजातवाद"असे म्हणतात हे आपण पाहिले आहे. अजातवाद हा वाद नाही तर तो ब्रम्हज्ञानी पुरूषाचा परमश्रेष्ठ अनुभव आहे. या बाजूने विचार केला तर हे जगचं निर्माण झाले नाही. तत्वद्रुयष्ट्या हे मान्य करून देखील अज्ञानी पुरूषाचा जगाबद्दलचा अनुभव व त्यानुसार नाकारता येत नाही. अज्ञानी माणूस इंद्रियाच्या द्वारे आपली बुध्दी चालवतो. आणि जगातील घटनांचा अर्थ लावतो.संपूर्ण मानव जातीचा विचार केला तर त्यांच्या मनाची व इंद्रियांची रचना सारखीच असते. म्हणून प्रत्येकाचे ज्ञान अज्ञान सारखे चं असते. खरं तर प्रत्येक प्राण्यात अज्ञान असते त्याच्या बुद्धी चा वकूब सारखाच आसतो.

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

अन्यायोपार्जितं वित्तं दश वर्षाणि तिष्ठति ।
प्राप्ते चैकादशे वर्षे समूलं च विनश्यति ॥
स्पष्टीकरण - अन्यायाने, अनीतीने धन मिळवू नये. ते फार काळ टिकत नाही. जेवढा काळ टिकते तेवढया काळातही मनाला शांती देत नाही. सतत कसली तरी भीती, कसली तरी अस्वस्थता जाणवत राहते. शेवटी द्रव्य तर जातेच; पण पाप मात्र आपल्या माथी कायमचे बसते. त्या धनामुळे जडलेली व्यसनेही सुटत नाहीत. एतावता सगळा अधःपात !

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

रविवार, १४ मे २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२४७
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●SUNDAY 14 MAY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-247 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-5

# आईसाठी विहीर खोदणाऱ्या प्रणवच्या कामगिरीला सलाम

## आधुनिक केसरी मातृदिन विशेष

आधुनिक केसरी न्यूज

**बाळासाहेब जोगदंड**

**छत्रपती संभाजीनगर :** आदिवासी पाड्यावर राहणाऱ्या कुमार प्रणव रमेश सालकर या इयत्ता नववीत शिकणाऱ्या मुलाने दिवसभर शेतात राबणाऱ्या आपल्या आईला दूरवरून पाणी आणावे लागते हे बघून त्याचे मन अस्वस्थ झाले. म्हणून या उन्हाळ्याच्या सुट्टीत सलग पाच सहा दिवस स्वतःच कष्ट करीत आपल्या झोपडीच्या दारातच जवळपास 20 फूट खोल विहिर खोदून आईला एक आगळीवेगळी भेट दिली. यानिमित्ताने आई आणि मुलाचे एक घट्ट नाते पुन्हा उलगडले. सद्यस्थितीत नात्याच्या विविध कंगो-यांना ग्रहण लागलेले असताना ही घडलेली गोष्ट सर्वत्र चर्चिली गेली. आणि मातृदिनानिमित्त ही कौतुकास्पद जिद्द मात्र समाजाला आदर्शवत ठरली आहे असेच म्हणावे लागेल. जगभरात दरवर्षी मे महिन्याचा दुसरा रविवार मातृदिन म्हणून साजरा केला जातो. यादिवशी माय,आई, मम्मी आणि तिच्या अनेक रुपांचे स्मरण केले जाते. आई कुटुंबांवर प्रचंड प्रेम करते. तिचे कुटुंबासाठी झिजणे सर्वश्रुत आहे. तिचे राबणे कोणत्याही व्याख्येत बसत नाही. परंतु आईला दूर अंतरावरून पाणी आणावे लागते हे सहन न होऊन पालघर तालुक्यातील केळवे धावंगे पाडा येथील प्रणव रमेश सालकर या चौदा वर्षाच्या नववीत शिकणा-या मुलाने स्वतःच्या अंगमेहनतीने घराच्या समोरच विहिर खणल्याचे वृत्त वाचले आणि मन क्षणभर अस्वस्थ झाले. आईपणाच्या असंख्य वेदना जाणून प्रणवने केलेले हे कार्य कितीदा तरी सद्यस्थितीत विचार करण्यास भाग पाडते. आईची माया आणि तिचा संघर्ष ज्यांनी जाणून घेतला ते जीवनात यशस्वी झाले. परंतु अलीकडे आई वडीलांना घराबाहेर काढणारी मुले बघितली की अंगावर काटा उभा राहतो. आणि मग वृद्धाश्रमांची संख्या का वाढणार नाही? हा प्रश्न डोळ्यात खोलवर बोटे घालून जातो. जेव्हा अपवादात्मक अशा समाज आदर्शवत घटना घडून जातात., तेव्हा त्याचे कौतुक व्हायलाच पाहिजे. प्रचंड अंगमेहनत घेऊन जेमतेम चौदा वर्षाचा मुलगा आईच्या संघर्षाला जाणून घेत आपल्या झोपडीसमोर 20 फूट विहिर खोदतो, याप्रसंगी विहिरीला छान गोड पाणी लागलेले बघून आईच्या डोळ्यात आलेले आनंदाश्रू त्याला जगण्याचे बळ देतात ही बाब कितीतरी अभिमानास्पद म्हणावी लागेल. आजचा मातृदिन साजरा करताना फक्त मदर्स डे चीच आवश्यकता कशाला पाहिजे हा प्रश्न यानिमित्ताने पडत असताना प्रणव याच्या क्षमतेचे, विचाराचे आणि आईच्या जिवलग प्रेमापोटी त्याने केलेला हा आगळावेगळा पराक्रम समाजाने निश्चितच नोंद घेण्यासारखा आहे. आजच्या मातृदिनानिमित्ताने प्रणवच्या जिद्दीला सलाम आणि त्याच्या आईला मनःपूर्वक शुभेच्छा..!



**आईच्या स्वप्नासाठी** : प्रणवने आईला रोज दूरवरून पाणी आणावे लागते हे बघून स्वतः अपार कष्ट करीत विहिर खोदली .मनात ठरवले की आयुष्यात यश आणि मार्ग मिळतो . कठीण परिस्थितीत कष्टाचा स्वीकारलेला मार्ग प्रणव कधीच सोडणार नाही . कष्ट करून जग जिंकता येते त्यासाठी फक्त आत्मविश्वास हवा हेच प्रणवने आईच्या स्वप्नांसाठी करून दाखविले हे मात्र नोंद घेण्यासारखे आहे . त्याच्या उत्तुंग प्रतिभेस आधुनिक केसरीचा त्रिवार सलाम..!

### विधानसभा निवडणुकीच्या निकालात

# कर्नाटकात काँग्रेसच

आधुनिक केसरी न्यूज

**बंगळुरू : कर्नाटक विधानसबा निवडणुकीचा निकालात काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. रात्री उशीरापर्यंत हाती आलेल्या निकालानुसार काँग्रेस आता कर्नाटकात बहुमताचे सरकार स्थापन करेल. कानडी जनतेने भाजपा आणि जेडीएसऐवजी काँग्रेसच्या बाजूने कौल दिला आहे. काँग्रेस कर्नाटकात १३६ जागांवर आघाडीवर आहे. तर भाजपाला केवळ त्याच्या निम्म्या जागांवर आघाडी मिळाली आहे. कर्नाटकमधल्या जनतेने सत्ताधारी भाजपाच्या अनेक आमदारांना आणि मंत्र्यांना यावेळी पसंती दर्शवली नाही. आतापर्यंत हाती आलेल्या निकालानुसार बसवराज बोम्मई यांच्या सरकारमधील तब्बल १३ आमदारांचा पराभव निश्चित आहे.**

काँग्रेस आणि भाजपसाठी कर्नाटकची निवडणूक अतिशय महत्त्वाची होती. २०२४ लोकसभा निवडणुकीपूर्वी कर्नाटकमध्ये कोणाची सत्ता येणार? यावरून निवडणूक चर्चेत होती. या पराभवाने भाजपच्या मिशन दक्षिणला जोरदार झटका बसला आहे. दक्षिणेत भाजपची फक्त कर्नाटकमध्येच सत्ता होती. या पराभवामुळे ते राज्यही भाजपच्या हातून निसटले आहे. या वर्षी तेलंगणमध्ये विधानसभा निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी भाजपने जोरदार तयारी केली आहे. पण कर्नाटमधील पराभवाने भाजपला मोठा झटका बसला आहे. देशात अनेक राज्यांमध्ये भाजपचे सरकार आहे. पण दक्षिणेत मात्र भाजपचा हा विजय रथ येऊन थांबतो. कर्नाटक असे राज्य होते जे जिंकून भाजप अधिक शक्तीने तेलंगण निवडणुकीच्या मैदानात उतरली असती. तेलंगणमध्ये यावेळी सामना केसीआर यांच्या बीआरएसशी आहे. पण कर्नाटकमध्ये काँग्रेसचा विजय झाल्याने भाजपच्या पुढील वाटचालीला मोठा झटका बसला आहे. या वर्षी ४ राज्यांच्या विधानसभा निवडणुका होणार आहेत. कर्नाटकमधील पराभवानंतर काँग्रेसला भाजवर निशाणा साधल्याची संधी मिळाली आहे.






# कार्यकर्ता हाच संघटनेचा आत्मा, मी पालकत्व घेतो : अतुल सावे

आधुनिक केसरी न्यूज



**परभणी :** प्रदेश भाजपाचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी महाविजय 2024 लक्ष्य ठेवुन संघटनात्मक क्रियामान, क्रियाशिलता प्रचंड वाढवली असुन कार्यकर्त्यांच्या मनात उत्साह निर्माण होताना दिसतो. राज्यातील मंत्र्यांवर लोकसभा प्रभारीची जबाबदारी टाकल्यानंतर अवघ्या बारा तासात राज्याचे सहकार मंत्री अतुल सावेंनी परभणीत येवुन संघटनात्मक बैठक घेतली. कार्यकर्ता हा खऱ्या अर्थाने संघटनेचा आत्मा असुन काम करत असताना केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना सामान्य जनतेच्या दरवाजात जावुन सांगितले तर आपण करत असलेला सेवाभाव लोकांच्या मनात बसल्याशिवाय रहात नसल्याचा विश्वास सावे यांनी बुथ कमिटीच्या बैठकीत बोलुन दाखवला.एवढेच नाही तर परभणी जिल्ह्याचे संघटनात्मक पालकत्व स्विकारल्याचं त्यांनी जाहिर केले. राज्यातील मंत्र्यांवर संघटनात्मक लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर जिल्ह्याची जबाबदारी दिल्यानंतर अवघ्या बारा तासात परभणी जिल्ह्यासाठी नियुक्त केलेले मंत्री अतुल सावेंनी शहरात येवुन आयमे हॉलमध्ये बुथ तथा शक्ती स्तरावरील कार्यकर्त्यांची बैठक घेतली. यावेळी व्यासपीठावर जिल्हाध्यक्ष डॉ.सुभाष कदम, जेष्ठ नेते वरपुडकर मामा, आनंद भरवसे, प्रमोद वाकोडकर, माजी जिल्हाध्यक्ष जबदाडे मामा, श्री जामगे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. महानगर आढावा बैठकीत बुथ आणि शक्तीस्तरावरील कामकाजाचा सविस्तर आढावा घेतल्यानंतर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना मंत्री सावे म्हणाले, गुजरातमध्ये आपल्याला यश मिळण्यामागचं कारण तिथे संघटनात्मक काम मजबुत असुन बुथ आणि शक्ती स्तरावर काम करणारे कार्यकर्ते कठोर परिश्रम घेतात. हा दाखला देताना त्यांनी कार्यकर्ता हाच खऱ्या अर्थाने संघटनेचा आत्मा असतो. केंद्र आणि राज्य सरकारने सामान्य जनतेसाठी घेतलेल्या निर्णयाची माहिती आपण लोकांच्या दारात जावुन सांगितली पाहिजे. शिंदे-फडणवीस सरकारने राज्यात अवघ्या नऊ महिन्यात अनेक महत्वाची प्रश्न मार्गी लावली असुन शेतकरी, कष्टकरी, ओबीसी, धनगर, लिंगायत तथा महिलांच्यासाठी अर्थसंकल्पात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दुरदृष्टी ठेवुन घेतलेले निर्णय सर्वांग विकासाचे आहेत. काम करताना कार्यकर्ता सक्षम असायला हवा. त्याच्या पाठीमागे आम्ही खंबीरपणे उभा राहु हे सांगताना आगामी काळात परभणी जिल्ह्यातील सत्तास्थाने भारतीय जनता पार्टीच्या ताब्यात घेण्यासाठी कामाला लागण्याचे आवाहन त्यांनी केले. परभणी लोकसभा निवडणुकीत कार्यकर्त्यांच्या बळावर आपण विजय मिळवु यात शंका नाही. कारण सामान्य जनतेचा विश्वास खऱ्या अर्थाने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर असुन त्यांनी राबवलेल्या योजना सकारात्मक लोकांना सांगण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेण्याचे आवाहन त्यांनी केले.


# साहित्य कूस बदलते तेव्हा...



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्रे
संपर्क क्र. ७५८८४२४२५४


आधुनिक केसरी

**समाज आणि साहित्याचा संबंध सर्वज्ञात असला तरी समाज बदलला की साहित्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो, किंवा साहित्याने यथावकाश समाजाची मनोभूमिका तयार केल्यामुळे समाज बदलतो, हा साहित्य क्षेत्रात वावरणाऱ्या मंडळींचा आस्थेचा प्रश्न अजूनही अनुत्तरीत आहे. अगदी अंडा आधी की कोंबडी आधी या प्रश्नासारखा. पण सर्वसामान्य वाचकांच्या दृष्टीने साहित्य आस्थेचा विषय झाला पाहिजे यासाठी संस्कृतीचे भरण करून सभ्यतांचे पोषण करणाऱ्या साहित्यप्रेमींवर अलीकडच्या काळात मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. त्याचे कारण आज पूर्ण मानवता एका विशिष्ट संक्रमनावस्थेतून जात आहे.**



## क्षितिजापल्याड

समाजातील उत्पादन साधनांत बदल झाल्यास समाज बदलतो, अशी डाव्या विचारसरणीची मांडणी आहे, तर मानसिकतेतील बदल पहिल्यांदा होतो आणि त्याचे पर्यावसान साधनांत होते ही सर्वसामान्य पारंपरिक धारणा. कशाचा कशावरही प्रभाव पडो, पण समाजात बदल होतो हे नक्की. हा झालेला बदल पहिल्यांदा स्पष्टपणे जाणवतो तो साहित्यातूनच. साहित्यिकांकडे काही अलौकिक वगैरे शक्ती असते किंवा अंगात आल्यावर देहभान हरवल्याप्रमाणे काही अवस्था होते, असे नाही तर सामान्य माणसाप्रमाणेच साहित्यिक विचार करतो. झालेच तर जास्तीचा विचार करतो असे म्हणावे लागेल. या जास्तीच्या विचारांतून समाजबदल विषयक निश्चित अशा सूत्रांपर्यंत तो पोहचतो. हे सूत्र त्यास समाजातील चालू घडामोडीतून मिळत असले तरी आपल्या अतिरिक्त विचारशक्तीतून तो भविष्याचा वेध घेण्याइतपत झेप घेतो हे निश्चित. त्यामुळे या अर्थाने तो सामान्य माणसापेक्षा वेगळा असतो तर जी काही साधनसामग्री जमवायची ती याच सामान्य व्यवहारातून मिळवायची आणि निरीक्षणे आपल्या दृष्टिकोनातून रंगवायची, या अर्थाने तो सामान्य माणूसच ठरतो. छत्रपती संभाजी महाराजांना फक्त स्वराज्य संरक्षक म्हणून रंगवायचे की फक्त धर्मवीर म्हणून विश्लेषण करायचे की स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती म्हणून व्यापक दृष्टीने चित्रित करायचे हे त्या त्या साहित्यिकावरील संस्काराचा भाग असेल. छत्रपती संभाजी महाराजांचे फक्त एक उदाहरण घेतले अशी असंख्य बाबतीत उदाहरणे देता येतील. मुळात साहित्य निर्मिती हा अगोचर राजकारणाचा भाग असते. शंभरेक वर्षांपूर्वी जग डाव्या विचारसरणीकडे झुकत होते तेव्हा या पद्धतीच्या विश्लेषणाच्या साहित्याची जगभरात भरमार होती. आज केवळ भारतच नव्हे संपूर्ण जग हळूहळू उजव्या विचारांकडे झुकत असताना साहित्यही त्याच पद्धतीने बाहेर येत आहे. राजकारण विरहित साहित्य ही दुर्मीळ बाब असते. या पार्श्वभूमीवर साहित्यिकांची जबाबदारी मोठी आहे. प्रवाहासोबत पोहत जाणे चूक असेल बरोबर असेल ते काळ ठरवेल, पण सामान्य माणसाच्या दृष्टीने ते नैसर्गिक आहे. साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून केवळ प्रावाहिक विचारांचे विश्लेषण करण्यापेक्षा सत्य, शिव आणि सुंदर या त्रिगुणात्मक सूत्राचा उहापोह कसा होईल आणि समाज अधिकाधिक गुणात्मक दृष्ट्या कसा विकसित होईल याकडे लक्ष वेधले पाहिजे. वर्तमान परिस्थितीवर भाष्य करून भविष्याचा अचूक वेध हे साहित्याचे धोरण मानव्यता प्रगल्भ करणारे ठरेल. टाळ्या मिळवणारे साहित्य हे फक्त टाळ्याच मिळवू शकते, त्याकडून समाजबदलाची अपेक्षा करणे चूक ठरेल. कारण समोर बसलेल्या लोकांच्या भावनेला तुम्ही साद घालत असता आणि भावना अत्यंत तकलादू असतात. महाराष्ट्रात काही फर्डे वक्ते होऊन गेले व आजही आहेत. व्याख्यान खूप चांगले असते, पण तास दीड तास ऐकल्यानंतर एखाद्या श्रोत्यास विचारावे की वक्त्याने इतका वेळ व्याख्यान दिले, ते काय म्हणाले. ऐकायला सुश्राव्य पण सांगण्यासारखे काहीच नसणे ही जर आमच्या वैचारिक भरणपोषणाची परिस्थिती असेल तर समाज सुधारणार नाही. म्हणून साहित्याने जे म्हणायचे असेल ते अत्यंत स्पष्टपणे म्हटले पाहिजे. संकेत, अस्पष्टता, विक्रोक्ती वगैरे वगैरे हे छुपे राजकारण झाले. आपण जे काही लिहितो ते केवळ समाजातील माणसांसाठी लिहीत असू आणि हा माणूस समजण्याच्या पातळीवर सामान्य आहे अशी आपली खात्री आहे तर मग त्याला स्पष्टपणे जेवढे समजते, ते लिहिले पाहिजे. साहित्याच्या बाबतीत आणखी दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. पहिली म्हणजे पुस्तक प्रकाशित करण्यासंदर्भात येणाऱ्या अडचणी. आज मोबाईलवर सर्व काही उपलब्ध असताना आपले पुस्तक वाचकाने वाचावे असे जर आपणास वाटत असेल तर तो दर्जा टिकवून ठेवलाच पाहिजे. विशेषतः कवितेच्या संदर्भात कवी म्हणवून घेणाऱ्यांनी नावीन्य काय याकडे लक्ष दिले पाहिजे. वापरून वापरून



गुळगुळीत झालेल्या प्रतिमा, प्रतीके, उपमा वगैरे त्याज्य मानल्या पाहिजेत. काव्याचा इतिहास माहीत नाही, काव्यशास्त्र माहीत नाही, ग्येयता कशासोबत खातात याचे भान नाही आणि तरीही आपण कविता बिविता करतो हे म्हणजे फारच झालं. अभ्यासाशिवाय प्रकट होणे म्हणजे स्वतःची नाचक्की करवून घेणे होय. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे साहित्य संमेलनाची. छोटी छोटी साहित्य संमेलने गाव, वाडी, वस्त्यांवर भरवली गेली तर साहित्य सर्वदूर जाईल. केवळ मौजमजा करायला सरकारी निधीतून अखिल भारतीय साहित्य संमेलनाला किंवा अलीकडे विश्व मराठी साहित्य संमेलनालाच मी जात असतो असा हटवादीपणा आपल्या साहित्यास मारक ठरतो. संत नामदेव पंजाबपर्यंत गेले होते, आपण किमान महाराष्ट्रातील गावापर्यंत तरी गेले पाहिजे. विद्यापीठीय शिक्षणाचा अभिनिवेष आपल्यातून जोपर्यंत जात नाही तोपर्यंत आपण माणसात मिसळू शकणार नाही. आज कित्येक साहित्यिक अगोदर मानधन ठरवतात आणि जेवढे पैसे मिळतील तेवढ्याच अवरेजने आपले साहित्य सादर करतात, ही विलक्षण गोष्ट होय. संमेलन जिल्ह्याच्या ठिकाणी पाहिजे, राहायला सुसज्ज व्यवस्था पाहिजे. एवढेच नव्हे संडासात कमोडच पाहिजे अन्यतः दुसरीकडे व्यवस्था करावी लागते. अशा मंडळीकडून काय डोंबलं साहित्यातून क्रांती वगैरे होणार काय माहित. आम्ही इतिहास विसरलो म्हणून असे गंडारल्यासारखे वागत आहोत. संतांचा इतिहास आम्हास माहीत नाही, माहीत असला तरी केवळ आपल्या चैनीखातर त्याकडे हेतूतः दुर्लक्ष करत आहोत.खरेच जर साहित्याला चांगले दिवस यावेत असे वाटत असेल तर आपल्यात बदल करून घेतल्याशिवाय पर्याय नाही. साहित्यातील राजकारणाला सकारात्मक वळण देऊन टाळ्या मिळविण्यापेक्षा मानव्यता उज्ज्वल होईल, असे काहितरी लिहू या, चला माणूस घडवू या.

**(लेखक गोदावरी कॉलेज अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# तेथे कर माझे जुळती



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

आधुनिक केसरी

**आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो असं आपल्यापैकी खूप जणांना वाटतं. मात्र, वाटणं आणि प्रत्यक्षात कृती करणे हे तितकं सोपं नाही. समाजाचे ऋण हे शब्द सोपे असले तरी, ते ऋण चुकतं करायला मनाचा मोठेपणा लागतो. दुसऱ्याठी आपल्या परीने जेवढे जमेल तेवढे काहितरी तरी करावे अशी जिद्द लागते हे नाकारता येणार नाही, असंच विशाल मनाचं एक जिद्दी व्यक्तिमत्व श्री निवृत्ती पाचपांडे सर. हुशार असल्यावरही घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने त्यावेळी शिक्षणासाठी सुद्धा वर्षभरात चार-पाच हजार रुपयांची व्यवस्था करता येत नव्हती तसेच मार्गदर्शनाचा अभाव यामुळे निवृत्ती सदाशिव पाचपांडे नामक गृहस्थ स्वतः उच्च शिक्षण घेऊ शकते नाही व सहज इंजिनिअरींगला नंबर लागल्यावरही त्यापासून ते वंचित राहिले याची खंत त्यांच्या मनात आजही आहे.**

परिस्थितीचे चटके सोसत तावून सुलाखून निघालेल्या या व्यक्तीने शिकत असताना लहान मुलांच्या शिकविण्या घेऊन त्यातून स्वबळावर डिप्लोमा इन इलेट्रीकल चा कोर्स पूर्ण करून ज्युनिअर इंजिनिअरिंग पूर्ण केले. नंतर ते औष्णिक विद्युत केंद्रात नोकरीलाही लागलेत. चंद्रपूर, कोराडी अशा ठिकाणी नोकरी करता करता व संसार आणि मुलांच्या शिक्षण व इतर जबाबदारीचा भार पेलता पेलता रिटायरमेंट ची वेळ कधी आली ते कळलंच नाही, एव्हाना त्यांचे दोन्ही मुलं केमिकल इंजिनिअर बनून प्रायव्हेट कंपनीत जॉब ला लागून स्थिरावले पण होते. रिटायर झाल्यावर मुलांकडे मजेत राहण्याचा विचार मनात येत होता.

सेवानिवृत्त झाल्यावर आपल्याकडे वेळ असेल तो वेळ समाज हिताच्या कार्यासाठी देता आला तर समाधान लाभेल असे त्यांना मनोमन वाटत होते. स्वतःला अनेक अडचणींचा सामना करावा लागला असला तरी आजकालच्या मुलांना परिस्थिती असल्यावरही मार्गदर्शनाअभावी तशा अडचणींचा सामना करावा लागू नये त्यासाठी आपण काही तरी करायला हवं ह्या गोष्टीने त्यांना पछाडले होते.

त्यांनी मलकापूर येथे वृंदावन नगर भागात जागा घेऊन बांधकाम करून मुलांना मार्गदर्शन करायचे ठरविले व वर्ष २००८ ला वर्ग ८ वी पासून च्या मुलांना मार्गदर्शन




सुरू केले.

आपल्याकडची मराठी, सेमी-ईंग्लिश किंवा इंग्लिश कुठल्याही माध्यमातून शिकणारी मुले गणितात तितकी सरस नसल्याने ते स्पर्धा परीक्षा व इतर ठिकाणी ध्येय गाठू शकत नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले, आणि मग पाचपांडे सरांचा मुलांना गणितात निष्णात करून सोडण्यासाठीचा प्रवास सुरु झाला ते स्वतः अतिशय हुशार असल्याने त्यांचा लहानपणी गणितात हातखंडा होता पण आताचे गणित थोडे वेगळे असल्याने त्यांनी स्वतः विविध स्पर्धा परीक्षा, कॉम्पिटेटिव्ह टेस्ट सिरीज परीक्षा अशा विविध परीक्षांच्या पेपरचा त्यातील बारकावे, गणिते लवकर व बिनचूक कसे सोडवावे याचा सविस्तर अभ्यास केला नंतर 'ज्ञान मंदिर' नावाचा स्वतःचा छोटेखानी Terminology of Maths शिकविणारा वर्ग सुरू केला.

परमेश्वराच्या कृपेने आपण शून्यातून वर आलो ज्या समाजात वाढलो, जगलो, मोठे झालो त्या समाजाचं आपण काहीतरी देणं लागतो या उद्देशाने त्यांनी सुरू केलेल्या या वर्गात मराठी, स्टेट बोर्ड व CBBC च्या वर्ग ८ पासून तर विविध स्पर्धा परिक्षेपर्यंतचे गणिताचे सखोल मार्गदर्शन ते करतात आणि ते सुद्धा अगदी अत्यल्प फी मध्ये.

त्यांच्या वर्गात विद्यार्थ्यांसाठी व अभ्यासाला अतिशय सुरक्षित वातावरण आणि Ac पर्यंत सुविधा आहेत. नियमित शिकवणी आणि दर आठवड्याला एकदा टेस्ट या पद्धतीने गेल्या ८ ते नऊ वर्षांपासून ते सकाळी ६ पासून तर संध्याकाळी ७ पर्यंत त्यांच्या ज्ञान मंदिरात दररोज व्यस्त असतात. पाचपांडे सरांनी गेल्या आठ वर्षात आतापर्यंत जवळपास ८०० ते ९०० विद्यार्थ्यांना गणितात निष्णात केले असून त्यापैकी बहुसंख्य विद्यार्थी राज्यातील व बाहेरील प्रतिष्ठित इंजिनिअरिंग व मेडिकल कॉलेजला प्रवेश घेऊन इंजिनिअर व डॉक्टर झाले आहेत. वर्ग ८ ते १० च्या दरम्यान सरांकडे शिकलेल्या गणिताचा फिजिक्स विषयात खूप फायदा झाला असे मेडिकल चे विद्यार्थी आवर्जून सांगतात. पाचपांडे सरांच्या वन मॅन आर्मी क्लास मधून ८ वी ते १० वी ला गणित शिकलेल्या विद्यार्थ्यांपैकी ३ विद्यार्थी IIT कॉलेज मध्ये शिकत आहेत.



विद्यार्थ्यांकडून एकीकडे हजारो/लाखो रुपये फी आकारणारे क्लासेस आणि दुसरीकडे प्रतिवर्षं नाममात्र/नगण्य फी ( १०००रु. ) आकारणारे पाचपांडे सर बघितले की ते नक्कीच सामन्यातील असामान्य व्यक्तिमत्व असल्याचे जाणवत राहते. विद्यार्थ्यांवर मेहनत घेऊन सुयोग्य नियोजन, संपूर्ण ज्ञान व अखंड सराव यांच्या जोरावर त्यांना गणितात तरबेज करणारा हा साधा सरळ दिसणारा माणूस हाडाचा शिक्षक वाटतो. आपल्याकडे जे देण्यासारखे असेल ते द्यावे अशी विचारधारणा ठेवणारे कसलीही प्रसिद्धी व बडेजावपणा न करणारे, शेकडो गरीब विद्यार्थ्यांना सामाजिक, शैक्षणिक दृष्टया वैभव संपन्न करणाऱ्या श्री.एन.एस.पाचपांडे सरांसारखे सहृदयी लोक पाहिले की श्रद्धेने हात आपोआप त्यांच्या चरणाशी झुकतात.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक
राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
मुख्य कार्यालय : मोंढा, परळी वैजनाथ, जि. बीड. मो. 9130072178, 9130072188
कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176,
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in | संपर्क अनंत भाग्यवंत ९१३००७२१८९
चंदुलाल बियाणी
संस्थापक अध्यक्ष
Rajasthani Multistate MINI BANKING
www.rajasthanimultistate.in
Powered by Tatkal Banking
आता बँकिंग व्यवहार करणे झाले सोपे... राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि.,चा तात्काळ बँकिंगच्या माध्यमातून तब्बल ४१८ बँकांशी होणार सेकंदात व्यवहार...
कोणतेही बँकिंग व्यवहार करणे फक्त 9 सेकंदात शक्य
तात्काळ बँकिंग सुविधा
रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मान्यताप्राप्त, NPCI द्वारे संचलित भारत बिल पेमेंट सिस्टम (BBPS), मोबाईल/डी.टी.एच. रिचार्ज आणि इतर सुविधा
* नियम व अटी लागू
कोणत्याही बँकेत पैसे डिपॉझिट करणे. | कोणत्याही बँकेत पैसे ट्रान्सफर करणे. | कोणत्याही बँकेतून पैसे काढणे | मोबाईल बँकिंग सुविधा | Bank Account Verification सुविधा | NEFT/RTGS सुविधा | IMPS/UPI सुविधा | आधार पेमेंट सुविधा | QR Code सुविधा

# शेतकऱ्यांना मदत मिळणार की नाही ? शेतकऱ्यांच्या मागणीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीचा मोठा फटका बसला आहे. मात्र, येथील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अद्याप नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे समोर आलं आहे.

सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना मदत मिळणार की नाही ? शेतकऱ्यांच्या मागणीकडं प्रशासनाचे दुर्लक्ष खरीपाची व आता रब्बीची सावळदबारा भागात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले बरेच शेतकऱ्यांना खरीपाची नुकसान भरपाई अद्याप पर्यंत मिळाली नाही त्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी सागर देशमुख सामाजिक कार्यकर्ते यांनी निवेदनाद्वारे केली आहे.यावर्षी राज्यातील अनेक जिल्ह्यांना अतिवृष्टीचा पावसाचा मोठा तडाखा बसला आहे. यामध्ये शेतकऱ्यांच्या पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. शेतकऱ्यांना अतिवृष्टीचा फटका बसला आहे. शेती पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. शेतकऱ्यांच्या मागणीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. नुकसान भरपाईचे कोटी रुपये अद्यापही शेतकऱ्यांना मिळाले नसल्यानं शेतकरी चिंतेत आहेत.यावर्षी सुरुवातीला जून महिन्यात पावसानं दडी नारली होती. त्यानंतर मात्र, जुलै आणि ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात राज्यात पावसानं धुमाकूळ घातला होता. मराठवाडा विदर्भासह उत्तर महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली आहे. यामुळं शेतकऱ्यांची उभी पीक वाया गेली होती. हाती आलेली पीक वाया गेल्यानं शेतकरी संकटात सापडला होता. सोयाबीन, कापूस, फळबागा या पिकांचे मोठं नुकसान झालं होते. शेती पिकांच्या नुकसानीसह काही ठिकाणी शेतकऱ्यांच्या जमिनी देखील खरवडून गेल्या होत्या. याचा मोठा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसला होता. परंतु अद्याप बऱ्याच शेतकऱ्यांना नुकसानभरपाई पासून वंचित राहावे लागत आहे.

परतीच्या पावसानंही सोयगाव तालुक्यात धुमाकूळ घातला होता . अतिवृष्टीतून वाचलेली पीक या परतीच्या पावसानं वाया गेली होती . परतीचा पाऊस लांबल्यामुळं काढणीला आलेलं पीक आडवी झाली होती . या अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कापूस, तूर इत्यादी पिकांसह फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला होता .मात्र सोयगाव तहशीलच्या भोंगळ कारभारामुळे सावळदबारा परिसरातील बऱ्याच शेतकऱ्यांना नुकसानभरपाई अद्याप मिळालेली नाही .त्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी केली आहे . **सागर देशमुख, सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी सावळदबारा, ता . सोयगाव**

# शेतकऱ्यांनी आधार लिंक करून घ्यावे : चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील व सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांना



प्रत्येक वर्षी सहा हजार रूपये मिळतात. ही रक्कम दोन हजार रुपयांच्या तीन टप्प्यांमध्ये मिळते. ही योजना सुरू झाल्यापासून शेतकऱ्यांना अद्याप १३ हप्ते वितरित झाले आहेत. या हप्त्याची रक्कम त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा केली जाते. अजून काही शेतकऱ्यांची आधार जोडणी बाकी आहे. त्यामुळं या शेतकऱ्यांना पुढील हप्ता म्हणजे १४ वा हप्ता त्यांच्या बँक खात्यात जमा होणार नाही. त्यासाठी शेतकऱ्यांनी फर्दापूर, जामठी, सोयगाव, बनोटी व सावळदबारा गावातील पोस्टात बँक खात्याला आधार नंबर जोडून घ्यावा, असे आवाहन भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण यांनी केले आहे. शेतीकामासाठी गरजेवेळी पैसे उपलब्ध व्हावे, यासाठी केंद्र सरकारकडून किसान सन्मान योजना राबविण्यात येत आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी आपला आधार नंबर बँक खात्याशी संलग्न करणे गरजेचे आहे. ते करताना राष्ट्रीयीकृत बँकेत अनेक अडचणी शेतकऱ्यांना येत आहेत, त्यामुळे त्यांची मोठी गैरसोय होत आहे. त्याचा विचार करून सावळदबारा परिसरातील गावांनाही सावळदबारा पोस्टातच बँक खाते उघडून तेथे आधार नंबर संलग्न करून घ्यावे असे आवाहन जिल्हा उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण यांनी केले आहे. आधार नंबर संलग्न करण्याची मुदत दि.१५/५/२०२३ पर्यंत आहे. त्यामुळे तात्काळ पोस्टात खाते उघडून आधार लिंक झाल्यानें जमा झालेले पैसे काढण्यासाठी बॅंकेत जाण्याची आवश्यकता नाही. नजीकच्या पोस्ट आफिस मधून पैसेही काढता येतील त्या करिता पोस्ट आफिस मधे आधार लिंक करून घ्यावे असे आवाहन केले.

# पैठणमध्ये शुक्रवारी उन्हाचा पारा ४१ पार

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** मागील चार दिवसांपासून उन्हाचा पारा सातत्याने वाढत असून दुपारच्या वेळी पैठण शहर व परिसरात गेल्या काही दिवसांत उन्हाची काहिली प्रचंड वाढली आहे. दुपारच्या वेळीं तर रस्त्यावर शुकशुकाट दिसून येत आहे. सकाळी किंवा संध्याकाळी उशिरा कामांची विभागणी करा. अगदीच आवश्यक असेल सौम्यरंगांचे आणि ढिले कपडे वापरावे. टाइट जीन्स आणि भडक कपडे वापरणे टाळावे. टोपी, कानाला आणि डोक्याला रुमाल किंवा स्कार्फ बांधवा, छत्रीचा वापर करावा. जवळ पाण्याची बाटली ठेवावी. गरजेप्रमाणे मधून मधून पाणी प्यावे. तापमानवाढीबरोबरच पाणी पिण्याचे प्रमाण वाढवावे. तहान लागण्याची वाट न पाहता दररोज ८ ते १० ग्लासपेक्षा जास्त पाणी प्यावे. तसेच नारळपाणी, ताज्या फळांचा रस, ताक, लस्सी, कांजी, लिंबूपाणी, तसेच ओआरएस भुकटी पाण्यात टाकून घेत राहावी. साखरेचे वा अल्कोहोलचे प्रमाण जास्त असलेली पेये घेऊ नयेत. त्यामुळे शरीरातील पाण्याचं प्रमाण कमी होते. तसंच बाहेरील थंड पेय घेणं टाळावे. आहारमध्ये काकडी, संत्री, कलिंगड आणि लिंबू, कांदा यांचा भरपूर वापर करावा असा डॉक्टरांचा सल्ला आहे .



**विशेष काळजी घेणे गरजेचच :** उन्हाची तीव्रता, वाढत्या तापमानाचा परिणाम मानवी आरोग्यावर होत असून उन्हाची बाधा झाल्याने डायरिया, जुलाब, उलट्या, ताप या रुग्णांमध्ये वाढ होत आहे .तीव्र प्रमाणात ऊन लागल्यास उष्माघात तसेच बीपी-शुगरच्या रुग्णांमध्ये स्ट्रोक बसण्याचीही शक्यता असल्याने उन्हापासून बचावासाठी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे . **डॉ . विष्णु बाबर,पैठण**

# चौथ्या मैत्री चषक राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत डॉ. संजय गायकवाड यांना दोन सुवर्णपदक

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** दि. 2 ते 4 मे या कालावधीत पिलिव, सोलापूर येथे पार पडलेल्या चौथ्या मैत्री चषक राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत राज्य कामगार विमा योजना सोसायटीचे स्टेट नोडल ऑफिसर ( महाराष्ट्र ) डॉ. संजय माधवराव गायकवाड ( मुखेडकर ) यांनी एअर रायफल शूटिंग स्पर्धा, सीनिअर मेन्स व मास्टर्स मेन्स स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत दोन सुवर्णपदके मिळवले आहेत. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

सदरील स्पर्धेचा पुरस्कार वितरण सोहळा खा. श्री रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या हस्ते पार पडला. डॉ. संजय गायकवाड यांनी याचे श्रेय त्यांचे शूटिंग प्रशिक्षक विश्वजीत शिंदे , योगेश निंबाळकर, मिस यशिका शिंदे आणि त्यांच्या पत्नी कल्पना, मुलगा संकल्प, कर्मण्य व आई पार्वतीबाई गायकवाड, तसेच महा रा.का. वि. सोसायटीचे आयुक्त डॉ. करंजकर, संचालक ( प्रशासन ) महेश वरुडकर , संचालक( वैद्यकीय )डॉ. खानविलकर , डॉ. ढवळे यांना दिले आहे. या स्पर्धेत दोन सुवर्णपदके मिळवल्यानंतर आनंद व्यक्त करीत यावरच न थांबता अजून खूप मोठा पल्ला गाठायचा आहे अशी प्रतिक्रिया डॉ. संजय गायकवाड यांनी दिली . त्यांचा मराठी चित्रपट ऑस्कर पुरस्कार पात्र अवयव दानावर आधारित तुझ्यासाठी काहीही लवकरच सर्व चित्रपट गृहामध्ये प्रदर्शित होणार आहे. त्यांना आतापर्यंत आंतरराष्ट्रीय आशिया पॅसिफिक पुरस्कार 2022 , डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवनगौरव पुरस्कार 2023 , मराठवाडा भुषण पुरस्कार 2022 मिळाले आहेत. तर राष्ट्र प्रेरणा पुरस्कार 2023 , कृषी प्रेरणा पुरस्कार 2023 , डॉ. बि आर आंबेडकर राष्ट्रीय पुरस्कार 2023 साठी त्यांची निवड झाली आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

महाराष्ट्र Business Katta

तिरुपती मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna
8623904312
Abhijeet Shukla
9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

EPFO
EPS-1995 Option Form
Before 01.09.2014
After 01.09.2014
ऑनलाईन फॉर्म आमच्याकडे भरुन मिळेल
कागदपत्र-पी.पी.ओ.नंबर, यु.ए.एन.नंबर, आधार कार्ड ( मोबाईल लिंक असणे गरजे ), ई-मेल आय., बँक पासबुक.
AADHAAR
आधार सेवा केंद्र
• जन्म तारिख • नावात बदल
• मोबाईल नंबर • पत्यात बदल
• मेल आय.डी. • लग्नानंतरचे नाव
आधार काढून १०वर्ष झाली असेल तर अपडेट करुन मिळेल.
अधिक माहितीसाठी संपर्क संचालक-दत्ता जाधव
महा ई-सेवा केंद्र
कॉमन सर्व्हिस सेंटर
आपले सरकार सेवा केंद्र
बँक ऑफ महाराष्ट्र समोर, एन-7, सिडको.
मो. 9 4 0 3 3 4 5 7 3 9

CAFE ROCKSTARZ EAT . CHILL . REPEAT
11:11 ELEVEN ELEVEN
Where Dishes come True..!!
MULTI-CUISINE FAMILY RESTRO
AURANGABAD
Indian, Continental, Italian, Chinese, Chat, Pavbhaji, Shakes, Desserts
9665544629
GHAI TOWER, BESIDE RAJ CLOTH, CANNAUGHT GARDEN, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

खळबळजनक
कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही
Sales & Services
नवीन कॉम्प्युटर 9900/-
जुने कॉम्प्युटर 5900/-
जुने लॅपटॉप 6900/-
दोन कॅमेरा सेटअप 7900/-
चार कॅमेरा सेटअप 9900/-
9420405928

# महाप्रतापी धर्मवीर संभाजी महाराज



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म 14 मे इ.स.1657 रोजी पुरंदर येथे झाला आणि हिंदवी स्वराज्यात तेजस्वी तारा प्रगट झाला.राजपुत्र असल्यामुळे रणांगणातील मोहीम व राजकारणातील डावपेच यांचा संपूर्ण अभ्यास अवगत होता.त्याचप्रमाणे लहानपणापासूनच ते अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे मोठे धनी होते. संभाजींना लहानपणापासूनच अनेक कठीणायीचा सामना करावा लागला. संभाजी महाराज लहान असतांनाच त्यांच्या आई महाराणी सईबाई यांचे निधन झाले आणि त्यांच्या काळजावर मोठा आघात झाला.**

या आघातापासुन सावरण्यास राजमाता जिजाबाई यांनी आपले सर्वस्व पणाला लावले आणि हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीसाठी व रक्षणासाठी शूरवीर संभाजी नावाचा महामेरू उभा केला.संभाजींची सावत्र आई पुतळाबाई यांनी आपल्या मुलासारखी वागणुक देवुन वटवृक्षाचे काम केले.परंतु त्यांची दुसरी सावत्र आई सोयराबाई यांनी संभाजीराजांच्या रस्त्यात बाभळीचे काटे रोवुन पोरकेपणाची वागणुक दिली व महाराजांच्या राजकीय कारकीर्दीत ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला. संभाजीच्या मनात लहानपणापासूनच आपण देशासाठी काहीतरी केले पाहिजे.या उद्देशाने त्यांनी राजकारणातील संपूर्ण बारकावे आत्मसात केले. मुगलांच्या घडामोडी आणि राजकारण त्यांना लहान वयातच कळले.त्याचप्रमाणे संस्कृतसह इतर आठ भाषांचे ज्ञान त्यांना अवगत होते.याचा फायदा भविष्यात व्हावा या विचाराने शिवाजी महाराजांनी त्यांना आग्रा भेटीच्या वेळी बरोबर नेले.त्यावेळी संभाजीराजे फक्त 9 वर्षाचे होते.शिवाजी महाराज औरंगजेबाच्या नजरकैदेतुन निसटल्यानंतर त्यांना संभाजींची चिंता वाटू लागली.औरंगजेब आगबबुला झाला अशा वेळी संभाजीराजे स्वराज्यात सुखरूप पोहचावे या उद्देशाने शिवाजी महाराजांनी संभाजीराजांचे निधन झाल्याची अफवा पसरवून मोगलांच्या डोळ्यात धुळ झोकून संभाजींना महाराष्ट्र सुखरूप पोहचण्याचा मार्ग मोकळा केला.इ.स.1674 मध्ये शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर अवघ्या 12 दिवसातच राजमाता जिजाऊचे निधन झाले आणि पुन्हा संभाजींना मोठा जब्बर धक्का बसला.त्यानंतर त्यांच्याकडे मायेने लक्ष देणारे कोणी राहिले नाही.कारण शिवाजी महाराज स्वराज्याच्या राजकारणात आणि रणांगणावर गुंतले होते.छत्रपती संभाजीं महाराजांनी आपल्या वडिलांप्रमाणेच सक्तीने धर्मांतरन करणाऱ्या इंग्रज, पोर्तुगीज व मोगल सत्ताधाऱ्यांचा कडाडून विरोध केला.औरंगजेबाने इ.स.1682 साली मराठ्यांवर हल्ला केला.औरंगजेब सैन्य, दारूगोळा, हत्ती-घोडे याबाबतीत बलशाली होता.कारण औरंगजेबाचे सैन्य संभाजीं महाराजांच्या तुलनेत 5 पटीने अधिक होते.त्याकाळी जगातील सर्वात शक्तिशाली सैन्यामध्ये औरंगजेबाचा समावेश होता.तरीही संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठयांनी हिमतीने लढा दिला. त्याचप्रमाणे संभाजीं महाराजांनी गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याच्या सिद्धी आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय या शत्रूंना जोरदार धडा शिकवला. त्यामुळे संभाजीं महाराजांच्या विरूद्ध औरंगजेबाला मदत करायची हिंमत कोणाचीही झाली नाही.कारण त्याकाळी संभाजीं म्हणजे एक वादळी तुफान होते.त्यामुळेच संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखालील मराठ्यांनी मोठ्या शिताफीने झुंज दिली.इ.स.1689 च्या सुरूवातीला संभाजीं महाराजांनी त्यांच्या महत्वाच्या सरदारांना बैठकीसाठी कोकणातील संगमेश्वर येथे बोलावले.1 फेब्रुवारी इ.स.1689 रोजी संभाजीं महाराज रायगडाकडे रवाना होत असतानाच औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान याने नागोजी माने यांच्या साथीने संगमेश्वरावर हल्ला केला.मराठ्यात आणि शत्रूच्या सैन्यात मोठी चकमक झाली. मराठ्यांचे संख्याबळ कमी असल्याने शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाही.त्यामुळे शत्रूने संभाजीं महाराजांना व त्यांच्या सोबत असलेल्या कवि कलश यांना जिवंत पकडले.अशाही परीस्थितीत महाराजांना वाचविण्याचा प्रयत्न मराठ्यांनी केला.परंतु ते त्यात



यशस्वी झाले नाहीत.पहिला प्रयत्न जोत्याजी केसरकर यांनी केला. यानंतर अप्पा शास्त्री यांनी देखील केला.परंतु दोन्ही प्रयत्न अयशस्वी ठरले व संभाजीं महाराज औरंगजेबाच्या तावडीत सापडले. औरंगजेबाच्या तावडीत सापडल्या नंतर औरंगजेबाने महाराजांना इस्लाम धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती केली.परंतु त्यांनी आपल्या धर्माचे पालन करत इस्लाम धर्म स्वीकारला नकार दिला. त्याचप्रमाणे राज्याचा संपूर्ण खजाना आमच्या स्वाधीन करावा अशी अट घातली तेही संभाजीं महाराजांनी मान्य केली नाही.संभाजी राजांचा धीटपणा आणि स्वराज्याच्या प्रती प्रेम पाहून औरंगजेब तीलमिला झाला आणि तेव्हा पासून संभाजीं महाराजांना यातना देण्यास सुरुवात केली. तरीही औरंगजेबाची कोणतीही अट माणन्यास व त्यांच्या सामोरं यत्किंचितही झुकण्यास महाराज तयार नव्हते.संभाजी महाराजांनी औरंगजेबाला खडसावून सांगितले की स्वराज्याच्या रक्षणासाठी व प्रजेच्या हितासाठी कोणतीही तडजोड करणार नाही. यासाठी माझे प्राण गेले तरी चालेल.अशी सिंह गर्जना ऐकताच औरंगजेबाने संभाजीं महाराजांना कठोर यातना देण्यास सुरुवात केली.औरंगजेबाने महाराजांचे डोळे काढले, महाराजांची जीभ कापली, महाराजांवर अतोनात वार करण्यात आले.हे सगळं संभाजीं महाराज 40 दिवस सहन करीत होते. तरीही मराठा साम्राज्यासाठी लढत रहाले. एवढ्या छळाने सुध्दा औरंगजेबाचा आत्मा शांत झाला नाही.शेवटी औरंगजेबाने आपली संपूर्ण क्रुरतेची हद पार केली व 11 मार्च 1689 रोजी महाराजांचे हात-पाय, आणि त्यांचे सर्व देह शरीरापासून वेगळे करून त्यांची क्रुरतेने हत्या करण्यात आली.शेवटी औरंगजेब हताश होऊन म्हणतो माझ्या पोटी असा शूरवीर, धाडसी पुत्र का जन्माला का आला नाही ?याची खंत त्याला मरेपर्यंत सतावत होती.शत्रूला हेवा वाटेल असे महान कार्य संभाजीं महाराजांनी केले व जगाच्या इतिहासात कमी वयात म्हणजे 32 व्या वर्षी स्वराज्याच्या व प्रजेच्या रक्षणासाठी बलिदान देणारा राजा म्हणून संभाजीं महाराजांसमोर आज सर्वच नतमस्तक होतात.संभाजी महाराजांना जयंती निमित्त कोटी कोटी प्रणाम.महाराष्ट्र हा शूर वीरांचा व धर्मवीरांचा आहे.याची जान आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.त्यामुळे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यातील भ्रष्टाचार, महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगारी इत्यादी समस्याकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.यामुळे जनतेला (प्रजेला)सुख-समाधान प्राप्त होईल.कारण आज आपण जो मोकळा श्वास घेतो व हसतो-बागडतो आहोत तो छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुण्यायीमुळेच.हीबाब आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.महाराष्ट्र हा संतांचा, शुरवीरांचा, थोर महात्म्यांचा व क्रांतीकारकांची पावणभुमि आहे.याची जोपासना आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी करने अत्यंत गरजेचे आहे. धर्मवीरांनी महाराष्ट्र घडवीण्यासाठी बलीदान दिले.परंतु आजचा राजकीय पुढारी गरीब, सर्वसामान्य, शेतकरी यांचे रक्त भ्रष्टाचाराच्या माध्यमातून पीत आहे.याची खंत धर्मवीर संभाजी महाराज, साधुसंत, थोर पुरुष, क्रांतीकारक व आपले पुर्वज यांना अवश्य होत असेल. त्यामुळे कोणत्याही महापुरुषांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची काळजी आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी घेतली पाहिजे व संभाजीं महाराजांचे आदर्श सामोरं ठेऊन पुढील वाटचाल व्हायला हवी.यातच आपल्याला धर्मवीर संभाजी महाराज दिसून येईल.आज प्रदूषणाच्या विळख्यात संपूर्ण पृथ्वी आहे.तीला वाचविण्यासाठी धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून युध्दपातळीवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.कारण आज लावलेले वृक्ष शेकडो काळ टिकेल.याच वृक्षांच्या पाणात, फुलात, फळात व जळामुळात संपूर्ण थोर महात्म्याचे व शुरविरांचे दर्शन अवश्य होईल.त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ले सुसज्जीत करून पर्यटनासाठी मोकळी करावी.कारण गडकिल्ले महाराष्ट्राची आण-बाण-शान आहे. त्यामुळे त्यांची जपणूक केलीच पाहिजे.यामुळे नवीन पिढीला संपूर्ण गडकिल्ल्यांचा इतिहास समजण्यास मोठी मदत होईल आणि शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांचा इतिहास सहज समजूत येईल.कारण याच गडकिल्ल्यात महाराष्ट्राची संपूर्ण खरी संस्कृती दडलेली आहे.छत्रपती संभाजीं महाराजांना जयंती निमित्त कोटी कोटी प्रणाम व मानाचा मुजरा.

# कोण होते निरंकारी बाबा ?



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**"जीवन के हैं दो किनारे एक जन्म हैं एक मरण। जो जन्मा हैं वो मरता हैं धनवंता हैं या निर्धन। जन्म मरण के बीच का जीवन श्रेष्ठ हैं अनमोल हैं। कहें 'हरदेव' कि गुरु ज्ञान से पड़ता इसका मोल हैं।" [ पवित्र सम्पूर्ण हरदेव बाणी: पद क्र.१६०] आजच्या बहुढंगी, बहुरंगी दुनियेत स्वतःला ईश्वरी अवतार मानून आपले बाजारमूल्य वाढविण्याची स्पर्धा भक्तीपंथात जोमाने फोफावलेली दिसून येत आहे. या स्पर्धेतूनच अनेक पाखंडी कलंकित होत आहेत, शांती, संयम आणि औदार्य अशा त्रिगुणांच्या अनोख्या संगमामुळे संतशिरोमणी हृदयसम्माट सत्यसम्राट बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी लाखो अनुयायी जोडले आणि मानवतेची पूजा करणारा निरंकारी पंथ जगभर पसरविला.**

संत निरंकारी मिशनमध्ये जगातील सर्व जाती-धर्माचे लोक गुण्यागोविंदाने नांदू लागले, कारण कोणाच्याही व्यक्तिगत जीवनशैली किंवा श्रद्धा भावनांना धक्का न लावता केवळ मानवतेच्या आधारावर आपुलकी, प्रेम, सद्भावना, सामंजस्याने व एकोप्याने आनंदाने जीवन जगायला शिकवणारी विचारधारा युगद्रष्टा बाबा हरदेवसिंहजींनी जोपासली व वृद्धिंगत केली. बाबाजी यथार्थ व यशस्वी मानवी जीवन जगण्याची कला शिकवत असत. त्यांनी आध्यात्मिक व भौतिक जीवनाशी अशी सुंदर सांगड घातली, त्यामुळेच जगभर ही विचारधारा लोकप्रिय बनली व हवी हवीसी वाटू लागली. कारण संतोक्तीची प्रचिती त्यांच्या पावन सान्निध्याने आली. जगतगुरू जगतवंद्य संतश्रेष्ठ तुकारामजी महाराजांनी समजाविले होते-

**"मागे पुढे ब्रह्म दाटे! म्हणती देव आहे कोठे!!**
**मृगा नाभिचा परिमळ! व्यर्थ फिरे रानोमाळ!!"**
**गुरुकृपा झाल्यावरी! ब्रह्म सृष्टी दिसे सारी!!**
**तुका म्हणे ऐसी भ्रांती! देव असता नाही म्हणती!!**

संयुक्त राष्ट्रसंघाने आपल्या सामाजिक व आर्थिक परिषदेवर संत निरंकारी मंडळाला सल्लागाराचा दर्जा दिला. सन २०१३मध्ये बाबाजींना गांधी ग्लोबल फॅमिलीच्या वतीने प्रतिष्ठित महात्मा गांधी सेवा मेडलने सन्मानित करण्यात आले, तर सन २०१४मध्ये गांधी शांती पुरस्कार प्रदान करण्यात आला. दि.५ ऑगस्ट २०१५ रोजी इंग्लंडमध्ये स्वेच्छा सामाजिक सेवेसाठी देण्यात येणाऱ्या सर्वोच्च क्वीन्स गोल्डन ज्युबिली ॲवॉर्डने बाबाजींना सन्मानित करण्यात आले. कारण माणसाशी माणसे जोडून मानवता धर्म स्थापित केला.



संतश्रेष्ठ गोस्वामी तुलसिदासजींच्या वाणीतून प्रत्यय आला-

**"सुनहु देव सचराचर स्वामी।**
**प्रनतपाल उर अन्तरजामी।।**
**उर कुछ प्रथम वासना रही।**
**प्रभु पद प्रीति सरित सो बही।।"**
**(पवित्र रामचरित मानसः ५-४९-३)**
**(अर्थः बिभिषणजीने कहा, हे देव, हे चराचर जगत के स्वामी! हे शरणागत के रक्षक! हे सबके हृदय के भीतर के जानने वाले! सुनिए, मेरे हृदय में पहले कुछ वासनाएँ थी।वह प्रभु के चरणों की प्रीतिरूप नदी में बह गईं।)**

सत्यसम्राट हृदयसम्राट बाबा हरदेवसिंहजी महाराज यांचा जन्म दि.२३ फेब्रुवारी १९५४ रोजी दिल्ली येथे झाला. सन १९७१मध्ये त्यांनी निरंकारी सेवादलामध्ये प्राथमिक सदस्य म्हणून प्रवेश केला आणि सेवादलाची सुती खाकी वर्दी घालून सेवेचा आनंद लुटला. सन १९७५ मध्ये त्यांनी निरंकारी युथ फोरमची स्थापना केली. या फोरमचे लक्ष्य होते- साधे व सदाचारी जीवन जगणे, प्रेम व भक्तिपूर्ण सेवा, अनावश्यक उधळपट्टीला आळा आणि नशाबंदी साधणे. दि.२४ एप्रिल १९८० रोजी कट्टरपंथी धर्मांधांनी मिशनचे तत्कालीन प्रमुख, सद्गुरू बाबा गुरुबचन सिंहजी यांच्यावर निशाना साधून शहीद केले. तरुण बाबा हरदेवांनी शरीररुपातील सद्गुरु व पिताही गमावला होता. निरंकारी मिशनच्या प्रत्येक अनुयायाचे धैर्य, संयम आणि सहनशीलता पणाला लागावी असा तो क्षण होता. दि.२७ एप्रिल १९८० रोजी बाबा हरदेवसिंहजींना मिशनचे सांप्रत सद्गुरू व प्रमुख म्हणून घोषित करण्यात आले. शांती, प्रेम आणि विश्वबंधुत्व स्थापन करण्याचे आश्वासन कृतीत उतरविण्यासाठी बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी देश-विदेशांमध्ये विस्तृत प्रचार यात्रा आयोजित केल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संत निरंकारी मिशन मानवता, विश्वबंधुत्व, प्रेम, शांती, समता, अहिंसा अशी महान ध्येये गाठणारी आध्यात्मिक चळवळ बनून नावारुपाला आली आहे. सर्व धर्मग्रंथांचे अमूल्य सारामृत त्यातून प्रवाहित केले. गुरु नानकदेवजींचे अनमोल वचन सार्थक वाटतात-

**"गुरु किरपा जेहि नर पैं कीन्ही तिन यह जुगति पिछानी!**
**नानक लीन भयो गोबिंद सों ज्यो पानी संग पानी!!"**
**[पवित्र भजन संग्रह- गीता प्रेसः पृ.सं.१८०]**

सन २०१६ मधील जून महिन्याच्या शेवटी होऊ घातलेल्या द्वितीय निरंकारी आंतरराष्ट्रीय संत समागमाच्या पूर्वतयारीची पाहणी करण्याच्या उद्देशाने ते कॅनडाच्या कल्याण यात्रेवर असतानाच दि.१३ मे २०१६ रोजी त्यांची गाडी अपघातग्रस्त झाली आणि त्यातच मानवतेचे कार्य करत असतानाच त्यांनी आपल्या नश्वर देहाचा त्याग केला. धन्य धन्य ते हृदयसम्राट बाबा हरदेवसिंहजी महाराज आणि त्यांचे अहर्निश मानवोत्कर्षाचे आध्यात्मिक कार्ये! मिशनमधील त्यांच्या भरीव कार्याची आठवण म्हणून त्यांचा स्मृतिदिन हा मिशनतर्फे 'निरंकारी समर्पण दिवस' म्हणून पाळला जात आहे.

**"मैं नही तो कुछ न होगा सोचना नादानी हैं।**
**सारे सिलसिले हैं मुझसे ये कहना बेमानी हैं।**
**ऐ मिट्टी के पुतले इतना क्यों करता अभिमान तू।**
**कहे 'हरदेव' इस दुनिया में दो दिन का मेहमान तू।"**
**[पवित्र सम्पूर्ण हरदेव बाणीः पद क्र.२८४]**

# संविधानाचे प्रास्ताविक



नुरखाँ पठाण, रायगड
संपर्क क्र.: 7276526268

आधुनिक केसरी

**भारताला स्वातंत्र्य मिळण्यासाठी 'ब्रिटिश' सरकारबरोबर दीर्घकाळ 'लढा' झाला आणि त्यांच्या बरोबर वाटाघाटींचे सत्रही सुरू राहीले. त्याच्याच एका टप्प्यावर 'ब्रिटिश सरकारने' पाठविलेल्या 'कॅबिनेट मिशनने' भारतात 'घटनात्मक राज्यपद्धती' आणण्यासाठी 'संविधानसभा' निवडण्याचा निर्णय घेतला. संविधान सभा:- आतापर्यंतच्या ब्रिटिशांनी भारतासंदर्भात पास केलेले विविध 'कायदे' आणि त्यांच्या अंमलबजावणीमुळे भारतामध्ये 'लोकशाहीची मुल्ये' अधिक चांगल्या प्रकारे रुजली होती. असे म्हटले जाते की, भारतामध्ये 'आधुनिकता' ही ब्रिटिश घेऊन आले आणि कालांतराने त्याचा परिणाम म्हणजे भारतात निर्माण झालेले 'आधुनिक संविधान'.**

कोणत्याही देशाचे 'संविधान' हे त्या देशाचे सर्वोच्च कायदेशीर दस्ताऐवज असते. दस्ताऐवज आहे, म्हणजेच ते एक 'कायद्याचे पुस्तक' आहे. जशी प्रत्येक पुस्तकाची 'प्रस्तावना, उद्देशिका वा भूमिका' सुरवातीलाच मांडलेली असते, ज्यात ते पुस्तक लिहिण्याचा उद्देश स्पष्ट करण्यात आलेला असतो; तसेच आपल्या संविधानाचा उद्देश देखील प्रारंभीच त्याच्या प्रास्ताविकेत नमूद करण्यात आलेला आहे. त्यात स्पष्ट करण्यात आलेले आहे की, आपण येणाऱ्या काळात आपल्या देशाला तसेच देशवासीयांना कशाप्रकारे बघू इच्छितो. आता या प्रास्ताविकेत काय आहे, ते आपण जसेच्या तसे पाहुया... उद्देशिका आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम, समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :


सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य; दर्जाची व संधीची समानता; निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून; आमच्या संविधानसभेत आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण करत आहोत.

केवळ मोजक्याच ७५ समर्पक शब्दांमध्ये आपल्या संपुर्ण संविधानाचा सारांश प्रास्ताविकेत मांडण्यात आलेला आहे. ती वाचल्यानंतर आपल्या लक्षात आलेच असेल, की ती एक प्रकारे 'तीन भागांमध्ये' विभागलेली आहे.

१ ) हा संकल्प कोण करतंय ?,

२ ) आपला भारत देश कसा बनवणार ?, आणि ३ ) देशाच्या नागरिकांना काय देणार ? आपण एकेक करुन हे तीनही भाग समजून घेऊया...




१ ) हा संकल्प कोण करतंय ?:-

आपल्या प्रास्ताविकेची सुरुवातच "आम्ही भारताचे लोक.." अशी आहे. हा एक खूप व्यापक अर्थ असलेला 'शब्दसमूह' आहे. 'अमेरिकेच्या संविधानात' सर्वप्रथम ह्या शब्दसमूहाचा वापर करण्यात आला. आपल्या देशाच्या संविधान निर्मितीवेळी प्रास्ताविकेची सुरवात कोणत्या शब्दाने करावी, याबाबत अनेक मतेमतांतरे होती. शेवटी याबाबत मतदान घेऊन कोणत्याही धार्मिक बाबींशी संबंधित शब्द न जोडता, "आम्ही भारताचे लोक.." ह्या शब्दसमूहानेच प्रास्ताविकेची सुरुवात करण्यात यावी, हे ठरवण्यात आले.

आता "आम्ही भारताचे लोक.." या शब्दाची व्यापकता काय आहे ? तर आम्ही भारताच्या लोकांच्या नावाने काही संकल्प करीत आहोत. आपल्या देशाच्या संविधान निर्मिती मागे जी 'प्रेरणादायी शक्ती' आहे, ती म्हणजे 'भारताची जनता' आहे. या संविधानातील जो काही संकल्प आहे, तो आम्ही भारतीयांनी केलेला आहे. शिवाय 'ही' सुरुवात देशाच्या एकता आणि एकात्मतेच्या भावनेचे दृढीकरण देखील करणारी आहे. ह्या तीन शब्दातच आम्ही सर्व फक्त 'भारतीय' आहोत आणि फक्त भारतीय म्हणूनच हा संकल्प करतोय, ही भावना वृद्धिंगत होते. इथे कोणत्याही धर्माचा संदर्भ नसून सर्वजण फक्त 'भारतीय' या नात्यानेच एकत्रितपणे उद्याचा भारत घडविण्याचा संकल्प करत आहोत.

याचा आणखी एक व्यापक अर्थ असा आहे की, भारतीय संविधानाने भारतीय नागरिकांना जे हक्क आणि अधिकार बहाल केलेले आहेत, ते कोणा राजा-महाराजा वा बादशहाने उदार होऊन दिलेले नाहीत. तर हे अधिकार म्हणजे, आम्ही भारतीयांनीच एकमेकांच्या माणूसपणाला दिलेली मान्यता आहे. यातील क्रांतिकारी आशय नीट लक्षात घेऊन, आपण भारतीयांनी एकमेकांसोबत जगण्याची आणि विकासाच्या दिशेने एक साथ पुढे पुढे जाण्याची सवय आपल्याला लावून घेतली पाहिजे.

# डॉ. सुभाष बागल यांचा एक मौलिक ग्रंथ

आधुनिक केसरी

**'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने: एक दृष्टिक्षेप' हा डॉ. सुभाष बागल यांचा अत्यंत मौलिक असा पाचवा समीक्षा ग्रंथ. संमेलनाध्यक्षांची भाषणे हा त्यांचा सततचा अभ्यासाचा, संशोधनाचा आणि जिव्हाळ्याचा विषय राहिला आहे. प्रस्तुत ग्रंथात डॉ. बागल यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने भरविण्यामागील उद्देश आणि विविध संमेलनांमधून घेतल्या गेलेल्या विविधविषयासंबंधीच्या भूमिका यासंबंधीचे विस्तृत मांडणी केलेली आहे. संमेलने भरविण्यामागील पार्श्वभूमी, साहित्य संमेलने कशासाठी ? , संमेलन भरविण्यासंबंधी म. ज्योतीराव फुले यांची भूमिका यासारखे महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने ज्या इंग्रजी कालखंडात घेतल्या गेली ती कुठल्या परिस्थितीमध्ये घेण्यात आली?**

, त्याची गरज का पडली यासंबंधीची मांडणी प्रारंभीच केली आहे. १८१८ ला पेशवाई अस्तंगत होऊन इंग्रजी अमल सुरू झाला. सत्ता प्रस्थापित झाल्यावर इंग्रजांनी भारतातील पारंपरिक भारतीय शिक्षण बंद करून 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' ची स्थापना करून शिक्षणासाठी इंग्रजीला अधिक महत्त्व दिले. इंग्रजी शाळा, इंग्रजी महाविद्यालय काढून इंग्रजी भाषा आणि साहित्य याचा त्यांनी जाणीवपूर्वक आग्रह धरला. त्याची अंमलबजावणी केली. त्यासंबंधी डॉ. बागल म्हणतात 'साहित्य संमेलने सुरू होण्यापूर्वीच्या कालखंडात इंग्रजी भाषा, साहित्य, संस्कृती व इंग्रजी पद्धतीच्या जगण्याला प्रचंड महत्व प्राप्त झाले होते. इंग्रजी भाषेची प्रतिष्ठा गगनाला पोहोचली होती. मुंबई, पुणे, पनवेल, ठाणे, रत्नागिरी या इलाख्यात जिकडे तिकडे इंग्रजी माध्यमाच्या शाळा दृष्टीस पडत होत्या. म्हणून इंग्रजी भाषेचा प्रभाव पडणे साहजिकच होते. त्यातून बऱ्याच मंडळींनी इंग्रजी भाषेचे महत्त्व लक्षात घेऊन इंग्रजी भाषेची तरफदारी करण्याचा प्रयत्न केला. एकूणच मराठी भाषेच्यासाठी हे वातावरण फारसे उत्साहवर्धक नव्हते. अशा कालखंडात न्या.महादेव रानडे, लोकहितवादी व त्यांच्या समविचारी मित्रांनी 'ग्रंथौत्तेजक मंडळ' या नावाने मंडळ स्थापन केले. आणि या मंडळाच्या वतीने ग्रंथकार संमेलन आयोजित केले गेले.

पहिले ग्रंथकार संमेलन पुण्यामध्ये १८७८ ला भरल्या गेले. प्रारंभीचे सर्वच ग्रंथकार संमेलन पुण्यात भरल्या गेली. प्रारंभीच्या संमेलनामध्ये ज्यां ग्रंथकारांना म्हणून निमंत्रित करण्यात आले होते त्यांच्यामध्ये ग्रंथकार म्हणून व समाज धुरिण व अस्पृश्यांचे कैवारी म्हणून महात्मा ज्योतिराव फुले यांनाही निमंत्रित केले होते. महात्मा फुले, लोकहितवादी आणि न्यायमूर्ती रानडे सर्व समाजसुधारक होते. परंतु सामाजिक सुधारणा करताना स्विकारावयाचा अग्रक्रम कोणता याविषयी म. फुलेंचा वेगळा दृष्टीकोन होता. म्हणून म. फुले यांनी ग्रंथकार समेलनास जाण्यास नकार कळवून तसे पत्र संमेलन आयोजकांना पाठविले. म. फुले यांच्या नकाराचा अर्थ यादृष्टीने लावला पाहिजे. ग्रंथकारांना एकत्र आणण्यासाठी म. फुलांचा विरोध होता का ? तर नव्हता. फुल्यांना सर्व जाती-धर्माच्या समाजाला प्रथम मानसिक आंतरिक पातळीवर एकत्र आणण्यात रस होता. केवळ ग्रंथ विक्री आणि ग्रंथ प्रसार करण्यात नव्हता. आणि तत्कालीन परिस्थितीत सामाजिक जीवनात तो पावेतो तरी वर्णभेद- जातीभेदाच्या भिंती नष्ट झालेल्या नव्हत्या. या भेदाच्या कवच्यासह एकत्र येण्यात स्वारस्य नव्हते, याची विस्ताराने मांडणी डॉ. बागल यांनी म. फुले यांच्या पत्राचा उल्लेख करून केलेली आहे. त्यासंबंधी म. फुले यांनी , एकंदर सर्व मानवी प्राण्यांस परस्पर अक्षय बंधुप्रीती काय केल्याने वाढेल, त्याचे बीज शोधून काढावे व ते पुस्तकाद्धारे प्रसिद्ध करावे, असे सुचविले आहे. मात्र आपले आणि संमेलनाचे आयोजक व संमेलन याविषयी काही मूलभूत वैचारिक मतभेद असल्याचे कळून त्यांनी संमेलनास उपस्थित न राहण्याचा मानस कळविला ही घटना तत्कालीन परिस्थितीत संमेलन योजनामागील भूमिका या दृष्टीने महत्त्वाची होती. याचा तपशिलाने उहापोह डॉ. बागल यांनी या ग्रंथामध्ये केलेला आहे.




डॉक्टर सुभाष बागल यांनी या ग्रंथाची मांडणी जरी ऐतिहासिक पद्धतीने केलेली असली तरी आणि प्रारंभीच्या भागात तसा विस्तार आणि तपशील दिला असला तरी या ग्रंथाचा हेतू इतिहास कथन करणे हा नाही; तर या संमेलनाचे उद्देश व त्याच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट करणे हा आहे. आणि तो तपशील या संदर्भातला अभ्यास करणाऱ्यांना अत्यंत उपयुक्त व पायाभूत ठरणारा आहे. हे एक मोठेच काम आहे असे म्हटले पाहिजे. संमेलने भरविण्यामागे त्या अनुषंगानेच काही उद्देश ठरविण्यात आले होते. उदाहरणार्थ, मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी प्रयत्न करणे, मराठी भाषेची अभिवृत्ती करणाऱ्यामध्ये एकीकरण घडून आणणे, देशात ग्रंथ प्रचार आणि प्रसार व्हावा, वाचकांना कमी किमतीत ग्रंथ मिळावेत, विकत घेता यावेत म्हणून सहकार्य करावे, स्वतंत्र ग्रंथ निर्मिती करणाऱ्या, लेखन करणाऱ्या ग्रंथकारांनी एकत्र जमावे, लेखन किंवा ग्रंथ यांना प्रसिद्धी द्यावी, या सर्व कामात सुसूत्रता निर्माण करून त्याच्या उत्क्रांतीविषयक जाणीवा समृद्ध व्हाव्यात, ग्रंथकारांच्यामध्ये परस्परात सुसंवाद व विचार विनिमय घडावा, आणि एकूणच राष्ट्रीय आकांक्षांच्या पूर्तीसाठी संमेलनालाही एक सुसंघटीत स्वरूप प्राप्त व्हावे इत्यादी प्रमुख उद्देशाने ही संमेलने भरत होती. अर्थात काही प्रसंग, घटना, परिस्थिती यातूनही या उद्देशात भर पडत होती. अर्थातच त्यामागे व्यापक समाजहित अपेक्षित होते.

या संमेलनाच्या आयोजनामागे जसे काही उद्देश होते तसेच संमेलनाच्यांमधून विविध स्वरूपाच्या भूमिकाही घेतल्या गेल्या होत्या. उद्देशांच्या पूर्तीसाठी अशा भूमिका असाव्याच लागतात. अर्थात उद्देश बदलले की भूमिकाही बदलतातच. या संदर्भात डॉ. बागल लिहितात, 'प्रत्येक ग्रंथकार संमेलनांतून भाषेच्या वृद्धीसंबंधी, वाङ् :मय विकासासंबंधी आणि एकूणच वाङ् :मय व त्यानुषंगाने इतर प्रश्नांच्या संबंधी विशिष्ट भूमिका ठरविण्यात आल्याचे दिसते. उद्देशपूर्तीसाठी त्याची आवश्यकता होती. पुढे जसे जसे उद्देश बदलत गेले तसतसे संमेलनाचे कार्यक्षेत्र बदलत गेले. असे असले तरी, बऱ्याच कार्याच्या बाबतीत संमेलनाची समान भूमिका राहत आल्याची दिसते. साहित्य संमेलनांचे काही उद्देश हे सर्व संमेलनातून समान आणि एकच भूमिका राहात आलेली दिसते. साहित्य संमेलनाच्या भूमिका ही साहित्य संमेलनाचे कार्यक्षेत्र राहत आलेली आहे.'

डॉ. देवकर्ण तुळशीराम मदन
छत्रपती संभाजीनगर
दुरभाष्य -9422532375

असे असले तरी काही प्रमुख भूमिकांमुळे संमेलनाची उंची व महत्त्व लक्षात येते. मराठी भाषाभिवृद्धीच्या संदर्भात काही ठाम व ठोस भूमिका घेणे हे इथे अपेक्षितच होते. साहित्य संमेलन हे केवळ भाषेचा विचार करण्याचे स्थान असत नाही; तर त्याचा संबंध थेट जीवनाशी, समाजाशी आहे. म्हणून जीवनात, देशात, राज्यात निर्माण होणारे राजकीय स्वरूपाचे प्रश्नही नजरेआड करून चालणार नाही. साहित्यिक हा समाज घडणीतला महत्त्वाचा सृजनशील व बुद्धिमान प्रतिभावंत असतो. म्हणून केवळ राजकीय प्रश्न आहे म्हणून त्याला बाजूला कसे करणार ? त्याच्या सोडवणुकीत स्वतःची काही भूमिका निभवावीच लागेल . उदाहरणार्थ भाषावार प्रांतरचना, राज्याचा सिमाप्रश्न. राज्याच्या संदर्भातले काही प्रश्न असेल, राज्याराज्यामधील सीमा वादाचा प्रश्न असेल, द्विभाषिक मुंबई राज्याची कल्पना असेल यासंबंधी संमेलनांध्यक्षांनी वेळोवेळी आपल्या भूमिका जाहीर केलेल्या आहेत.

डॉ. बागल यांनी ग्रंथकार संमेलनाच्या आयोजनाची विस्तृत पार्श्वभूमी देत पुढील संमेलनाची वाटचालही विस्ताराने मांडली आहे. आजच्या काळात काही राजकीय बाबतीतल्या चर्चा घडत असल्यातरी, काही वाङ्: मय बाह्य बाबी संमेलन आयोजनाच्या वेळी घडत असल्या वा संमेलनांना उत्सवाचे स्वरूप आले असले तरी मराठी भाषा, साहित्याच्या अभिवृद्धीसाठी, विविध विषयावरील प्रश्नासंबधी समेलनांमधून चर्चा घडून येते. संमेलनाच्या फलश्रुतीचीही विस्तृत चिकित्सा त्यांनी या ग्रंथात केली आहे. त्याचबरोबर प्रत्येक संमेलनाप्रसंगी मराठी भाषाविषयक, विकास व अभिवृद्धीविषयक, वेळोवेळी जे प्रश्न महत्त्वाचे वाटले अनुषंगाने संमेलनांतून चर्चेच्या माध्यमातूनही मांडणी करीत होते अशी भूमिका मांडलेली आहे.

या ग्रंथात डॉ. बागलांनी साहित्य संमेलनाचे समर्थन दर्शक विधाने नोंदविले आहेत. ती सगळी विधाने पुन्हा उध्दृत करण्याची गरज नाही. परंतु काही संमेलनांध्यक्षांची निवडक विधाने उध्दृत करण्याचा मोह आवरत नाही. 'मराठी साहित्य संमेलन भाषेच्या अभिवृद्धीसाठी आहे.' असे शि.म. परांजपे यांनी १९२९ च्या संमेलनात म्हटले होते. आणि त्या हेतूनच प्रयत्नांचे एकीकरण व्हावे, त्यात एकसूत्रीपणा यावा,आशा- आकांक्षांना सुसंगतीत प्रयत्नांचे स्वरूप प्राप्त व्हावे अशी आशा व्यक्त केली होती. हे विधान त्यांनी स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी केले होते.हे लक्षात घेतले तर त्याचे मोल अधिक कळेल.

'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनेः एक दृष्टिक्षेप' या ग्रंथाच्या निमित्ताने दिग्गज, विद्वान, विचारवंत यांनी त्या त्या प्रसंगाचा, काळाचा, काळातील घटनांचा लोकमानसाचा शोध घेऊन संमेलनाध्यक्ष म्हणून जी भाषणे केली, विचार मांडले ते विचार प्रवर्तक तर आहेतच पण त्यामुळे एकूण मराठी वाङ् :मयातही मोलाची भर टाकली. त्या त्या काळातील अनेक नवीन प्रतिभावंत साहित्यिकांचा परिचय साहित्य क्षेत्राला या संमेलनांच्यामुळे झाला ही संमेलनाची मोठी देणगी आहे. डॉ. बागल यांनी एका गंभीर व वाङ् :मय प्रेमींच्याच्या, अभ्यासकांच्या दृष्टीने महत्वाच्या विषयावर हा ग्रंथ संपन्न केला आहे हे अत्यंत स्वागतार्ह आहे. डॉ. बागल यांनी त्याचा चिंतनाच्या पातळीवर अभ्यास केलेला आहे. हे काम जिकरीचे व अत्यंत परिश्रमाचे आहे यात शंका नाही. पण असे परिश्रम घेण्याची क्षमता निश्चितच त्यांच्यात आहे.

खरे सांगायचे तर संमेलनाध्यक्षांच्या अध्यक्षीय भाषणांचा अभ्यास करण्यासाठी अभ्यासकाला जीवनाच्या ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक वैचारिक, वाङ् :मयीन आणि सांस्कृतिक ह्या बरोबरच भाषाशुद्धी करण, विविध प्रकारचे कोशवाङ् :मय, तौलनिभाषाविचार यांची डोळस जाण असावी लागते. मराठीतील प्रबोधनपर साहित्य इतिहासाकडे पाहण्याचा अभिनव दृष्टिकोन असावा लागतो. तसेच भारतीय आणि पाश्चात्य साहित्यशास्त्रातील साहित्य सिद्धांताबरोबरच मराठीतील मौलिक साहित्य सिद्धांताचीही ओळख असावी लागते. त्यातल्या त्यात मराठी भाषा, साहित्य, संस्कृती यांच्या विषयी विलक्षण आस्था, जिव्हाळा आणि प्रेम असावे लागते. डॉ. सुभाष बागल यांनी या आणि अशा प्रश्नांचं आव्हान पेलून धरण्यात मोठे यश संपादन केले आहे.

प्रस्तुत ग्रंथात वेळोवेळी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी विराजमान झालेल्या मराठीतील दिग्गज साहित्यिकांच्या वाङ् :मयीन आणि सांस्कृतिक व्यक्तिमत्त्वाचा जो परिचय घडतो तो विलोभनीय स्वरुपाचा आहे. मध्ययुगीन आणि आधुनिक मराठी साहित्याचा गांभीर्यपूर्वक विचार केला तर ते हिमालयाच्या उंचीच्या आहे असे ठामपणे म्हणता येते. आणि उपरनिर्दिष्ट विचारवंत आणि साहित्य विचारवंत याच परंपरेतील आहेत. मात्र या अध्यक्षांमध्ये ब्राह्मण्यत्तर मंडळी किती ? असा प्रश्न पडतोच. आणि याचे उत्तर कदाचित विविक्षित स्थल- काल- परिस्थितीत सापडू शकेल. त्याचा शोध घेऊन प्रस्तुत ग्रंथात संमेलनांची प्रयोजन आणि फलश्रुती विशद केलेली आहे. ती मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीच्या संवर्धनासाठी व अभिवृद्धीसाठी प्रेरणादायी ठरणारी आहे.

डॉ. बागल यांनी आपल्या समग्र अभ्यासाची मांडणी एका विविक्षित संवेदन पद्धतीने स्व-पर- तटस्थ निरपेक्षतेने, विनम्रतेने आणि तेवढ्याच आत्मविश्वासाने केलेली आहे. साहित्याच्या प्रत्येक रसिक वाचकांनी आस्थापूर्वक अभ्यासावा असा हा ग्रंथ आहे. या ग्रंथाच्या अभ्यासाने आपल्या अनुभवविश्वात मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती विषयक मूल्यांची भर पडून ती अधिकाधिक समृद्ध होत जाईल याच शंका नाही.

' अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने : एक दृष्टिक्षेप '

**लेखक : डॉ. सुभाष बागल**

**स्वरूप प्रकाशन पुणे, पृष्ठ १९६, किंमत २५०**

# 'रे आभाळा... ': वेदनेची आर्त ललकारी

आधुनिक केसरी

**रामकली पावसकर या मराठीतील महत्त्वाच्या कवयत्री आहेत. त्यांचे हंबर(१९८५), ओले अथांग श्वास(२००८), सांजसावल्या (२०१५) , पावळण (२०१९) हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. आता त्यांचा 'रे आभाळा... ' हा कवितासंग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे. 'आभाळ' या घटकाशी संवाद साधणारी कविता या कवितासंग्रहात आहे. तरीही हा संवाद एकतर्फी नाही; तर आभाळ जरी बोलत नसले तरी कवयत्री त्याला पूर्णपणे समजून घेते. इथे आभाळ हे एक व्यक्तीरेखा बनुन साकार होते. आभाळ ही प्रतिमा समर्थपणे प्रतिकाचे रूप घेत असल्याचे येथे दिसते. कवितेतील आभाळ सहचर बनते. तरी हे सहचर्य स्मरणातील असते.त्यामुळे त्याचा प्रत्यक्ष संवादात सहभाग नसतो. विरहार्ततेची वेदनवेल वाचकांच्या मनःपटलावर कवितेच्या शब्दाशब्दातुन चढत जाते.**

रे आभाळा...मधील कविता दोन भागात विभागलेली तरी एकाच अंतस्थ लयीची आहे. पहिल्या भागातील कविता तुलनेने किंचितशी अधिक शब्दांची असुन भावविभोर आहे. इथे कवयत्री तिच्या आभाळाशी मनोमन संवाद साधते. हे आभाळ दूर गेलेले आहे. अगदी दिशाहीन होऊन गाभूळ जीव झाडावरती टांगणीला लागून रहावा , भवती सारा काळोखच व्यापून असावा अशावेळी डोळे ओलावले, पापण्या भिजल्या आणि हृदयीच्या निथळल्या कहाण्या कुणाला सांगाव्या ? असा विषण्ण आणि विरही भावनेचा हळवा तरीही पारखा झालेल्या आभाळारूपाला प्रश्न विचारणारी, त्याच्याशी संवाद साधणारी, अंतरीची सल त्याच्या स्मरणाजवळ व्यक्त करणारी ही कविता आहे.

**'पदरांत माझ्या**
**नाहीच काही आज...**
**तरी देऊ का काही...**
**विचारते मला**
**रोज ढळणारी सांज...!'**

पदरात तर काहीच शिल्लक नाही आणि सांजही ढळलेली आहे. ती प्रश्नही विचारते आहे. सारा चराचरच प्रश्न विचारतोय, आवाज देतोय पण तो आवाज आश्वासक नाही.

**'झाडाचं गाणं**
**झाडात दाटलं...**
**स्वरांनी त्याच्या**
**आभाळ फाटलं...**
**आभाळ फाटलं...!!'**

अशावेळी आपल्या गाठीच्या कहाण्या कुणाला सांगाव्या, त्यांची कुठे रुजवण करावी असा अवघड प्रश्न कवयत्रीच्या मनाला जातो.

**'आता कुठे रूजवू**
**नव्या कहाण्या... ?'**

अशा न संपणाऱ्या असंख्य प्रश्नांनी छळले तरी बरेच दिवस सरले, पावसाळे गेले तरी जिच्यासाठी आपण चालणे सुरू केले होते ती हिरवळ सापडली का ? असा प्रश्न कवयित्री विचारते तेव्हा तो प्रश्न तिच्या एकटीचा थोडाच असतो. माणूस म्हणून आपणा सर्वांना छळणारा तो प्रश्न असतो. या प्रश्नांच्या मुळाशी असणारी एकाकी वेदना अनामिक असते. कवयत्री आभाळाला विचारतेः

**'तुला वाटत राहिलं**
**वस्त्र किती मुलायम...**
**पण तुला काय माहीत**
**तुझ्या उबदारपणासाठी**
**मीच किती तरी**
**रक्ताळत राहिले**
**ठायी ठायी....'**

पण आता ती विरह आणि अगतिक आहे. तिला वाटते की ती दिशाहीन आहे. तिला आभाळाचा आधार हवा आहे.

**'दिशाहीन आता मी**
**कुठं मागू आसरा...!'**

'माझ्यासाठीच जगलास , माझ्यासाठीच परत ये रे...' या ओळीतून प्रकट होणारी भावार्तता आणि त्याच जोडीने 'त्याला' समजून घेण्याची उदारता एकाचवेळी प्रकट होते. मनाच्या अनाम दिशाहिनतेची अवस्था काही कवितेतून प्रत्ययास येते. तर कधी सहजीवनाच्या यथार्थतेची परिसीमा अनुभवावयास येते.

**उदा :**

**'फुलं म्हणाली उमलू कां.. ?**
**मी म्हणाले...**
**नको रे...**
**तो नाही...**
**खुप दूर गेलाय**
**तुमच्या सुगंधाचं**
**मी काय करूं एकटी... ?**
**त्यापेक्षा मौनातच रहा...**
**मौनातच रहा...**
**माझ्यासारखं...**
**माझ्यासाठी... !!'**

अशी मनोज्ञ कविता पहिल्या भागात वाचायला मिळते. दुसऱ्या भागातील कविता वाचतांना तिचे अल्पाक्षरत्व नजरेत भरते. या भागातील कवितेमधील आभाळ काही सांगितले तर गदगदून येऊ शकेल असे, व्याकूळ मनाचे हाकारे ऐकणारे आहे, कधी ते पापण्यातून झरणारे नि कधी साशंक होणारेही आहे. सहाजिकच भरून आलेले ढग बरसलेच नाहीत तरीही त्याच्या सच्चेपणावर कवयत्रीचा भरवसा आहे.

**'ना घरटं ना कोटं**
**समोर**
**नुस्तं नुस्तं**

**उद्ध्वस्त**
**वाटायचं**
**जंगल**
**मोठ्ठं**
**रे,**
**आभाळा**
**उद्ध्वस्त**
**वाटायचं**
**जंगल मोठ्ठं...'**

आभाळाला वगळून जीवन केवळ अशक्य! श्वासांची घुसमट होते, ती लपवताही येणे अशक्य आहे.

**'गेले सारे**
**श्रावण**
**नाही भिजू झालं**
**मन**
**किती ओंजळीत**
**लपवू**
**श्वासातील**
**घुसळण**
**रे, आभाळा...!'**

एकुणच 'रे आभाळा...' या संग्रहातील कवितेत वेदनेने आतड्याला पीळ पाडणारी नि व्याकुळता वाढवणारी आर्त पुनरुक्ती अनुभवास येते. अशावेळी ही कविता केवळ कवयत्री पुरती मर्यादित उरत नाही तर वाचकाचीही होत जाते. ही आत्मपर अनुभूतीची असली तरीही वाचकांना आपली वाटणारी आहे. अल्पाक्षरी, संवादी, साध्या शब्दांची, भावनेला हात घालणारी, एक अगतिकता, व्याकूळ तगमग व्यक्त करणारी, विरहाचा दाह पेरणारी, हृदयाच्या वीणेला दुःखाचा झणत्कार देणारी ही कविता आजच्या जागतिकीकरणोत्तर काळातील स्त्रीयांच्या शब्दबंबाळ नि गद्यप्राय, परानुभवावर बेतलेल्या कवितेहून वेगळी नि सच्च्या अनुभूतिची भिडणारी कविता आहे. रामकली पावसकर यांची या संग्रहातील कविता शब्दाळलेली किंवा शब्दबंबाळ तर नाहीच, ती प्रचारकी किंवा नाटकी ही नाही. ती अल्पाक्षरी, भावव्याकूळ करणारी खोल कविता आहे. त्यामुळे आजच्या मराठी कवयत्रींच्या कवितेहून जराशी वेगळी, काळजाला भिडणारी कविता आहे हे आवर्जून नमुद केले पाहीजे. वाचकांच्या मनाला ही कविता स्पर्शून जाईल, हे नक्की!




रे आभाळा... : कवितासंग्रह
कवयत्री : रामकली पावसकर
प्रकाशक : डिंपल पब्लिकेशन्स, मुंबई
प्रथमावृत्ती : २६ जानेवारी २०२२
पृष्ठे :८८ मूल्य : १२० मुखपृष्ठ : सरदार जाधव.

( लेखक कवी, कादंबरीकार व साहित्य अभ्यासक आहेत. )

**डॉ. कैलास दौंड, मु. सोनोशी पो. कोरडगाव ता. पाथर्डी जि. अहमदनगर.Email id : kailasdaund@gmail.com**
**भ्रमणध्वनी : ९८५०६०८६११**

# विधानसभा अध्यक्षांनी नि:पक्ष निर्णय घेण्याची गरज



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**नुकतेच, सर्वोच्च न्यायालयाने, महाराष्ट्र विधानसभेतील आमदारांच्या अपात्रतेशी संबंधित प्रकरणावर निकाल दिला आहे.राज्यातील सत्ता संघर्षावर अखेर सुप्रीम कोर्टाने निकाल दिला आहे. १६ आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय विधानसभा अध्यक्षांकडे सोपवण्याचा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिला आहे. सुप्रीम कोर्टाच्या या निर्णयाने शिंदे सरकार वाचलं आहे. त्यामुळे आता राहूल नार्वेकर यांच्याकडे आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय असेल. या पार्श्वूमीवर विधानसभा अध्यक्षांना निःपक्षपाती निर्णय घ्यायचा आहे.सदस्यांच्या अपात्रतेच्या अनेक प्रकरणांमध्ये अध्यक्षांनी पक्षपात करून निर्णय दिलेला आहे.अध्यक्ष पिठासिंन अधिकारी असतात. घटनेच्या तत्वाची पायमल्ली होणार नाहीं,याकडे लक्ष देण्याची गरज आहे. पक्षपातीपणाच्या आरोपावरून अनेक वेळा लोकसभा आणि विधानसभा अध्यक्षांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले आहेत.**

लोकसभा आणि विधानसभेचे सभापती विशिष्ट राजकीय पक्षाशी संबंधित असल्याने ते नेहमीच संशयाच्या भोवऱ्यात असतात. अध्यक्षपदाशी संबंधित वरील वाद पाहता या पदाबाबत निःपक्ष निर्णय घेण्याची गरज आहे. विशेष म्हणजे विधानसभा अध्यक्षांच्या भूमिकेवरही सर्वोच्च न्यायालयाने ताशेरे ओढले आहेत. या परिस्थितीत विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना निर्णय घ्यायचा आहे. पण हे करत असताना सर्वोच्च न्यायालयाने आपलं स्पष्ट मत निकालपत्रात दिलं आहे आणि याकडे अध्यक्षांनाही दुर्लक्ष करता येणार नाही, असं घटनातज्ज्ञ सांगतात.

आमदारांना अपात्र ठरवण्यापूर्वी विधानसभा अध्यक्षांना राजकीय पक्ष नेमका कोणत्या गटाचा आहे हे ठरवण्याची सूचना करण्यात आली आहे. यासाठी शिवसेना पक्षाची घटना आणि त्यातील तरतूदींचा विचार अध्यक्षांना करावा लागेल. यानुसारच पक्षाचा नेता कोण हे ठरेल. महत्त्वाचे म्हणजे अध्यक्षांनी आपला निर्णय या आधारावर करू नये की, कोणत्या गटाकडे बहुसंख्य आमदार आहेत. हा संख्यांच्या खेळ नाही तर याहून अधिक काही बाबी आहेत असंही निकालात म्हटलं आहे. यामुळे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना शिवसेनेच्या दोन गटांपैकी कोणाकडे सर्वाधिक आमदार आहेत या आधारावर पक्ष कोणाचा हा निर्णय घेता येणार नाही का ? हा सुद्धा मुद्दा उपस्थित होतो. सर्वोच्च न्यायालयाने निकालपत्रात म्हटलेला प्रत्येक शब्द आणि त्याचा कायदेशीर अर्थ पाहता या चौकटीतच राहुल नार्वेकर यांना आमदारांच्या अपात्रतेचा आणि राजकीय पक्षाचा निर्णय घ्यावा लागणार आहे. भारतीय संसदीय प्रणालीतील स्पीकर संसदेच्या प्रत्येक सभागृहाचा स्वतःचा पीठासीन अधिकारी असतो. राज्यसभेत त्याला सभापती आणि लोकसभेत सभापती म्हणतात. त्याचप्रमाणे राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहाचा स्वतःचा पीठासीन अधिकारी असतो. विधानसभेत त्याला सभापती आणि विधानपरिषदेत सभापती म्हणतात. भारतीय संसदीय लोकशाहीमध्ये स्पीकरची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली गेली आहे.

लोकसभेच्या अध्यक्षांच्या संदर्भात, भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले होते की "स्पीकर हा सभागृहाच्या प्रतिष्ठेचे आणि त्याच्या स्वातंत्र्याचे प्रतिनिधित्व करतो आणि सभागृह राष्ट्राचे प्रतिनिधित्व करत असल्याने, अध्यक्ष एक प्रकारे स्वातंत्र्याचे प्रतीक आहे आणि राष्ट्राचे स्वातंत्र्य." आहे."सभागृहाचा अध्यक्ष हा सभागृहाच्या प्रतिनिधींचा प्रमुख असतो आणि त्यांच्या अधिकारांचा आणि विशेषाधिकारांचा संरक्षक असतो.भारताच्या राजकीय इतिहासात अशी अनेक महत्त्वाची उदाहरणे आहेत, ज्यामध्ये सभागृहाच्या अध्यक्षांनी महत्त्वाचे निर्णय घेऊन राज्याच्या किंवा राष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव टाकलेला आहे. १९८८ मध्ये तामिळनाडू विधानसभेचे अध्यक्ष पी.एच. पांडियन यांनी त्यांच्याच पक्षातील सहा ज्येष्ठ मंत्र्यांना अपात्र ठरवले होते - AIADMK.



भारतीय राज्यघटनेच्या कलम ९३ मध्ये लोकसभेच्या अध्यक्ष आणि उपसभापतींच्या नियुक्तीची तरतूद आहे, तर घटनेच्या कलम १७८ मध्ये विधानसभेचे अध्यक्ष आणि उपसभापती यांच्या नियुक्तीची तरतूद आहे. घटनेच्या कलम ९४मध्ये लोकसभेचे अध्यक्ष आणि उपसभापती यांची रिक्त पदे, राजीनामा किंवा काढून टाकणे संबंधित आहे, तर घटनेच्या कलम १७९ मध्ये विधानसभेचे अध्यक्ष आणि उपसभापती यांची रिक्त जागा, राजीनामा किंवा काढून टाकणे संबंधित आहे. पदावरून दूर करण्यासंबंधीच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत.

कलम ९५ मध्ये उपसभापती किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला लोकसभा अध्यक्ष म्हणून काम करण्याचे किंवा त्यांचे कर्तव्य पार पाडण्याचे अधिकार दिले आहेत, तर कलम १८० अन्वये, विधानसभेच्या अध्यक्षांना त्याचे कार्य करण्याचे किंवा कार्य करण्याचे अधिकार आहेत. कर्तव्ये नमूद केली आहेत.उपाध्यक्ष किंवा इतर कोणत्याही व्यक्तीचे अधिकार नमूद केले आहेत. घटनेच्या अनुच्छेद ९६ ( लोकसभेशी संबंधित ) आणि कलम १८१ ( विधानसभेशी संबंधित ) नुसार, जेव्हा त्याला पदावरून दूर करण्याचा प्रस्ताव विचाराधीन असेल तेव्हा सभागृहाचे अध्यक्ष अध्यक्ष होऊ शकत नाहीत. संविधानाच्या अनुच्छेद ९७ मध्ये लोकसभा अध्यक्ष आणि उपसभापती यांच्या वेतन आणि भत्त्यांबाबत आणि कलम १८६ मध्ये विधानसभेचे अध्यक्ष आणि उपसभापती यांच्या वेतन आणि भत्त्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. अध्यक्षाची भूमिका सभागृहाचा अध्यक्ष हा सभागृहाचा मुख्य प्रवक्ता असतो आणि सभागृहातील सामूहिक मताचे प्रतिनिधित्व करतो.

स्पीकरचा निर्णय अंतिम आहे आणि दहाव्या अनुसूची अंतर्गत अपात्रतेच्या प्रकरणांसह सर्व संसदीय बाबींसाठी बंधनकारक आहे, ज्यांना सामान्यतः न्यायालयात आव्हान दिले जाऊ शकत नाही. त्यामुळे सभापतीही सभागृहात मध्यस्थ म्हणून काम करतात.

तथापि, किहोतो होलोहान वि. झचिल्लू प्रकरणात ( १९९३ ), सर्वोच्च न्यायालयाने असे मानले की दहाव्या अनुसूची अंतर्गत सदस्यांच्या अपात्रतेबाबत सभागृहाच्या अध्यक्षांच्या निर्णयाला न्यायालयासमोर आव्हान दिले जाऊ शकते. सभागृहाचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी आणि नियमन करण्यासाठी सभागृहात सुव्यवस्था आणि सजावट राखण्याचे कामही सभापती करतात. सभापतींना चर्चेसाठी कालावधी देण्याचा आणि सभागृहातील सदस्यांना शिस्त लावण्याचा अधिकार आहे. यासोबतच घराच्या विविध समित्यांनी घेतलेले निर्णयही तो रद्द करू शकतो. सभागृहाचे अध्यक्ष हे सभागृहाच्या कामकाजाशी संबंधित नियमांचे अंतिम दुभाषी देखील असतात. पक्षपाताचा आरोप सभापतींच्या कार्यालयासोबत आलेल्या सर्व अधिकार आणि अधिकारांमुळे या कार्यालयासाठी स्वातंत्र्य आणि निःपक्षपातीपणा ही अत्यावश्यक स्थिती बनली आहे. मात्र असे असतानाही वेळोवेळी सभापतीपदावर राजकीय पक्षाचे एजंट असल्याचा आरोप करून टीका केली जाते. २००६ मध्ये जगजित सिंग विरुद्ध हरियाणा राज्य प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने निःपक्षपातीपणाच्या बाबतीत सभापतींच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. किहोतो होलोहान वि. झचिल्लू प्रकरणात ( १९९३ ), सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी असे मत मांडले की सभागृहाच्या अध्यक्षाची निःपक्षपातीपणा संशयाच्या बाहेर नाकारता येत नाही कारण त्याची निवडणूक आणि कार्यकाळ बहुमतावर ( किंवा विशेषतः सत्ताधारी पक्ष ) अवलंबून असतो. घर. करते. अशा प्रकारे आपण असे म्हणू शकतो की अध्यक्षांच्या नियुक्तीच्या पद्धती आणि कार्यालयाशी संबंधित काही संरचनात्मक समस्या आहेत ज्यांचे त्वरित निराकरण करणे आवश्यक आहे.



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

# इंदिरा संतांच्या कवितेतील माहेरचे वर्णन

आधुनिक केसरी

**सुप्रसिद्ध कवयित्री इंदिरा संत यांचा जन्म ४ जानेवारी १९१४ रोजी कर्नाटकातील इंडी या गावात झाला. कोल्हापूर व पुणे येथे त्यांचे शिक्षण झाले. शेला ,मेंदी, गर्भरेशीम असे अनेक काव्यसंग्रह, घुंगुरवाळा ही कादंबरी व बरेचसे कथासंग्रह अशी विपुल साहित्य संपदा लिहिणाऱ्या इंदिराबाईंचे नाव घेतल्याशिवाय मराठी कवितेला पूर्णत्व येऊ शकत नाही. त्यांच्या गर्भरेशीम या काव्यसंग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला होता. याच काव्यसंग्रहात इंदिराबाईंनी माहेरचे वर्णन करणाऱ्या अनेक कविता लिहिल्या आहेत. त्यांच्या या कवितांमधून त्यांची माहेरा विषयी असणारी ओढ, माहेराला जाण्याची आतुरता व आई-वडिलांनंतर दुरावलेल्या माहेरासाठी आसुसलेल्या सासुरवाशींच्या मनातील भावना प्रकर्षाने व्यक्त होते.**

**माहेराची वाट या कवितेत इंदिराबाई म्हणतात,**

**माहेराची वाट तिच्यावर अंथरलेली**
**निळी मलमल अशी नाजूक की,**
**पिवळ्या चिमुकल्या पिसोळीने,**
**जिच्यावरून अलगद चालत जावे...**

इंदिराबाईंना माहेराची वाट निळ्या मलमल सारखी मऊ वाटते. व जिच्यासाठी माहेरी येतात त्या आई विषयी लिहिताना म्हणतात, अशा माहेरी येते म्हणताना, जिच्यासाठी माहेर

**तिचं येते मन भरून भेटते...**
**आपल्या चंद्रकोरीतील कुंकू**
**माझ्या कपाळी टेकते...**
**फुला फळांनी ओटी भरते,**
**आशीर्वादाच्या अक्षदा भंगात टाकते..**

प्रत्येक आईचं मन हे आपल्या आईचं आपल्या लेकीचं चांगलं व्हावं असाच विचार करत असतं. इंदिराबाईंच्या आई ही आपल्या कपाळीची चंद्रकोर त्यांना लावून जणू काही लेकीला अखंड सौभाग्य लाभावं व तिची फुला फळांनी ओटी भरून तिला समृद्धी व संतती लाभावी अशा भावनाच व्यक्त करत आहेत.

असं म्हणतात जोपर्यंत आई-वडील असतात. तोपर्यंतच माहेराला माहेर- पण असतं. कवियत्री ला सुद्धा असा काहीसा अनुभव आला असावा. आई-वडिलांच्या नंतर माहेरी गेल्यावर आलेल्या दुःखद भावना त्यांनी ' मऊ रेशमाची घडी' या कवितेत व्यक्त केलेल्या आहेत. त्या लिहितात,

**ओवाळणी झाली**
**झाली जन्माची दावेदार**
**घडी राहिली बासनात**
**आणि माहेर झाले दूर...**
**भाऊबीजेची ओवाळणी**
**भाऊ दावीत मीही दंग**
**उभी मानाची वहिनीबाई**
**लाह्या फुटून झाली तंग...**

दिवाळीच्या सणाला भावाने मोठ्या प्रेमाने बहिणीला साडी आणली. व जेंव्हा तो कौतुकाने साडी दाखवत होता. तेंव्हा वहिनीला कदाचित ते आवडले नाही. तेंव्हा तिच्या जणू काही रागाने अंगाची लाही झाली. असे वर्णन कवयित्रीने केले आहे. त्यानंतर कितीतरी दिवाळ्या येऊन गेल्या परंतु पुन्हा कवयित्रीला भाऊबीज मिळाली नाही. व भावाची आठवणच मात्र सदैव मनाला येत राहीली. वहिनीच्या पुढे भाऊ मात्र मजबूर झाला. बहिणीलाही ती साडी पुन्हा कधीच नेसू वाटली नाही. कारण त्या साडीनेच तिचे माहेर तिला दुरावले होते. शेवटी त्या भावा विषयी लिहितात,

**कानाकोंड्या झाल्या भिंती**
**झळा गिळता भ्याले दार**
**गेला कोमेजून भाऊ**
**भाऊ माझा तालेवार**

भाऊ कितीही तालेवार असला व त्याला बहिणी विषयी कितीही प्रेम असले , तरीही बायकोच्या पुढे जेंव्हा त्याचे काहीच चालत नाही. तेंव्हा बहिणीलाच समजून घ्यावं लागतं. जेंव्हा कधी माहेराची ओढ लागते. तेंव्हा कवयित्री खिडकीपाशी येतात. व खिडकीच्या बाहेर दिसणारा पिंपळ जणू काही त्यांना जुन्या आठवणीत घेऊन जातो,

**असे खिडकीशीं येतां**
**मायाजाळात गुंतवितो**
**हात धरून चालवितो**
**दुजे माहेर भेटवितो...**

आपल्या माहेराचे वर्णन करताना कवियत्री लिहितात. डोंगरावर असणारे गाव कवयित्रीचे माहेर वाट बिकट व चढणीची आहे. व जेंव्हा बालपणाच्या आठवणी येतात तेंव्हा माहेराची ओढ इंदिराबाईंना लागते.

**डोंगरावरी गाव**
**वाट बिकट चढतीची**
**गळां दाटता बालपण**
**ओढ लागते माहेराची...**

लग्न होऊन सासरी आल्यावर इंदिराबाईंना आपले चार चौकांचे माहेराची खुप आठवण येते. माहेरचं घर ,तेथील दरवाजे, खिडक्या, ओसरी , अंगण सारे काही त्यांना आठवू लागते. वर्णन करताना त्या म्हणतात,

**चार चौकांचे माहेर**
**जेंव्हा ओलांडून आले**
**उपहासाने हासत**
**दरवाजे बंद झाले.**
**नाही पाहिले वळून**
**नाही केली आठवण**
**सुख स्वप्नांच्या कोशात**
**पुरी गेले मी मिटून...**

सासरी आल्यावर संसारात मग्न झालेल्या कवयित्रीला सुरुवातीच्या काळात माहेराची आठवण आली नाही. नव्या नव्या संसारात त्या पूर्णतः गुंतून गेल्या. पण जेंव्हा एका खोलीच्या घरट्यात त्यांना राहायला जावे लागले. व छोटेशा बाळाला घेऊन त्यांनी एका छोट्याशा खोलीत संसार थाटला. तेंव्हा मात्र त्यांना माहेरातील मोठ्या घराची खूप आठवण आली. त्या म्हणतात,

**पाखरांचा की संसार**
**दिसभर वणवण**
**एका खोलीचे घरटे**
**उभे विसावा घेऊन**
**एका खोलीचा संसार**
**पाळण्याची झाली दाटी**
**कुठे खेळेल रांगेल**
**मना लागली ओहोटी...**

एका छोट्याशा खोलीच्या घरात बाळाला घेऊन राहणे, त्यांना कठीण वाटू लागले, जणू काही या खोलीला बाळाच्या पाळण्याची दाटी झालेली आहे. या एवढ्याशा खोलीत माझा बाळ कसा खेळेल ?, कुठे रांगेल ?अशी हुरहुर त्यांच्या मनाला लागली. तेंव्हा आपल्या माहेरी कसे मोठे घर होते, याचे वर्णन करताना कवयित्री लिहितात,

**चार सोपे रांगायाला**
**खेळा खेळीला अंगण**
**माझी स्वाभिमानी आणि मान**
**आज पडली मोडून**
**लेकराला कल्पवृक्ष**
**सुख दुःखाला मांडव**
**अशा माहेराला आज**
**आज आसुसला जीव...**

त्यांच्या माहेरी खेळायला मोठे अंगण होते. व घरही खूप मोठे असल्यामुळे त्यांना कधी अडचण वाटली नाही. अशा या मोठ्या घरात त्यांचे बालपण गेले. व ते घर जणू काही लेकरांसाठी कल्पवृक्ष होते. जे हवे ते तिथे मिळायचे. व अशा या माहेराच्या भेटण्यासाठी त्यांचा जीव आज आसुसलेला आहे .असे वर्णन कवयित्रीने केले आहे.

आई असताना जेंव्हा कवयित्री माहेरी जात, तेंव्हा आईचा निरोप घेताना त्यांच्या मनातील भावना त्यांनी पुढील ओळींमधून व्यक्त केल्या आहेत.

**डबडलेले डोळे सावरीत,**
**हसतमुखशी नाहीशी होते,**
**मी माहेरी येते म्हणतांना...**

सासरी कितीही सुख असलं तरी माहेराहून सासरी जायला निघताना प्रत्येकीच्या डोळ्यात नकळत पाणी येतंच, तसेच कवयित्री सुद्धा आपले भरलेले डोळे आईला दिसू नयेत म्हणून हसतमुखाने आईला मी येते म्हणतात. पण त्यांचे डोळे डबडबलेले असतात.

माहेरातील अंगणात असलेला गुलमोहराचे वर्णन करतांना कवयित्री म्हणतात,

**अंगणात गुलमोहोरं**
**पालवतो, बहरतो,**
**मायलेकीच्या जिव्हाळ्याला**
**शुभ शकुन साक्षी होतो...**

अंगणातला गुलमोहर जणू काही माया- लेकींचा जिव्हाळा त्यांचे प्रेम या सर्वांचा साक्षीदार आहे. अशाप्रकारे कवयित्रीने आपल्या अनेक कवितांमधून त्यांच्या माहेरा विषयी वर्णन केलेले आहे. मऊ रेशमाची घडी ,माहेराची वाट, गुलमोहर इत्यादी कवितांमधून आलेले वर्णन हृदयाला स्पर्शून जाते. मराठी भाषेला समृद्ध करणाऱ्या , काव्यातून जीवनातले उदात्त भावचित्रीत करणाऱ्या इंदिराबाईंनी १३जुलै२००० रोजी या जगाचा निरोप घेतला.

तुकारामनीती
भाग -53



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

# माझे घोंगडें पडिलें ठायी । माग तया पायीं सांपडला ॥

आधुनिक केसरी

**संत तुकाराम महाराजांची गाथा आणि त्यातील अभंगांचे चिंतन करत असतांना त्यातून त्यांच्या पर्यंतच्या सर्वच महापुरुष, संतांच्या जीवन, चरित्र आणि विचार-तत्वांचे सहजच अवलोकन होत आहे. तुकोबांचा एकएक अभंग ज्ञान-भक्ती-वैराग्य-तत्वज्ञान-योग-प्राणायाम-जीवन-जन्म-मरण इत्यादी अनमोल विचारांनी ओतप्रोत आहे. एकेका अभंगावर चिंतन मांडतांना मी ही विचारप्रवण होत असून मिडीयावर अनेक वाचक आपल्या अनमोल प्रतिक्रिया देऊन आपले प्रचंड ऊर्जादायी आशीर्वाद मला देत असतात. महाराष्ट्राच्या विविध भागातून नवनवे वाचक महानुभाव, सज्जन सन्मित्र जोडले जात आहेत. तर अनेक जुन्या सुपरिचित जेष्टांचे, मित्रांचे मोबाईलवर संवाद होतांना माझ्यासारखा सामान्य माणूस तुकोबांसोबत जोडल्यामुळे कृपांकित होतो आहे! मागील रविवारी महाबळेश्वर येथे फॉरेस्ट ऑफिसर असलेले मा.श्री दत्तात्रय कदम साहेब आणि औसा येथील प्राचार्य गुरुवर्य डॉ.एम.एम.बेटकर सर, या दोघांच्या कॉल्समुळे आपण ज्ञानोबा-तुकोबांचा वसा इमानदारीने चालवण्याचा प्रयत्न करत आहोत याचा मनस्वी आनंद झाला!**

ज्याप्रमाणे जो-तो आपला वसा-वारसा आपापल्यापरीने जपण्याचा प्रयत्न करत असतो, त्याच न्यायाने संत तुकोबाराय आपल्या पूर्वजांच्या भजन-भक्ती-वैराग्य-वारी-भजनाचा वसा जपतांनावाङ्मय निर्मितीचा नवा पायंडा पाडतांना, घट्ट करतांना दिसतात. संत नामदेव, संत ज्ञानदेव, संत सावतोबा, संत चोखोबा, संत जनाबाई, संत एकनाथ आदि संतांच्या लेखणीचा प्रभाव तुकोबांवर झाला नसेल तर नवल!

महाराष्ट्रातील आणि देशातील अनेक संतांनी आपले अभंग लिहितांना मानवी शरीराला विविध उपमा-उपमेय देऊन अभंग लेखन केले आहे. या सर्वच संत कवी-लेखकांच्या लेखनामागील एकमेव उद्देश म्हणजे लोकजागृती आणि आत्मभाव प्रकट करणे हाच होता. त्या काळी गाथा किना एखादा संग्रह प्रकाशित करणे वगैरे असे काहींच नव्हते. जवळपास सर्वच वाङ्मय हे तोंडी प्रसारित झालेले असायचे आणि नंतर काही व्यवस्था झालीच तर ते लेखणीच्या स्वरुपात शिल्लक रहायचे. मी या अगोदरही लिहिले आहे की; जगद्गुरू तूकोबांनी दहा हजारापेक्षा जास्त अभंग लिहिले असतील. मात्र, कालौघात ते आपल्या पर्यंत पोहोचले नाही, जे पोहोचले त्यात सुद्धा वाचतांना कधी कधी त्यात तुकोबा डोकावत नाहीत. त्यात नंतरच्या लेखक-प्रसारकांनी घुसखोरी केली असावी असा सहज अंदाज येतो, परंतु तसा काही स्पष्ट पुरावा मिळत नसल्यामुळे पुढे चालणे भाग आहे. विविध प्रकरणापैकी तुकोबांनी आपल्या अभंगात मागील संत ज्ञानेश्वर, संत मीराबाई यांच्याप्रमाणे घोंगडीचे अभंग लिहिले आहेत. घोंगडी म्हणजे मानवी शरीर. ही शरीररूपी घोंगडी कशी आहे( ?) वगैरे सांगण्याचे काम संतांनी या अगोदरही केले आहे. संत ज्ञानेश्वर महाराज श्री कृष्णाला उद्देशून संवाद साधतांना

**कान्होबातुझी घोंगडी चांगली । आम्हांसी कां दिली वांगली ॥ध्रु॥स्वगत सच्चिदानंदें मिळोनी शुध्दसत्व-गुणें विणली रे । षड-गुण गोंडे रत्न-जडित तुज श्याम सुंदरा शोभली रे ॥१ ॥**
**काम कर्म अविद्या त्रिगुण पंचभुतांनी विणली रे । रक्त रेत दुर्गंधी जंतु नरक मुतानें भरली रे ॥२ ॥**
**षडविकार षडवैरी मिळोनि । तापत्रयानें विणली रे । नवाठायीं फाटुनी गेली ती त्वां आम्हांसि दिधली रे ॥३ ॥**
**ऋषि मुनि ध्यातां मुखि नाम गातां संदेह वृत्ती विरली रे । बापरखुमादेविवर विठ्ठले त्त्वत्पादी वृत्ति मुरली रे ॥४ ॥**

हा आपल्या आणि श्री कृष्णाच्या घोंगडीतील फरक आहे. आपले जीवन, शरीर आणि देवाचे जीवन, शरीर याची तुलना करून आम्हाला दिलेली घोंगडी कशी आहे( ?) याचे इथे भावचित्र स्पष्ट होते. या शिवाय संत मीराबाईंनी सुद्धा

**रंग दे चुनरिया रंग दे चुनरिया, श्याम पिया मोरी रंग दे चुनरिया ॥ऐसी रंग दे के रंग नाही छूटे, धोबिया धोए चाहे ये सारी उमारिया ॥**

'रंग दे चुनरिया' या गवळणीतून श्री कृष्णाला मानवी जीवन रंगवायला, कृपांकित करण्यासाठी विनवणी केली आहे. हे आणि अन्य संतांचे अभंग पाहिले असता आपल्या सहजच लक्षात येते की; हे सर्वच संत ईश्वराशी संवाद साधतांना सामान्य माणसांसी संवाद साधतात. मानवी जीवन आणि शरीर हे कसे क्षणभंगुर, नाशिवंत आहे( ?) याची वारंवार आठवण करून देतात. त्यातून माणसाने आपले जीवन सत्कारणी लावावे हीच एक माफक अपेक्षा त्यांना असते. याच अनुषंगाने संत तुकाराम महाराजांनी सुद्धा "घोंगड्याचे अभंग" हे बारा अभंगांचे एक प्रकरण लिहिले असून त्यातील

**माझे घोंगडें पडिलें ठायी । माग तया पायीं सांपडला ॥ १ ॥**
**चोर तो भला चोर तो भला । पाठीसी घातला पुंडलिकें ॥ ध्रु. ॥**
**चोर कुठोरी एकेचि ठायी । वेगळें पहावें न लगे कांही ॥ २ ॥**
**आणिकांचि ही चोरली आधी । माझें तयामधी मेळविलें ॥ ३ ॥**
**आपल्या आपण शोधिले तिंही । करीन मी ही ते चि परी ॥ ४ ॥**
**तुका म्हणे माझे हित चि जालें । फाटकें जाउन धडकें आलें ॥ ५ ॥ (शा.अ.गाथा अ.क्र. १०९१ )** त्या बारा अभंगांपैकी हा एक अभंग आपण सार्वांनीच बारकाईने वाचला पाहिजे.

पूर्व आणि उत्तर वैदिक काळातील ईश्वर-भक्ती स्वरूप बदलेले सहज पहायला मिळते. पूर्व वैदिक काळातील ईश्वर-भक्ती हा विषय केवळ आत्मभान-अंतर्मन-ध्यान-धारणा या संदर्भाने होता. त्याकाळात कोणत्याही बाह्य कर्म अथवा कर्मकांड याशिवाय अनुष्ठान, अंतर्मनाची चंचलता थांबवून स्वतःमध्ये ईश्वरानुभूती आणण्याचे काम केले जायचे. कालौघात गुण कर्मावर माणूस विभागला गेला. गुणाच्या आधारे वर्णव्यवस्था प्रस्थापित झाली आणि तद्वतच धर्म व समाजाचे चित्रण बदलत गेले. निर्गुण-निराकार-कर्मकांड रहित असलेली ईश्वर-भक्ती ही उत्तर वैदिक काळात माणसाने सगुण



साकार केली. मूर्तीपूजा, उपासना, मंदिरे वैगरे सगळा खटाटोप वाढला आणि सामान्य, भोळा-भाबडा माणूस अंतर्मनातील देवापासून दुरावून देवाला मंदिरात-प्रार्थनास्थळी शोधू लागला. इथेच सगळा गोंधळ झाला. असे बदल होतांना सतराव्या शतकांत कडेकोट वर्णव्यवस्थेच्या अभेद्य भिंती असतांना कळस म्हणजे जगद्गुरू तुकोबाराय आपले अभंग लेखन हे सगुण-निर्गुण दोन्ही रूपाने करून स्वतःतील ईश्वर स्वतःला भेटल्यामुळे तुकोबा या अभंगासारखे अनेक अभंग लिहिते झाले.

चिंतनासाठी आज निवडलेल्या अभंगामध्ये तुकोबाराय हे माझे शरीररूपी घोंगडे माझ्याकडे व्यर्थ पडून होते; परंतु तुझ्या (ईश्वर) भक्तीच्या मार्गाने त्याला एक उत्तम मार्ग सापडला. इथे तुकोबाराय देवाला 'चोर' संबोधतात. या अगोदर सुद्धा अनेक संतांनी पांडुरंगाला चोर संबोधले आहे. संत जनाबाई 'धरिला पंढरीचा चोर' अनेक गवळणीत सुद्धा कृष्णाला संत एकनाथ, संत मीराबाई आदि संतांनी देवाला चोर संबोधले आहे. याचे कारण म्हणजे तो चित्तचोर आहे. तो मनमोहक, सुंदर, देखणा, सुकुमार असून त्याच्या भक्तीच्या प्रभावाने भले भले वेडे झाले आहेत. त्या वेडामुळे अनेक संत वीरांनी 'अरे विठ्या', 'तुझी रांड रंडकी झाली' अशा शिव्या दिल्या आहेत. हा सख्य भक्तीचा परमोच्च प्रतोद इथे संतांच्या लेखणीतून वाहतांना दिसतो आहे. असा हा चोर कुठोरी म्हणजे कुठपर्यंत सुद्धा सोबत असतो. तो भक्ताच्या निराळा म्हणजे वेगळा राहू शकत नाही. आत्तापर्यंत या चीत्तचोराने अनेकांची चित्ते चोरली असून त्यांच्याप्रमाणेच त्याने माझेही चित्त चोरले असून त्यांच्यामध्ये मिळविले आहे. याचा परिणाम असा झाला की; तुकोबांना स्वतःतच ईश्वरानुभूती झाली. त्यांनी त्यांनाच शोधेले आणि आपल्यातील त्याचे म्हणजेच स्वतःतील ईश्वराचे अस्तित्व त्यांना कळले. या अभंगाचा शेवट फारच विचारप्रवण असून यातून तुकोबाराय म्हणतात, इथे माझे सर्वोच्च हित झाले. माझे शरीररुपी, नऊ ठिकाणी फाटून गेलेले घोंगडे म्हणजेच नऊ द्वार असलेले हे नश्वर शरीर याची आसक्ती कमी झाली आणि त्यातच मी संपूर्ण विश्वव्यापक ईश्वराचे शोधले. इथे माझे सर्वोच्च हितच झाले. आता मला बाहेरील जगासी आणि या फाटक्या शरीरासी फार काही सख्य राहिले नसून माझ्या अंतर्मनातील ईश्वराचे अस्तित्व माझ्यासाठी सर्वोपरी आहे. आता मला काहीही नको आहे. ही सर्वोच्च आत्मानुभूती तुकोबांना झाली आणि ते सर्वच अनुभव या घोंगड्याचे अभंग प्रकरणातून प्राक्त झाले आहेत.

सज्जन महानुभावांनो, आज माणसाने लोक्संवादाबरोबरच आत्मसंवाद करण्याची वेळ आली आहे. केवळ शारीरिक आनंदाचा विचार न होता माणसाने मानसिक आनंदासाठी प्रयत्नपूर्वक कार्य केले पाहिजे. मानवी शरीर ही नश्वर घोंगडी असून हिला काळ मर्यादा आहेत याची जाण आणि भान ठेवायला हवे. मागील एक वर्षापेक्षा जास्त काळापासून मी जगद्गुरू तुकोबांच्या अभंगावर लिहित असतांना मी माझ्यात अंतर्बाह्य बदल करून घेतांना जगद्गुरुंच्या त्या अलौकिक तत्वांचा लोकांमध्ये तेवढ्याच प्रभावीपणे प्रचार-प्रसार होणे जरुरी असल्यामुळे हे छोटेसी हमाली सुरु आहे. पैसा महत्वपूर्ण असला तरी सगळे काही पैसा नाही. एखादा माणूस सुखी असला तरी तो आनंदी असेलच असे नाही. तेंव्हा सुखापेक्षा माणसाच्या जीवनात आनंदाच्या अनमोल क्षणांची नितांत गरज असून तो माणसाच्या शरीराचे जास्त लाड-चोचले न पुरवता सुद्धा आपल्याला घेता येतो. तेंव्हा या नश्वर घोंगडीला जास्त न सजवता मनाला आनंदी ठेवून जीवन ईश्वराला म्हणजेच स्वतःतील सर्वोच्च आनंदाला देऊन टाका आणि माझ्यासह आपण सगळेच स्वतःचे हित साधून घेऊ या! असे झाल्यास तुकोबांच्या अभंगांचे आणि त्यांच्या प्रेमाशीर्वादाने सुरु असलेल्या "तुकाराम नीती"चे सार्थक झाल्याशिवाय राहणार नाही! जय तुकोबाराय!

# मोदीजी एकदा तुम्ही एवढे कराच..



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**आठवणीचे पक्षी प्रसिद्ध आत्मकथनाचे लेखक प्रा. प्र.ई. सोनकांबळे यांचे चिरंजीव डॉ.अश्विन यांचा ०७ मे, रोजी ५० वा .जन्मदिवस औरंगाबाद येथे त्यांच्या मूळ घरी आप्ताच्या मेळ्यात साजरा होत आहे. ते मुंबई येथील जे.जे हॉस्पिटलमध्ये एम.डी पदावर कार्यरत असूनही मूळ आपल्या गावी येऊन आपला जन्मदिवस साजरा करत आहेत यातून त्यांच्यावर झालेले सरांचे आपलेपणाचे संस्कार दिसून येतात. डॉ. पूर्णिमा मॅडम, डॉ. अश्विन सर आणि त्यांची मुलं रोहक-रोहिका हे सर्व कुटुंब प्र.ईं सोनकांबळे सरांच्या समता आणि नम्रतेच्या छायेत वाढलेले असल्यामुळे त्यांचं साध वागणं, बोलणं, सहजपणे इतरांशी जुळवून घेणं मनाला भावतं.**

ज्ञान, बुद्धी आणि संपत्ती याचा बडेजावा न करता शक्य होईल तितकं सामान्याशी जोडलं जाणं त्यांचा हातखंड आहे. गेल्या नऊ वर्षापासून मोदी व भाजप यांच्या वरती अनेक प्रकारचे आरोप प्रत्यारोप होत आहेत. नरेंद्र मोदी देशाचे प्रधानमंत्री असूनही खोटे बोलणारे, शब्दाला न पळणारे, प्रधानमंत्री म्हणून त्यांच्यावरती विरोधक व जनता आरोप करत असते प्रधानमंत्री यांच्या शैक्षणिक डिग्री पासून तर त्यांच्या वैयक्तिक जीवनापर्यंत प्रत्येक गोष्टीवर आरोप प्रत्यारोप झालेले आहेत. आणि या आरोप प्रत्यारोपामुळे प्रधानमंत्री पदाची प्रतिमा मलिन होत आहे. प्रधानमंत्री स्वतः म्हणतात मी काही जास्त शिकलो नाही, प्राथमिक शिक्षण झाल्यानंतर गाव सोडून बाहेर गेलो, परंतु केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे मात्र नरेंद्र मोदी यांची डिग्री दाखवून नरेंद्र मोदी उच्चशिक्षित आहेत, असे सांगतात. यावर मात्र प्रधानमंत्री काहीच बोलत नाहीत, परंतु अनेक जर डिग्री प्रमाणपत्रावर अनेक चुका जसे फॉन्ट, स्पेलींग आणि डिग्री देण्याची तारखेचा रविवार आहे, म्हणून लोकांनी विश्वास कोणत्या गोष्टीवरचा ठेवायचा हेही कळत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे नरेंद्र मोदी हे म्हणतात की त्यांनी 35-40 वर्ष भिक्षा मागून खाल्ले, रेल्वे स्टेशन वरती चहा विकला, परंतु नरेंद्र मोदींनी चहा विकला याचे ठोस असे पुरावा ते देऊ शकले नाही. चहा बनवण्याचे साहित्य सध्या कुठे आहे, किंवा भिक्षा कुठे व कधी मागून खाल्ली हे सुद्धा ते सिद्ध करू शकले नाही. म्हणून मग लोकांच्या मनामध्ये सहज प्रश्न निर्माण झाला जर 35-40 वर्ष भिक्षा मागितली तर, चहा कधी विकला ? थोडक्यात काय तर नरेंद्र मोदी यांनी चहा विकला किंवा भिक्षा मागितले यावर सुद्धा लोकांचा विश्वास बसत नाही. कारण नरेंद्र मोदी खोटं बोलतात असीच धारणा लोकांची झालेली आहे. काही लोक नरेंद्र मोदी यांचे शिक्षण भिक्षा मागण्याचा काळ, चहा विकण्याचा काळ असा गृहीत धरून एकूण वर्षाचे गणित लावतात तर गणीतही जुळत नाही. त्यांचा जन्म १९५० चा शिक्षण, भिक्षा व चहा विकला असे बघितलं तर कार्यकाळ जुळतही नाही, २००१ ला गुजरात चे मुख्यमंत्रीही झाले म्हणून लोक म्हणतात राजकारणात आल्यानंतरही मोदी भिक्षा मागत होते ? की चहा विकत होते ? असे गंभीर स्वरूपाचे प्रश्न लोकांच्या मनामध्ये निर्माण झालेले आहेत. नरेंद्र मोदी यांचे ईमेल आयडी वापरण्यासंदर्भात, डिजिटल कॅमेरा वापरण्यासंदर्भात, चहासाठी नाल्याच्या पाण्यावरून ग्यास बनवण्यासंदर्भात, असे अनेक प्रश्न लोकांच्या मनामध्ये निर्माण होऊन, लोकांचा नरेंद्र मोदी व त्यांचे वैयक्तिक व राजकीय आयुष्य यावरचा विश्वास उडालेला आहे. राजकारणामध्ये नरेंद्र मोदी यांनी घेतलेला नोटबंदीचा निर्णय हा नेहमीच वादग्रस्त व चर्चेचा विषय राहिलेला आहे. त्याला समर्पक उत्तर नरेंद्र मोदी व सरकार आजही लोकांना देऊ शकले नाहीत. नोटेमध्ये असलेली चिप तर सरकार व मिडीयाने मनोरंजनाचा भागच बनवून टाकला. रोजगार शिक्षण महागाई व सार्वजनिक संपत्तीचे खाजगीकरण याबाबतीत तर नरेंद्र मोदी यांना मुख्य जबाबदार धरून लोकांनी टीका करायला सुरुवात केली. रोजगाराचे स्वप्न दाखवून तरुणांना बेरोजगार करणे, शिक्षणाची स्वप्न दाखवून शिक्षण बंद करणे, व देश नही बिकने दूंगा असे भाषणात बोलून नरेंद्र मोदी



यांनी देशच विकून टाकला, असे लोकांचे ठाम मत आहे. नोट बंदीच्या काळामध्ये स्वतःच्या आईला रांगेमध्ये उभे केल्याने नरेंद्र मोदी यांना अनेक टिकाठीप्पणींना सामोरे जावे लागले. फक्त फोटोसाठी आणि कॅमेरे समोर येण्यासाठी नरेंद्र मोदी काहीही करू शकतात, असे जनभावना निर्माण झालेली आहे. थोडक्यात काय तर नरेंद्र मोदी यांची एक माणूस, एक राजकीय नेता म्हणून बहुतांश लोकांच्या मनामध्ये प्रश्नचिन्ह निर्माण करून, खोटारडा व निष्क्रिय जुमलेबाज प्रधानमंत्री म्हणून ओळख निर्माण झालेली आहे. परंतु दुसरीकडे हिंदुत्वाच्या नावाखाली नरेंद्र मोदी यांचे अनेक कट्टर समर्थक सुद्धा निर्माण झालेले आहेत. 370, राम मंदिर, लव जिहाद, पाकिस्तान एअर स्ट्राइक, गोहत्या बंदी यासारखे उदाहरणे देऊन, स्वतःला कट्टर हिंदू समजणारे लोक नरेंद्र मोदी यांच्या बाजूने ठामपणे उभे आहेत. नरेंद्र मोदी यांनी कोणतेही काम केलेले नसेल, त्यांच्या कामाचा लेखाजोखा कट्टरवादी लोकांना मांडत आहे येत नसेल, तरीही नरेंद्र मोदी यांचे कट्टर कार्यकर्ते नरेंद्र मोदी हेच आमचे नेते आहेत म्हणून स्वीकार करतात. देशातील सर्वात प्रभावी नेता म्हणून त्यांना मान्यता देतात प्रसार माध्यमे व इतर धार्मिक यंत्रणा नरेंद्र मोदी यांना सर्वश्रेष्ठ मानतात. थोडक्यात काय तर नरेंद्र मोदीच्या विरोधातही आणि समर्थनातही अनेक लोक असल्याचे दिसून येते. महत्त्वाचा मुद्दा हा नाही नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री म्हणून काय काय कामे केले कारण निवडणूक प्रचार रॅलीमध्ये सुद्धा नरेंद्र मोदी व बीजेपी चे नेते स्वतःच्या कार्याचा सक्षम असा लेखा जोखा मांडण्यासाठी अक्षम आहेत. म्हणून ते भावनिक व धार्मिक मुद्यांना हात घालतात. हे असताना सुद्धा हिंदुत्वाच्या नावासाठी मोदींना डोक्यावर घेणारे लोक सुद्धा आहेत. महत्त्वाचा मुद्दा हा आहे की नरेंद्र मोदी आज ना उद्या राजकीय सेवेतून निवृत्त होतील, जसे अटल बिहारी वाजपेयी व लालकृष्ण अडवाणी यांची निवृत्ती झाली. होती तसेच नरेंद्र मोदी यांची ही होऊ शकते, परंतु निवृत्ती होण्याअगोदर नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री म्हणून नव्हे, पण एक माणूस म्हणून एक काम करावे ते का म्हणजे ईव्हीएम बंद करणे. कारण वरील जे काही आरोप आहेत ते आरोप एक राजकीय आरोप, सामाजिक आरोप म्हणून नाकारता येतील. किंवा त्याला प्रतिउत्तर देऊन त्याची तीव्रता कमी सुद्धा करता येईल. परंतु ईव्हीएम विषयी लागलेला आरोप हा खूप गंभीर असून, लोकशाहीवर घाला घालून भाजपवर प्रश्नचिन्ह निर्माण करणार आहे. गेल्या काही वर्षांमध्ये अनेक प्रकरण समोर आलेले आहेत. त्यामध्ये कोणत्याही पक्षाचे बटन दाबले तर मत मात्र बीजेपीच्याच उमेदवाराला जाणे, याला ईव्हीएम चा तांत्रिक बिघाडाही आपण म्हणू शकत नाही. कारण तांत्रिक बिघाड झाला असता तर एखाद्या पक्षाचे बटण दाबले तर कोणत्याही पक्षातील उमेदवारांना मत गेले असते व तेथील लाईट लागला असता. परंतु तसे न होता कोणतेही बटन दाबले तर लाईट मात्र कमळासमोरच लागायचा. हे मात्र संशयास्पद आहे व ईव्हीएम मध्ये गडबडी होऊ शकते हे सर्व अनेक मोठमोठ्या राजकीय नेत्यांनी सुद्धा मान्य करून समर्थन केले आहे. याचा अर्थ ईव्हीएम मध्ये घोटाळा करून बीजेपी मताची चोरी करते, असा आरोप ठेवण्यात आला. दुसरे दुसरे सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे अनेक उमेदवारांच्या घरांमध्ये, गाड्यांमध्ये ईव्हीएम मशीन या अगोदरही आढळून आल्या. कालच्या कर्नाटक निवडणुकीमध्ये सुद्धा उमेदवारांच्या गाडीमध्ये ईव्हीएम मशीन आढळून आले, याचाच अर्थ निवडणूक आयोग व बीजेपी संगणमत करून पाहिजे तोच उमेदवार निवडून आणतात. जर असे झाले नसते तर निवडणूक आयोगाच्या कस्टडीत असलेल्या ईव्हीएम मशीन फक्त बीजेपीच्या कार्यकर्त्यांच्या घरांमध्ये गाडीमध्ये कशा पोहोचतात ? हा गंभीर विषय आहे. सर्वसामान्य लोक व अनेक राजकीय पक्ष ईव्हीएम बंद व्हावी म्हणून आंदोलन करत आहेत. राजकीय पक्षांनी तर एकत्र येऊन इव्हिएम विरोधात आवाज सुद्धा उठवलेला आहे. नरेंद्र मोदी यांनी स्वतःला सिद्ध करण्यासाठी व नरेंद्र मोदी हे विशिष्ट धर्माचे नेते नसून ते देशाचे नेते आहेत, व देशहितासाठी ते योग्य तो निर्णय घेऊ शकतात. हे दाखवून देण्यासाठी सर्व लोकांचा सन्मान करण्यासाठी, नरेंद्र मोदी यांनी ईव्हीएम बंद करून बॅलेट पेपर वरती निवडणूक घेण्याचे जाहीर करावे. कारण सर्व विरोधी पक्ष व जनता बॅलेट पेपरची मागणी करत असताना, नरेंद्र मोदी व भाजप ईव्हीएम चे जर समर्थन करत असेल तर याचाच अर्थ बीजेपी इव्हिएम मशीन मध्ये घोटाळा करून निवडून येते हे त्यांनी सुद्धा मान्य करायला पाहिजे. जर बीजेपी ईव्हीएम मशीन मध्ये घोटाळा करून निवडून येत नाही, असा विश्वास त्यांना आहे व त्यांच्या मागे हिंदुत्ववादी कट्टर वोटबॅंक सुद्धा आहे, एवढे असतानाही नरेंद्र मोदी जर ईव्हीएम बंद करून बॅलेट पेपरवर निवडणूक घेत नसतील तर, बिजेपी ईव्हीएम मध्ये घोटाळा करून निवडून येते हेच लोकांच्या मनामध्ये ठामपणे बसेल. आणि नरेंद्र मोदींवरचा विश्वास पूर्ण उडून जाईल. प्रदेशातील जनतेच विश्वास कायम ठेवण्यासाठी आणि लोकशाही वाचवण्यासाठी नरेंद्र मोदी यांनी बॅलेट पेपरवर निवडणुका घेऊन सिद्ध करून द्यावे की नरेंद्र मोदी हे देशाचे नेते आहेत. लोकांच्या विचाराचा व मताचा आदर करून नरेंद्र मोदी निर्णय घ्यावा. जर नरेंद्र मोदी यांनी समोर येऊन इव्हीएम बंद विषयी निर्णय घेतला नाही तर मात्र नरेंद्र मोदी व बीजेपी यांच्यावर ईव्हीएम मध्ये घोटाळा करून निवडून येणारे, खोटे बोलणारे, जुमलेबाज सरकार, म्हणून जो शिक्कामोर्तब होईल. व तो लागलेला डाग कधीच कोणी पुसून काढू शकणार नाही. म्हणून नरेंद्र मोदी यांनी राजकारणातील शेवटच्या दिवसांमध्ये का होईना थोडासा प्रामाणिकपणा दाखवून, थोडेसे देशप्रेम दाखवून आणि ते खरंच ईव्हीएम मध्ये गडबड करून निवडून येत नसतील तर, त्यांनी इव्हिएम बंद चा निर्णय घेऊन देशातील जनतेचे मन जिंकून लोकशाहीचे जतन करावे. तरच नरेंद्र मोदी मोदी या नावाचा सन्मान होईल नाहीतर मोदी बद्दल काय काय बोलले जाते हे नव्याने सांगण्याची गरज नाही. उलट एकदा राजकीय निवृत्ती झाल्यानंतर अटलबिहारी वाजपेयी लालकृष्ण अडवाणी यांना जशी दुर्लक्ष केले गेले तसेच नरेंद्र मोदी यांना सुद्धा दुर्लक्षित केले जाईल. सध्या सत्ता आहे म्हणून मोदीचं नाव आहे परंतु उद्या मोदी सुद्धा राजकीय पडद्यावर जातील, कारकीर्द विचार शून्य होईल, परंतु ज्या वेळेस मोदी नावाचा वैयक्तिक विचार होईल त्यावेळेस नरेंद्र मोदी वर लागलेले डाग लोकांना नक्की आठवेल. म्हणून नरेंद्र मोदी साहेब जाता जाता एवढे काम नक्की करा ईव्हीएम बंद करून लोकांच्या मताला किंमत निर्माण करून द्या.

# वृक्षवल्ली आम्हा सगेसोयरे

आधुनिक केसरी

**मानवी जीवनात वृक्ष वेलीचे महत्व मोठे आहे. वृक्ष हे मानवाचे साथीदार असे म्हटले जाते . त्यापासून आपणास ऑक्सिजन तर मिळतोच पण याशिवाय फळे, फुले, लाकूड , इत्यादी गोष्टी सुद्धा मिळतात . वृक्ष राजी बघितली कि आपले मन प्रसन्न व आनंदी होते. प्राचीन काळापासून वृक्षाचे महत्व मानवाला आहे दुसऱ्यासाठी कसे जगावे हा मूलमंत्र मानवाने वृक्षा पासून शिकवा पण त्या वृक्षांची आजची अवस्था काय आहे ? शहरीकरण, औधोगीकरण, व विकास या नावाखाली प्रचंड वृक्ष तोड सर्वत्र होत आहे . जंगले नष्ट होत चालली आहेत. अर्थात त्याचे परिणाम पर्यावरणावर जाणवू लागले आहेत . भारततही अनेक ठिकणी तापमानाचा पारा ४५ अंशावर आत्ताच पोहचला आहे . जगाच्या दृष्टीने वृक्षराजीबाबतविचार करता भारताचा क्रमांक जगात दहावा आहे.**

शांताराम वाघ पुणे

भारतात मध्य प्रदेश हे राज्य वृक्षाच्या व जंगलाच्या दृष्टीने आघाडीवर आहे . सध्या महाराष्ट्रातील जंगलाचे प्रमाण १६ टक्के एवढे आहे . राष्ट्रीय लक्ष गाठण्यासाठी आपणास खूपच प्रयत्न करावे लागतील . पर्यावरण व सृष्टीचा एकूण समतोल राखण्याच्या दृष्टीने वृक्ष लागवडीचा कार्यक्रम नियोजन पद्धतीने घेणे आवश्यक आहे. त्याबरोबरच लावलेली झाडे जोपासणे महत्वाचे आहे . वृक्ष लागवड करून त्याची योग्य जोपासना न केल्यामुळे झाडे नष्ट होण्याचे प्रमाण मोठे आहे . थोडक्यात वृक्ष लावा व वृक्ष जगवा ही मोहीम राबविल्यास योग्य होईल. महाराष्ट्रात मुलगी सासरी जाताना तिची आठवण म्हणून वृक्ष लावून स्मृती जपणारी अनेक गावे आहेत. हे वृक्षराजी टिकविण्याच्या दृष्टीने भावनात्मक पाऊल आहे . जंगले वाचविण्यासाठी व वृक्ष राजी टिकविण्यासाठी अलीकडील काळात १९७३ साली चिपको आंदोलन उत्तराखंड राज्यात मंडळ गावात सुरु झाले . नंतर ते हिमाचल प्रदेश व राजस्थान च्या अनेक घागर पसरले . या आंदोलनात स्त्री पुरुष जंगलातील झाडांचे कापण्यापासून संरक्षण करतातसुंदरलाल बहुगुणा यांचं नेतृत्वाखाली या चळवळीने वेग घेतला आहे . त्यांची प्रचार घोषणा आहे " Ecology is permanent Economy "

आजकाल जंगलात वणवे लागण्याचे प्रमाण सुद्धा मोठे आहे . मध्यंतरी ऑस्ट्रेलिया देशात वणव्यामुळे हजारो एकर जंगल नष्ट झाले . त्यामुळे पर्यावरणाची हानी झाली . अनेक पशु पक्षी नष्ट झाले . जगात अनेक ठिकणी वणव्याचे प्रकार होत आहेत जंगले मोठी होण्यात अनेक वर्षे जातात पण वणव्यामुळे ती क्षणात नष्ट होतात . वृक्ष ही आपली संपत्ती आहे ह्या दृष्टीने जंगलाकडे सर्वांनी पाहिले पाहिजे .

भारतातील अनेक राज्ये वृक्ष लावण्याचा उपक्रम दरवर्षी राबवितात तथापि त्यातील किती झाडे जगली याचे गणित आवश्यक आहे .सरकारी अनेक जागा रिकाम्या असतात . रेल्वेच्या सुद्धा अनेक जागा पडून आहेत . त्या ठिकाणी वृक्ष लागवड करण्यास हरकत नसावी . शालेय मुलांना वृक्षाचे महत्व पटवून सांगावे व शाळेत सुद्धा जेथे जेथे मोकळी जागा असेल तिथे वृक्ष लावावेत . गावातील ग्राम पंचायती व शहरातील नगर पालिका तसेच महानगर पालिका यांनी दरवर्षी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम राबवावा व वृक्ष लावणारास उत्तेजन द्यावे .याशिवाय काही दिवसापूर्वी नवीन वधूला एक झाड देऊन त्याचे संवर्धन करण्याची जबाबदारी तिला दिली वृत्त वाचण्यात आले होते . असे उपक्रम राबविण्यास हरकत नाही. हल्ली वृक्ष तोडून त्याचा कागद तयार केला जातो याला दुसरा पर्याय शोधावा . तसेच पेपरलेस ऑफिस ची संकल्पना राबवावी .



सरकारी ऑफिस, आस्थापना , कारखाना इत्यादी ठिकणी पेपरलेस ऑफिस कसे कार्यान्वित होईल हे पहावे काही राज्यांचं विधानसभेमध्ये पेपरलेस ही संकल्पना राबविली जात आहे . हे सुद्धा स्वागतार्ह पाऊल आहे लोकसभेत पेपर लेस संकल्पना राबविली गेली त्यामुळे कोट्यवधी रुपयांची बचत झाली आहे . अलीकडे रस्ते करताना खुपच जुनी झाडे तोडली जात आहेत. त्यांचे संवर्धन दुसरीकडे केल्यास त्यांना जीवदान मिळेल . मध्य प्रदेशात नूरजहाँ नावाची एका आंब्याची जात नष्ट होण्याच्या मार्गावर आहे . त्याची काही झाडेच शिल्लक राहिली आहेत . देशी आंब्याच्या काही जाती याचा मार्गावर आहेत. त्यांचे संवर्धन करणे ही काळाची आहे. या वृक्ष दिनाच्या निमित्ताने नवीन झाडे लाविणे व असलेली झाडे जगविणे हे महत्वाचे कर्तव्य आहे . असे न केल्यास पुढची पिढी आपणास क्षमा करणार नाही या वृक्ष दिनाच्या निमित्ताने आपण एकतारी झाड नवीन लावूया ही प्रतिज्ञा करूया .

# गोड आंबट भांडण (खेळ खेळातूनी)



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923


आधुनिक केसरी

**"आई, ए आई," "सांग ना गं!" "दीदी ला खेळायला." "अरे, दिवसभर खेळतोयसच की" "काय खेळतोय, तू या ऊन्हा मुळे बाहेरही जाऊ देत नाही." सापशिडी, लुड्यो , कॅरम "तेच तेच खेळून कंटाळा आलाय." "काय सारखं सारखं खेळायाचं." "थोडा पुढच्या वर्षीचा अभ्यास कर की." "गोष्टी, गाणी, म्हणी, वाक्प्रचार,सुविचार यांचे वाचन करावे." "हम्म...वाचन.. वाचन.." "ठीक आहे." वाचन तर वाचन! गप्प बसेल ते मन कसलं! आयडिया..(चुटकी वाजवत) " म्हणींवरुन खेळ..?" "ए आई सांग ना, दिदु ला म्हणीवरून खेळ खेळूया." "काय रे बाबा,"(त्रासून) मग काय...झाल यांच सुरु.पहिल्या म्हणीला उत्तर मिळेल अशी म्हण किंवा वाक्प्रचार म्हणायचा,आणि त्यातून सुरु झालेल हे गोड भांडण.**

आणि गोड भांडणातून सहज उलगडत गेलेल्या या काही म्हणी. शब्दाने शब्दासाठी शब्दकवने गावी. त्यातून शब्दां शब्दांची खुलतात रुपे नवी नवी, अलंकारीक शब्द,वाक्प्रचार ताई दिदि आई खेळूया का आपण अंताक्षरीसारख्या म्हणी, "अंताक्षरी असे काही नाही.पण.." "म्हणजे पहिल्या म्हणीला समर्पक अशी दुसरी म्हण किंवा वाक्य बोलायचे." "नको नको," कधी कधी कस होत ना! एखाद्या गोष्टी चा असा परिणाम होतो की जे विचार डोक्यात चालू असतात, तेच ओठावर येत असतात. 'जसे की मनी वसे ते स्वप्नी दिसे.' कामाची आवरा आवर सुरू होती, तेवढ्यात छोटू आला नी "आई मी तुला मदत करू ?" "अरे थांब थांब!" आई "नको रे बाबा तुझी मदत" 'एकपट काम नि दुप्पट रोजगार .' तेवढ्यात तिकडून मोठी ताई " आलाय मोठा कामाचा" बोलायला येते का अजून नीट निघालाय मदत करायला, 'एक ना धड भाराभर चिंध्या ' काय ग काय ग भाराभर चिंध्या काय ' अती शहाणा त्याचा बैल रिकामा ' "असू दे असू दे माझा बैल रिकामा तर रिकामा" " काय रे तुला काय करायचय!" का उगाचंच 'उचलली जीभ आपली अन् लावली टाळ्याला' कधी ग! अन् कुठे ग!" का नुसतीच आपली बडबड 'उथळ पाण्याला आपला खळखळाटच फार ' "खळ खळाट काय रे " "आलाय मोठा" 'उंटावर चा शहाणा' नुसता एऱ्एऱ् उंटा वरचा शहाणा काय ग! . '"कानामागून आली न....बोल बोल..." "लहान तोंडी मोठा घास" काय ' "दिदू ए छोटी दिदु" "इकडे ये" कस आहे ना, माझ अस झालं य ना 'रात्र थोडी सोंग फार ' "कळतंय कळतय बर का सगळ कळतय" ' लेकी बोले सुने लागे ' "आता कस". 'शहाण्याला शब्दाचा मार वा! ग वा !' मऊ लागले म्हणून कोपरा ने खणू नये.' म्हटल. "भेटल भेटलं तुला पण कधीतरी भेटेल " 'शेरास सव्वाशेर' बर का ?" "कितीही झालं तरी " 'सरड्याची धाव कुंपणापर्यंत च ' असते बर का ? "बरं बरं कळलं कळलं "जसा देश तसा वेश " "कसं आहे ना कधीपण" 'दुभत्या गाईच्या लाथा गोड ' लागणारच ना! हो तर मग!" मी पण जाऊ दे" 'दृष्टी आड सृष्टी ' "असच बोलणार हो " कितीही चांगले असले तरी 'नावडतीचे मीठ आळणीच' कितीही झाले तरी आळणीच ना' जावू दे ना आता . 'नवी विटी नवे राज्य ' बस कर ना आता "नाही नाही, काही ही झाले तरी" 'पळसाला पाने तीनच ' माहिती आहे मला काही नाही ग! असेच आहे!" कितीही म्हणालं तरी 'पालथ्या घड्यावर पाणीच ' पाणी नाही ग "मग मी पण म्हणू का ?" "'बळी तो कान पिळी" आतून आवाज आला बास झाले की आता, जावू दे 'पाचा मुखी परमेश्वर ' "आता काय बोलणार" मला तरी वाटतेय " गर्जेल तो पडेल काय ?" मला माहिती आहे की, तुझे 'ताका पुरते रामायण ' नुसते," काय बाई" ' "ज्याचे करावं भल तो म्हणतो माझच खर "तर तर जणू काय ' "गोगल गाय अन् पोटात पायच जणू" "आता मी काय बोलणार" ' पदरी पडलं नी पवित्र झाले म्हणायचं' दुसर काय ? "'घरच थोड त्यात व्ह्यायान धाडलं घोड "एवढ्या सगळ्या त "वासरात लंगडी गाय शहाणी म्हणायची" एवढं सगळं करून 'सुध्दा स्वतःच्या डोळ्यातलं मुसळ दिसनार नाही, पण दुसऱ्याच्या डोळ्यातील एवढं स कुसळ तेवढं दिसनार' "जावू दे ना ताई!"

'कशाला वड्याच तेल वांग्यावर काढते.' नाहीतर व्हायचं असं की "'दोघांचे भांडण अन् तिसऱ्याचाच लाभ ' " जावू दे ग! "लहान तोंडी मोठा घास घेतला" जावू दे ना आता." आता कस 'शहाण्याला शब्दाचा मार' "माहिती आहे ला...." माहित आहे ना ?" बास झालं आता "प्रयत्नांती परमेश्वर" हो..हो.. तर.. तर.. "हाताच्या काकणाला कशाला हवाय आरसा" "हाताचे सोडून पळत्याच्या पाठीमागे लागुया नको" "झालं गेलं गंगेला मिळालं" "साखरेचे खाणार त्याला देव देणार. " "कर भला सोच भला" "ज्याचा शेवट गोड त्याचे सर्व च गोड."

# घटनाबाह्य निर्णय घेणारे कोश्यारी पुन्हा नामानिराळेच!



मधुकर भावे
ज्येष्ठ पत्रकार

आधुनिक केसरी


**सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आला. दोन महत्त्वाचे विषय त्यांच्यासमोर होते. पहिला विषय होता तो दिल्लीचे नायब राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांच्या अधिकाराच्या वादाचा. राज्याचा दैनंदिन कारभार करताना अधिकार मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाचे की, राज्यपालांचे? या विषयात सर्वोच्च न्यायालयाने घटनेला अनुसरून नेमका निर्णय दिला गेला. सर्वोच्च न्यायालयाने या विषयाचाच स्पष्ट निर्णय केला आिण त्या त्या राज्याचा मुख्यमंत्री हाच प्रशासकीय प्रमुख आहे, असा निर्णय दिला. पहिल्या विषयात त्यामुळे निर्णय झाला. दुसरा महत्त्वाचा विषय होता तो, महाराष्ट्रच्या राजकारणातील उलथा-पालथीचा. सुभाष देसाई विरुद्ध मुख्यसचिव महाराष्ट्र...**

असा हा दावा शिवसेनेने दाखल केला होता. या दाव्याचा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने समतोल निरिक्षणे नोंदवली. पण, निर्णय झाला, असे म्हणता येणार नाही... 'मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिला नसता तर आम्ही त्यांना अधिकार बहाल करू शकलो असतो....' याला निर्णय म्हणता येणार नाही, हे विश्लेषण आहे. महाराष्ट्राच्या त्यावेळच्या राज्यपालांनी बेकायदेशीरपणे अनेक विषयांत हस्तक्षेप केला, घटनाबाह्यरितीने निर्णय केले... १७ आमदारांना अपात्र ठरवण्याचा निर्णय आम्ही करू शकत नाही, तो अधिकार अध्यक्षांचा आहे, हा एकच महत्त्वाचा निर्णय दिला आहे. आणि खटल्याचा मुद्दा नेमका तोच होता.

घटनाबाह्य वर्तन करणाऱ्या राज्यपालांचे काय वाकडे झाले ? तो त्यांच्या मुलाखतीत आजही डेहराडूनला सहजपणे सांगून जातात... 'झाले ते झाले... आता विषय संपला...' आणखी एक महत्त्वाचे विश्लेषण म्हणजे 'विधानसभा अध्यक्षांनी प्रतोदाला मान्यता देण्यात चूक झाली'. गोगावले यांची प्रतोद म्हणून केलेली निवड बेकायदेशीर आहे. हा एक स्पष्ट निर्णय आहे. त्यामुळे गोगावलेंचे पद गेले. आता अपात्रतेचे अधिकार अध्यक्षांकडे गेले... तिथे काय निर्णय येणार ? हे आजच सांगता येईल. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय येण्यापूर्वी श्री. देवेंद्र फडणवीस हे जाहीरपणे सांगत होते की, 'निर्णय आमच्याच बाजूने येईल'. प्रख्यात बहाद्दर विधिज्ञा उज्ज्वल निकम यांनी तर स्पष्टच सांगितले होते की, 'राज्यपाल कोश्यारी यांनी बेकायदेशीर निर्णय केले, असा ठपका येईल'. तसा तो आला. महाराष्ट्रात मुंबई उच्च न्यायालयाने त्या त्या वेळच्या दोन मुख्यमंत्र्यांवर 'ठपका' ठेवल्यावर त्या त्या मुख्यमंत्र्याला राजीनामा द्यावा लागला होता. येथे राज्यपालांवर नुसता ठपका नाही तर राज्यपालांना सोलून काढले आहे. पण, त्यांचे काय वाकडे झाले ? आता विश्लेषण असे करता येईल की, इतर राज्यपालांना यापासून धडा घेता येईल. राजकारणात असे धडे घेतले जात नाहीत. भगतसिंग कोश्यारी यांना ज्या कारणाकरिता महाराष्ट्रात पाठवले होते... ती त्यांची 'जबाबदारी' त्यांनी भाजपाच्या दिल्लीच्या नेत्यांना हवी तशी पार पाडली. याची सुरुवात आघाडीच्या मुख्यमंत्र्यांनी १२ आमदारांच्या पाठवलेल्या यादीला दाबून ठेवण्यापासून झाली. त्यांना केंद्रीय गृहखात्याच्या स्पष्ट सूचना असाव्यात... 'काय वाट्टेल ते झाले तरी यादी मंजूर करायची नाही.' आता प्रश्न असा आहे की, सर्वोच्च न्यााायलय म्हणते की, राज्यपालांनी घटनाबाह्य काम केले.' मग त्यांच्यावर कोणत्या स्वरूपात कारवाई होणार ? कारवाईची शक्यताच नाही... त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय हे विश्लेषणच ठरते. एकप्रकारचे पोस्टमॉर्टम... रोगी का मेला.... याचे निदान. पण, रोगी मेलेलाच आहे.

अनेक पत्रकारांना याच केंद्रीय सरकारच्या सरकारविरोधातील लिखाणाबद्दल 'देशद्रोही'सुद्धा ठरवले आहे. राज्यपालांनी घटनाबाह्य निर्णय केल्यानंतर 'घटनाद्रोही' अशी त्यांच्यावर कारवाई होऊ शकते का ? या कोणत्याच प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय 'दोन्ही बाजू जिंकल्या', अशा थाटाचा आहे. त्यामुळे एका दैनिकाने 'शिंदे यांना सत्ता.... ठाकरे यांना बळ' असेच शिर्षक दिले. सत्ता टिकली म्हणून शिंदे गट खूश आहे आणि नैतिकतेच्या आधारावर राजीनामा दिला. म्हणून शिवसेनेचे नेते खूश आहेत. अर्थात येणाऱ्या निवडणुकीत झालेल्या निर्णयाचा राजकीय फायदा निश्चितपणे आघाडीलाच होईल, आणि तो दीर्घकाळाकरिता होईल. शिंदे यांचे सरकार आज टिकले...पण, निवडणुकीत याचे फार समर्थन करता येणार नाही. उद्धवसाहेबांनी 'नैतिकते'चा उल्लेख केला... आजच्या राजकारणात 'नैतिकता' राहिलेलीच नाही. कोणत्याही मार्गाने सत्ता मिळवायची... हा सत्ता मिळवण्याचा एकच मार्ग. भाजपाने अनेक ठिकाणी याच मार्गाने सत्ता मिळवली. कर्नाटक असेल... मध्यप्रदेश असेल... किंवा महाराष्ट्र असेल... उद्धव ठाकरे यांनी राजीनामा देण्याचा निर्णय केला त्यात नैतिक भूमिका होती. पण आजच्या राजकारणात 'निती-अनिती' या शब्दांना काहीही अर्थ राहिलेला नाही. नितीचे राजकारण कधीच संपले. अनितीच्या राजकारणातसुद्धा 'निती' हा शब्द आहेच... त्याच्या पलिकडे आजचे राजकारण गेलेले आहे. ते शब्द उच्चारणारी आणि पाळणारी माणसं वेगळी होती. उंचीची होती... सत्तेसाठी लाचार नव्हती... हव्यासी नव्हती... त्या विषयाची चर्चा करणे चुकीचे आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय समतोल असला तरी त्यात 'निर्णय कमी आणि विश्लेषण जास्त' आहे. हा पहिला मुद्दा. आता महाराष्ट्राच्या गेल्या तीन वर्षांतील राजकारणाचा विचार केला तर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राजीनामा देण्यात चूक झाली, असे म्हटले जात आहे... श्री. शरद पवारसाहेबांनी त्यांच्या नव्या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीत याच दुखण्यावर बोट ठेवलेले आहे. पण, थोडेसे मागे जाऊया... महाविकास आघाडीने सरकार स्थापन केल्यानंतर चुकांची सुरुवात कधीपासून झाली... ? पहिली चूक नाना पटोले यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला इथपासून. ही नुसती चूक नव्हती तर ही घोडचूक होती. त्यांना मंत्री व्हायचे होते. ते मंत्रीही झाले नाही आणि विधानसभा अध्यक्षपदही रिकामे राहिले.आपले सरकार तीन पायाचे आहे... देशातील यापूर्वीच्या अनेक विधानसभेत असे प्रसंग आले तेव्हा अध्यक्षांचा निर्णय महत्त्वाचा ठरलेला आहे, असा विचार आघाडी सरकारने कधीच केलेला दिसत नाही. बहुमत नसताना सरकार स्थापल्यावर राजकीय चिंतन करणारा जो एक गट सरकारच्या मागे असावा लागतो... तसे कोणीही या सरकारच्या मागे नव्हते. मुख्यमंत्री यांची भेट होणे अशक्य होते... जे बोलत होते ते राऊतच बोलत होते... त्या सरकारचे सगळ्यात मोठे नुकसान त्यांच्या बोलण्यातून झाले. ते इथं एवढं बोलतात... आणि अनेक वर्ष खासदार असताना राज्यसभेत बोलत नाहीत... त्यांना सांगणे आहे, 'इथं कमी बोला... राज्यसभेत जास्त बोला...' महाष्ट्राच्या प्रश्नावर किती वेळा बोललेत.. ? महाराष्ट्राचे किती प्रश्न लावून धरलेत... आज तो विषय नाही... पण, तुमचे बोलणे अडचणीचे ठरते आहे, अशी सामान्य माणासाची भावना आहे, हे समजून घ्या.

डावपेचात आघाडीचे सरकार पूर्ण कमी पडले. नानांचा राजीनामा झाल्याचा परिणाम काय झाला ? नवीन अध्यक्षाची नेमणूक तातडीने करावी, असे आघाडीच्या कोणत्याही नेत्याने आग्रहाने सांगितले नाही. खरं तर त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांनी चार दिवसांत नवीन अध्यक्ष बसवायला हवा होता. पण, आघाडीमधील दोष बाहेर दिसले नाहीत तरी त्याचे परिणाम भोगावेच लागतात. नाना काँग्रेसच्या कोट्यातील विधानसभेचे अध्यक्ष होते.. ते पद काँग्रेसच्या वाट्याला होते. मग अध्यक्षपद काँग्रेसच्या कोणत्या आमदाराला द्यायचे... पृथ्वीराजबाबाचे नाव समोर आले... त्याला राष्ट्रवादीने विरोध केला. मग संग्राम थोपटे उद्या विधानसभेचे अध्यक्ष होतील, असे वातावरण तयार झाले. पण, निर्णय झाला नाही. या सगळ्यामध्ये सव्वा वर्ष फुकट गेलं. मुख्यमंत्र्यांनी राजीनामा देणे चूक झाली की नाही, याचा विचार नंतरचा. अध्यक्षाशिवाय सव्वा वर्ष विधानसभा आपण चालवत आहोत, ही सगळ्यात मोठी घोडचूक आहे, असे त्यावेळी कोणलाही वाटले नाही. आघाडीतील कोणत्याही नेत्याला वाटले नाही. मुख्यमंत्र्यांनाही वाटले नाही. उलट त्यावेळी मुख्यमंत्री सांगत होते की, 'विरोधकांना सरकार पाडायचे आहे.... कधी पाडायचे आहे, पाडा... आता पाडा... पाडून दाखवा...'



विधानसभेच्या लॉबीमध्ये पत्रकारांना सांगत होते... त्यावेळी फडणवीसांनी शिंदे यांच्याशी जमवून घ्यायला सुरुवात केली होती. विधानसभेला अध्यक्ष नाही, उद्या फूट पडली तर अध्यक्ष किती महत्त्वाचा आहे, हे एकालाही जाणवले नाही. 'माझ्या पक्षाचा की, तुझ्या पक्षाचा अध्यक्ष' यात अध्यक्षाशिवाय विधानसभेची तीन अधिवेशने झाली. सर्वात मोठी घोडचूक ही होती. संपादक नसला तरी वृत्तपत्रे चालू शकतात... कारण वृत्तपत्राला संपादक लागतोच, अशी स्थिती आज नाही. पण, विधानसभा अध्यक्षाशिवाय चालू शकते, हे महाराष्ट्राने अचाट धाडस दाखवले. आणि तेच अंगावर आले. खरी गोष्ट अशी की, हे सरकार पाडण्याची सुरुवात तेव्हापासूनच झाली. त्यामुळे चुकांची सुरुवात फार पूर्वीपासून झालेली आहे. सर्वोच्च न्यायालयाने राज्यपालांवर ठपका ठेवला. पण, हे राज्यपाल आल्या दिवसापासून आणि आघाडीचे सरकार झाल्यापासून, भाजपाचे मुंबईतील ऑफिस राजभवनवरच हलवण्यात आले होते. फडणवीस यांचा मुक्काम तिथेच होता. तिथे काय काय खलबतं चाललेत.... कोण कोण येत आहे... कोणा कोणाला फोन लावले जात आहेत... मुख्यमंत्र्यांच्या गृहखात्यातील जो खास 'एस. बी. वन' विभाग आहे. त्या विभागाच्या डी.सी.पी.ने प्रत्येक क्षणाची राजकीय माहिती मुख्यमंत्र्यांना पुरवायची असते. रोज सकाळी ८ वाजता पहिली भेट याच डी. सी. पी.ची असते. १९६० पासूनचे मुख्यमंत्री मी पाहिलेत... त्यांच्या कामाची पद्धत जवळून पाहिली आहे. आघाडीच्या मुख्यमंत्र्यांना या कशाचाही पत्ता नव्हता. आमदार पूर्णपणे तुटलेले होते. त्यामुळे राजीनामा नैतिकतेच्या बळावर दिला तरी आजचे राजकारण नैतिकतेवर चालत नाही. ते डावपेचावर चालते. या सगळ्यातच आघाडी सरकार कमी पडले.

आता पुढे काय होईल... ? शेवटी अंदाजच बांधायचे आहेत. १७ आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय विधानसभा अध्यक्षांनी करायचा आहे. तो निर्णय काय होईल, यासाठी फार तसदी घेण्याची गरज नाही. प्रतोदाची नेमणूक पक्षाचे प्रमुख करून टाकतील... निवडणूक आयोगाने पक्षाला मान्यता दिलेलीच आहे. त्यामुळे अध्यक्षांचा निर्णय सोपा होईल. हातातून खेळ एकदा सटकला की तो असा पाऱ्यासारखा सटकतो. तसं या सर्व विषयांत झालेले आहे.

आता आणखी पुढचा प्रश्न म्हणजे पुढच्या दीड वर्षात महा आघाडीला या शिंदे- फडणवीस सरकारविरुद्ध लढायचे आहे. कर्नाटकातील निवडणुकीचे निकाल उद्या येतीलच... देशातील वातावरण भाजपाला अनुकूल नाही... कर्नाटक उद्या सांगेलच... देशाचे सोडून द्या... महाराष्ट्रातील वातावरण तरी ठामपणे या सरकारच्या विरोधात आहे. आणि लोकांचा मुख्य राग आता महागाई- बेकारी या विषयांचा राहिलेला नाही. गॅस सिलिंडरचे भाव वाढले, हा विषयही बाद झाला आहे. खोटी आश्वासने दिली... हे सगळे मुद्दे आता बाद झाले आहेत. लोकांना आता स्पष्ट दिसते आहे की, भाजपाच्या केंद्रीय नेतृत्त्वाला जगातील सगळ्यात जास्त लोकसंख्येच्या या देशातील सगळ्यात मोठ्या लोकशाहीच्या घटनेच्या पुस्तकाची सगळी वीण उचकटून टाकायची आहे. राज्यपालांचा वापर... बेकायदेशीरपणे करायचा आहे. निवडणूक आयोग, ईडी, सीबीआय यांचा वापर राजकारणाकरिता करायचा आहे. आमदारांची फोडाफोडी करायची आहे. दहशत आणि सरकारी यंत्रणा पक्षाकरिता वापरायची आहे. सामान्य माणसाला आता हे सगळं कळलेलं आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील पुढच्या निवडणुकीत भाजपाचे सरकार येणे शक्य नाही. शिंदे गट त्यांच्यासोबत आता आहे या स्थितीत वेगळा पक्ष म्हणून राहणे शक्य नाही. त्यांना भाजपामध्ये विलिन व्हावेच लागेल. त्यांचे दोर कापले गेलेले आहेत. पण, शिंदे यांच्यापुरता विचार केला तर त्यांनी कधी स्वप्नात विचार केला नव्हता ते मुख्यमंत्री पद त्यांना मिळून गेले आहे. टिळा लागून गेला आहे. त्यामुळे जेवढे दिवस मिळतील तेवढे दिवसांत ते त्यांच्या परिने कामाला लागलेले आहेत. 'सरकार तुमच्या दारात' हा कार्यक्रम म्हणजे लोकांपर्यंत पोहचण्यासाठी आहे. सामान्य माणसाला राज्याचा मुख्यमंत्री कोण आहे... याच्याशी काही पडलेली नाही... सरकार कोणाचे आहे, याच्याशीही त्याचे घेणे- देणे नाही. त्याची छोटी- मोठी कामं सहजपणे झाली तर तो सामान्य नागरिक खूष असतो. शिंदेंना हे बहुतेक कळलं आहे... म्हणून त्यांचा तो प्रयोग त्यांना मदत करेल आणि भाजपाला काम न करता त्याचा नकळत फायदा होईल, हे समजून घ्या.

पण असे असले तरी लोकांना हे सरकार मान्य नाही. शिवसेनेच्या सभा प्रचंड होत आहेत. आघाडीच्या सभाही मोठ्या आहेत. हे वातावरण दीड वर्ष टिकवावे लागेल. त्यामळे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर चर्चा करण्यात दिवस घालवू नका... तो विषय संपला. आजच्या सरकारला लोकांचा फार मोठा प्रतिसाद नाही. भाजपा आणि फडणवीस यांना शिंदे यांची गरज त्यामुळेच आहे. शिवाय महाराष्ट्रात तरी एक तगडा 'मराठा नेता' सोबत असल्याशिवाय फडणवीसांचे दुकान चालणार नाही. चंद्रकांत पाटील फेल झाले.आशिष शेलार यांना 'नेता' म्हणून मान्यता नाही. त्यामुळे फडणवीस या राज्यात भाजपाला बहूमत मिळवून देवू शकणार नाहीत. त्यांच्या नेतृत्त्वाच्या मर्यादा स्पष्ट झालेल्या आहेत. काही कारागिर उत्तम निर्मिती करणारे असतात. काही जण तोडफोड करण्यात हुशार असतात. फडणवीस दुसऱ्या श्रेणीतील आहेत. आणि ती त्यांची प्रतिमा आता त्यांना बदलता येणार नाही. त्यामुळे सध्या जीवदान मिळालेले सरकार येणाऱ्या निवडणुकीत बहुमत मिळवेल, ही शक्यता जवळजवळ नाही. मात्र...

... आणि महत्त्वाचा विषय इथेच आहे... शरद पवारसाहेबांनी राजीनाम्याची भूमिका घेतली तेव्हा मी त्यांना हेच सांगत होतो की , 'तुम्ही बाजूला झालात तर ही महाविकास आघाडी तुटलीच समजा....' त्यांच्या घरी जेव्हा त्यांना भेटलो तेव्हा त्यांना यशवंतरावांची शपथ घातली.. सर्वांच्या भावनेचा आदर करून त्यांनी चांगला निर्णय केला. आता आघाडीत कुरबूरी होता कामा नयेत... व्यक्तिगत अहंकार बाजूला ठेवले पाहिजेत.. एकमेकांच्या विरुद्ध आरोप करणे बंद व्हायला पाहिजे. 'सामना'मध्ये राऊतांनी लिहिले की, 'शरद पवार एकटे होते तेव्हा सामना त्यांच्या बाजूने उभा राहिला....' शरद पवार एकटे कधीच नव्हते... शिवसेना जेव्हा एकटी पडली तेव्हा, महाआघाडी स्थापन होवून त्यांना सत्ता मिळाली. त्यात पवारसाहेबांचा फार मोठा रोल आहे. आता आघाडीतील अंतर्गत भांडणे थांबवा... नाना पटोलेंनाही हात जोडून विनंती आहे की, दीड वर्ष काही बोलू नका... परवा इंडियन एक्सप्रेच्या कार्यक्रमात खासदार सुनील तटकरे यांनी नेमकी हीच भूमिका प्रभावीपणे मांडली. भांडणं झाली तर आघाडीत बिघाडी होईल... तेवढे टाळा... मग जमतंय की नाही ते बघा... तिन्ही पक्षांची एक समिती करा... त्याचे अध्यक्ष सुनील तटकरे यांना करा... तो एक समंजस नेता आहे. वादाचे मुद्दे समितीसमोर आणा... पवारसाहेबांचा सल्ला घ्या... एकमताने निर्णय करा... जर २०२४ ला या महाराष्ट्रात भाजपाला पराभूत करता आले नाही. तर मी जिवंत असेपर्यंत तरी, म्हणजे पुढची पाच-दहा वर्षे तरी, भाजपाला सत्तेच्या बाहेर ठेवणे अशक्य वाटते... 'आता नाही तर कधीच नाही..' असे हे आताचे वातावरण आहे. ते समजून घ्या. शिंदे यांना पुढे करून भाजपाला लढाई जिंकायची आहे. मग शिंदेंचे महत्त्व संपले. हा डाव लक्षात घ्या. तरच २०२४ च्या निवडणुकीत सध्याच्या शिंदे- भाजपा सरकारच्या विरोधात महाराष्ट्र काही वेगळा निर्णय देवू शकेल... लढाई वाटते तेवढी सोपी नाही, हे लक्षात घ्या. सर्वोच्च न्यायालयापेक्षा 'लोक न्यायालय' पाच वर्षातून एकदाच निर्णय देते. ती लढाई जिंकायची आहे.

सध्या एवढेच....

# समाजभान-कर्तव्याची जाण ठेवा



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**गेल्या काही वर्षापासून मिरवणुकीमध्ये डी.जे नाही असे होत नाही. मिरवणुकीमध्ये डी.जे एक आवश्यक बाब झाली आहे . डी.जे नसेल तर मजाच नाही, असे समीकरण झाले आहे. मग ती मिरवणूक गणपती स्थापना, विसर्जनाची, असो. दुर्गा उत्सवातील असो किंवा लग्नाच्या वरातीची असो महापुरुषाच्या जन्मतिथी निमित्त असो त्यात डी.जे हवाच हा आग्रह असतो. दहीहंडी,होळी, धुळवडचा कार्यक्रमातही डी.जे लावला जातो.**

डी.जे म्हणजे काय तर त्याला डिस्क जाँकी असे म्हटले जाते. त्यात रिमिक्स गाणे,संगीत वगैरे असतात आणि ती मोठ्या आवाजात लावून मग त्याच्या तालावर नाचतात.. बेभान होवून. तो आवाज जितका जास्त मोठा... कर्कश तितका नाचणाऱ्याचा उत्साह असतो असे काही असते. मग त्या आवाजाचा कोणाला काय त्रास होतो त्याचे भान नसते. उत्सव साजरे करताना उत्साह जरूर हवा आणि त्या उत्सवाचा आनंदही घ्यावा. परंतु दिवसेंदिवस असे उत्सवातून आनंद मिळवतांना त्याच्या अतिरेकाने किंवा अति उत्साहाने त्रास व्हायला लागला आहे असे म्हणावे लागेल. उत्सवात युवा वर्गाने सहभागी होताना काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. परंतु त्या वेळेस त्याचे भान राहत नाही. अतिरेक होतो. डी.जे चा वापर करताना एका ठराविक मर्यादेपर्यंत आवाज ठेवल्यास त्या संगीतात काहीतरी गोडवा राहतो, ऐकावेसे वाटते पण अति कर्कश्य मोठ्या आवाजात जर ते रिमिक्स लावले गेले तर आजूबाजूच्या अनेक घटकांना त्रासच संभवतो आणि आपल्या आनंदासाठी खूप लोकांना त्रास होणे हे सुद्धा काही योग्य नाही. मध्यंतरी काही घटना घडल्यामुळे परत हा विषय सोशल मीडियावर चर्चेला आला आणि त्यावर खूप मोठ्या प्रमाणात मत मतांतरे येऊ लागली.

नगर जिल्ह्यातील एका शिक्षकाला हनुमान जयंती चे दिवशी डी.जे.च्या आवाजाचा त्रास होऊन चक्कर आल्यानंतर ते शिक्षक कोमात गेलेत. आणि गेल्या दोन-तीन दिवसापूर्वी त्यांचे निधन झाले .अर्थातच डी.जे.च्या कर्कश आवाजाचा त्रास झाल्यामुळे हे घडले असावे असा अंदाज बांधला गेला आहे. त्याचबरोबर भंडारा जिल्ह्यातील तरुणाला डी.जे.च्या कर्कश आवाजाचा त्रास होऊन कायमचे बहिरेपणा आला. पुण्यात लोकप्रतिनिधीचे कानाचा पडदा फाटला. तो कार्यक्रम त्यांनी स्वतःच आयोजित केला होता. तर लग्नाच्या मंडपातच नवरदेवाला डी.जे चा त्रास होऊन चक्कर येऊन पडला आणि तेथेच मृत झाला अशी ही घटना वाचण्यात आली. अशा अनेक घटना घडत असतात सगळ्यांनाच प्रसिद्धी मिळत नाही. तेव्हा एखादे प्रकरण माध्यमाद्वारे उचलले जाते त्याला प्रसिद्धी मिळते त्याच वेळेला अशा गोष्टी समोर येतात आणि मग त्याच्यावर तात्पुरते का होईना विचारमंथन सुरू होते. डी.जे.च्या कर्कश आवाजामुळे आजूबाजूच्या हॉस्पिटल्स, शाळा, घरांना, घरातील वृद्धांना, आजारी माणसांना त्रास होत असतो. परंतु त्याचा विचार होत नाही आणि उत्साहाच्या भरात कोणी या गोष्टीकडे लक्ष देत नाही. रस्त्याने जाणाऱ्या नागरिकांना याचा त्रास होत असतो अनेक वेळा अशा मिरवणूक घेऊन जाताना मुलांना वयस्कर माणसांना त्रास होऊन चक्कर येऊन पडल्याच्या बातम्या वाचल्या आहेत काही वेळात आवाजाने मृत्यू झाल्याची बातमी वाचले आहे. आता तर लग्नाच्या मिरवणुका सुद्धा दोन दोन तीन तीन तास सुरू असतात.अशा मिरवणुका रस्त्याने किंवा गल्लीतून जात असताना अक्षरशः घराच्या चौकटी थरारतात, भांड्याच्या रॅक मध्ये भांड्याचा आवाज येतो, म्हणजे त्याची कंपन अशाप्रकारे जाणवतात तर पादचाऱ्यांना किती जाणवत असेल याची कल्पना करावी. मिरवणुकीला किंवा वरातीला दिलेली वेळ आणि वाद्य परवानगी आणि त्या वाद्याची क्षमता म्हणजेच डेसिबल त्याच्यावर नियंत्रण असावे कारण 75 डेसिबल पेक्षा जास्त आवाजावर बंदी आहे आणि असा आवाज कोणासाठीही धोकेदायक ठरू शकतो. दिवसा 55 डेसिबल आणि रात्री 40 डिसिबल मर्यादा असावी असे आहे. परंतु त्याचे नेहमीच उल्लंघन केले जाते आणि असे उल्लंघन झाल्यास दीर्घकाळ तो आवाज असल्यास बहिरेपणा येण्याची शक्यता असते तसेच ब्लडप्रेशर, हृदय विकार, या रुग्णांना धोका असतो. आपल्याकडे फक्त वाद्याला परवानगी दिली म्हणजे झाले, मग ती मिरवणूक, वरात, किती वेळ चालते आवाजाची मर्यादा काय आहे ? हे कोणी बघतच नाही. अर्थात त्यालाही अनेक कारणे आहेत त्याची चर्चा सध्या सोशल मीडियावर सुरू आहे. राजकारण्यांचा हस्तक्षेप, अधिकाऱ्यांची कार्यक्षमता, तसेच डी.जे मालकांचा दबाव, या गोष्टी कारणीभूत आहे. डी.जे मालक गुंड प्रवृत्तीचे असू शकतात राजकारण्यांचे त्यांचे जवळचे संबंध असतात, तसेच पोलीसांना बिदाई दिली जाते, म्हणून ते दुर्लक्ष करतात. शाळा, हॉस्पिटल ,न्यायालय , सायलेन्स झोन असतात



त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्रास अनेक लोकांना होतो पण तक्रार करायला कोणी धजत नाही. आणि तक्रार नाही त्यामुळे कोणी काहीच कारवाई करत नाही असे होते. अनेक वेळा पोलिसांसमोरही डी.जे. कर्कश आवाजात वाजवला जातो परंतु ते स्वतः होऊन काहीही करत नाही। प्रदूषण महामंडळ आहे पण अशा कार्यक्रमाच्या संदर्भात ते ध्वनिप्रदूषणासाठी काही ठोस भूमिका घेत नाही.अशी चर्चा सुरू आहे. तीही योग्यच आहे. माझ्या परिचित एक ग्रहस्थ होते त्यांनी त्यांचा अनुभव सांगितला. त्यांच्या घरापासून जवळच एक दोन तीन मिनिटाच्या अंतरावर जवळपास दीड ते दोन तासापासून डी.जे.वर कर्कश आवाजात गाणे सुरू होते. त्यांना त्रास व्हायला लागला म्हणून त्यांनी पोलीस स्टेशनला फोन लावला व आपले म्हणणे सांगितले. त्यावर हो करतो त्यांचा बंदोबस्त असे म्हणून फोन ठेवला. जवळपास एक एक तासानंतर आवाज सुरू होता म्हणून त्यांनी परत फोन लावला त्यावर ते म्हणाले बंद झालं नाही का ? बघतो मला एक दहा मिनिट द्या. असे म्हटल्यानंतर हे पुन्हा अर्धा पाऊण तास गेला परंतु आवाज बंद झाला नाही म्हणून त्यांनी परत तिसऱ्यांदा फोन लावला. त्यावर ते पोलीस अधिकारी म्हणाले ठीक आहे, अहो त्यांनी कॉन्स्टेबलाही त्यांना परतवून दिले. आता मीच जातो आणि ते गेल्यानंतरही त्यांनी विनंती करून फारसा आवाज कमी झाला नाही.आणि वेळेची मर्यादा संपून गेल्यानंतर डी.जे चा आवाज बंद झाला. त्यानंतर त्या पोलिस अधिकारी यांनी फोन केला व सांगितले, अहो मी गेल्यावर सुद्धा ते ऐकायला तयार नव्हते, त्यांना विनंती केली तरी. ते मला म्हणतात "साहेब तुम्ही रिकामे काम करू नका महागात पडेल बघा".ते अधिकारी म्हणतात आम्हाला नोकरी करायची आहे. थोडक्यात काय नियम आहे, कायदा आहे, परंतु त्याची अंमलबजावणी मात्र अशा गोष्टीमुळे होत नाही. तेव्हा एकच गोष्ट आहे अशा परवानग्या देताना वेळेची मर्यादा आणि आवाजाची मर्यादा दोन्ही गोष्टीवर नियंत्रण हे ठेवायलाच पाहिजे आणि त्यासाठी आवाजाची मर्यादा मोजण्यासाठी योग्य ते साधन पुरवायला पाहिजे. आणि ते जर पाळले नाही तर कारवाई व्हायलाच पाहिजे. आपण बघतो दहीहंडीमध्ये थरावर थर चढवताना अनेक गोविंदा मृत्यूमुखी पडतात म्हणून दहीहंडी बंद झाली नाही. बैलाच्या शर्यतीत दोघे जखमी होतात म्हणून त्या शर्यती बंद झाल्या नाही, तसेच डी.जे मुळे सामान्य जनतेला त्रास होतो अशा प्रकारे कर्कश आवाजाने, बहिरेपण, मृत्यू येतो, म्हणून डी.जे वर काही बंदी येणार नाही हे तेवढे सत्य आहे. परंतु तरीही याचा समन्वय साधायला हवा .
वेळेची आणि आवाजाची मर्यादा पळायला हवी थोडक्यात काय तर समाजभान आणि कर्तव्याची जाण या दोन्ही गोष्टींचे भान ठेवायला हवे.

# आई... जगण्याच्या लढाईतील महान योद्धा

आधुनिक केसरी

***प्रेमस्वरूप आई ! वात्सल्यसिंधु आई. आईच्या प्रेमाची आणि वात्सल्याची महती कवी माधव ज्युलियन यांनी आपल्या कवितेतून अतिशय सुंदर अश्या शब्दात केली आहे. आई म्हणजे मातृत्वाचा अखंड वाहणारा झरा आणि तीच्या प्रेमाच्या वात्सल्यात आपण दररोजच न्हावून निघत असतो. अश्या या देवतास्वरूप आईला माझे कोटी कोटी वंदन..... आई च्या रूपामध्ये सत्यम शिवम आणि सुंदरम चे दर्शन घडते. सत्यम म्हणजे सत्य हे सत्यच असते. जगात नेहमी सत्याचाच विजय होतो. शिवम म्हणजे कल्याणकारी, शुभ, पवित्र, शांती, सुख, आनंद आणि प्रेम देणारी शक्ती. सुंदरम म्हणजे सर्व प्रकारची सुंदरता.. मनाची, गुणांची आणि आदराची..**

आई नेहमी आपल्याला सत्य बोलायला शिकवते. आपल्यासाठी कल्याणकारी, शुभ आणि मंगलमय अश्याच विचाराची शिदोरी देते आणि आपले मन सुंदर आणि पवित्र ठेवण्यास सांगत असते. म्हणूनच म्हणावसं वाटतं की आई म्हणजे सत्यम, शिवम, सुंदरम चे अनमोल रूप आहे.

आई माझा गुरू : आई माझे कल्पतरू, आईचे प्रेम आकाशाहून मोठे आणि सागराहूनही खोल आहे.' असा आईचा गौरव साने गुरुजी यांनी केला आहे.म्हणूनच म्हणतात की आई आपली प्रथम गुरु असते. ती आपल्याला बोलायला, चालायला, लिहायला आणि वागायला शिकवते . आपल्यावर चांगले संस्कार करून जगण्याची एक दृष्टी देते . एक माणूस म्हणून जगण्याच बळ देते.

तिच्या संस्कारांतून, तिच्या वागण्या-बोलण्यांतून आणि तिच्या कृतितून आपली जडण - घडण होत असते. माँ जिजाऊने शिवाजी महाराज यांना स्वराज्याची प्रेरणा दिली. महात्मा गांधीजींच्या मनात सत्याचा आग्रह करण्याचे बीज त्यांच्या आईने रुजवले. विनोबांना भूदानाची कल्पना त्यांच्या आईच्याच शिकवणुकीतून सुचली होती. आपली आईही आपल्यासाठी प्रेरणादायी स्त्रोत असते. आपली खरी गुरु आणि मार्गदर्शक असते. आ म्हणजे आत्मा आणि ई म्हणजे ईश्वर यांचा देवी साक्षात्कार म्हणजे आई होय. आई हा शब्दच किती गोड आहे. त्या शब्दात अनमोल असे माधुर्य भरलेले आहे. सारे विश्व या शब्दात सामावलेले दिसत असते . आई हा शब्दातच प्रेम,माया आणि अपार ममता आपणास जाणवतात. जगात ईश्वराचे दुसरे रूप म्हणजे आई असते. 'ईश्वर हा प्रत्येक मुलांसोबत राहू शकत नाही म्हणून त्याने आईला बनवलं आहे.' असे म्हटले जाते.आई ही बाळाचे सर्वस्व असते. गर्भात असल्यापासूनच मूल आपल्या मातेवर अवलंबून असते. प्रसूतीच्या मरणप्राय वेदना सहन करून ती आपल्या बाळाला जन्म देते. बाळाला जन्म दिल्यानंतर ती त्याला मायेच्या स्पर्शाने ओंजराते -गोंजारते. त्यातूनच बाळाला जगण्याची नवी ऊर्जा मिळते. आईच्या पालन पोषण आणि संस्काराच्या बळावर बाळ लहानांचे मोठे होते. आई खरच काय असते, लंगड्याचा पाय असते, वासराची गाय असते दुधावरची साय असते, लेकराची माय असते आई असते जन्माची शिदोरी सरतही नाही आणि उरतही नाही. * असे ' *आई* ' या कवितेतून फ. मु. शिंदे यांनी आईची महान थोरवी सांगितली आहे. खरंच आई काय असते ? वासराची गाय आणि दुधावरची साय असते. सृष्टीचे सर्वश्रेष्ठ रूप आईला मानले जाते. जगातील पवित्र, मंगल, उदात्त, भव्य -दिव्य ते सर्व मातृरूप होऊन प्रकट होते. लहान मुलांचा श्वास, जगणं आणि सारे विश्वच आई असते. आपल्या मुलांना जरासेही दुःख होऊ नये म्हणून आई जीवाचे रान करत असते आणि तळहातावरील फोडा प्रमाणे आपल्या पिल्ल्याला जपत असते. हृदयाच्या मखमली पेटीत ठेवण्यासारखी दोनच अक्षरे आहेत; ती म्हणजे आई! जीवनात येणाऱ्या सुखदुःखाच्या फेऱ्यात अडकलेल्या आपल्या बाळाला धीर देण्यासाठी आई चंदनासारखी झिजत असते.

आईने आपल्या मुलाला कितीही मारले तरी पुन्हा मूल तिच्याच कुशीत शिरत असते ; कारण आईच्या रागापाठीमागे प्रेमचं असतं हे त्याला माहीत असतं म्हणूनच साने गुरुजी म्हणतात-

**फुलामध्ये फूल। हुंगावे जाईचे**
**सुख भोगावे आईचे। बालपणी।**
**माऊली माऊली। कल्पवृक्षाची साऊली**
**तान्हेबाळा लागी दिली। देवाजीने.**

आई आपल्या जीवनाला आकार देते असते. आपल्या अंधकारमय जीवनाला उजळून प्रकाशमय करत असते. आईच चंद्राच्या शीतल



हृदयासारखं आपल्याला शीतल छायेत वाढवत असते.

आईची महिमा सांगताना प्रसिद्ध गीतकार शांताराम नांदगावकर म्हणतात, ''माझ्या जीवनात मी आईला ईश्वराचे स्थान देतो." आई आपल्या मुलांच्या जीवनाला आकार देणारी वात्सल्यमूर्ती असते. आई कधी रागावते, मारते पण मुलांच्या कल्याणासाठी अखंड प्रयत्न करत असते. आईचे प्रेम, तिने केलेले संस्कार, तिच्या शिकवणुकीचे चार शब्द या साऱ्याचा आपल्या जडणघडणीत खुप मोठा वाटा असतो! ही शिदोरीच आपल्याला जीवनभर सोबतीला असते. संघर्षाच्या, सुख-दुःखाच्या कसोटीच्या प्रसंगात मोलाची ठरते.आईची माया - ममता आणि प्रेम हे निस्सीम असते

आई म्हणजे आपल्यासाठी अखंड वाहणारा वात्सल्याचा झरा आहे. साऱ्या विश्वात आई सर्वात श्रेष्ठ आहे. आपल्या मुलांवर बालपणापासूनच योग्य संस्कार देणारी आई जागतील आपला पहिला गुरु आणि मार्गदर्शक होय.

आई स्वतः भुकी राहते पण आपल्याला अन्न देते. आई आपल्यासाठी स्वतःचे संपूर्ण जीवन बलिदान करतांना दिसत असते. आई नेहमीच स्वतः चे सुख दुःख विसरून आपल्याला नेहमी आनंदी ठेवण्याचा सतत प्रयत्न करत असते. विनोबा भावेंसारखे थोर देशभक्त आईची महिमा गातांना म्हणतात, की 'आईची पूजा म्हणजे वात्सलतेने उभ्या राहिलेल्या परमेश्वराची पूजा. आई म्हणजे निस्सीम सेवेची मूर्ती होय सूर्यकिरणांच्या स्पर्शान कमळं उमलावीत तशी आईच्या वात्सल्यरुपी प्रेमानं बालकाची जीवनकळी उमलत असते. आकाशाहून अथांग अन् सागराहून विशालतेचे प्रतिक बनून आई आपल्या बालकाला जीवनाचे धडे शिकवित असते . आई आपल्याला बाळाला संस्काराची शिदोरी जन्मभर देत असते. जगात त्याला पावलो पावली येणाऱ्या संकटातून मार्ग काढण्याची, ध्येय गाठण्याची चिकाटी बाळगण्याची शक्ती देत असते. आई आपल्या मुलांवर येणारी हजारो संकटे स्वतः वर घेऊन त्या संकटावर यशस्वी मात करणारी एक महान योद्धा असते. मुलांना संघर्षाच्या मैदानात यशाचा मार्ग दाखवते. विजय मिळवून देते. दुःखाच्या सहवासात देखील आपले सकारात्मक मनोबल वाढवून दुःखाशी लढायला शिकवते.

आपल्या पिल्याला पंखाचे पाठबळ देऊन लढाईच्या मैदानात समोर उभी राहणारी आई.. म्हणजे लढाईतील घनघोर यौद्धयासारखी भासते. आपल्या मुलांसाठी जगातील सर्व शक्तीशी लढण्याची शक्ती फक्त आणि फक्त आईच्या सामर्थ्यात असते. म्हणूनच केजीएफ मधील अभिनेता यश म्हणतो की, " *इस दुनिया में सबसे बडा योद्धा माँ होती है I माँ से बडा कोई ताकतवर नही होता है I " *

आई असे पर्यंत तिची किंमत आपल्याला आणि घरच्यांना देखील कळत नाही पण ती नसली की आपल्या तिची खरी किंमत कळते.तीच्या असण्याचे महत्व कळते. आई नसलेल्या बाळाला विचारा आई नसल्याचे दुःख. आई नाही तर काहीच नाही. हे सारे विश्व स्मशान वाटते. आई नसल्याने अनंत यातना सहन कराव्या लागतात. आई नसल्याचे दुःख व्यक्त करतांना कवी यशवंत म्हणतात..

**आई म्हणोनी कोणी । आईस हाक मारी**
**ती हाक येई कानी। मज होय शोककारी**
**नोहेची हाक माते। मारी कुणी कुठारी**
**आई कुणा म्हणू मी ? आई घरी न दारी**
**ही न्यूनता सुखाची। चित्ती सदा विदारी**
**स्वामी तिन्ही जगाचा। आईविना भिकारी.**

या जगात आई नसेल तर तिन्ही जगाचा स्वामी देखील भिकाऱ्या सारखा राहण्यास मजबूर होतो. आई नसल्यामुळे बालकांचे सारे जगच करपून जाते. जगातील सारे दुःखे त्याच्या वाट्याला येतात आणि हे सुंदर जीवन नकोसे होते. जीवनचं आळणी होते.

म्हणून मला म्हणावेसे वाटते की,

**'आई नसते तेंव्हा**
**काहीच नसतं**
**आपलं म्हणणार**
**कुणीच नसतं**
**प्रेम माया लावणार**
**कुणीच मिळत नसतं सर्वत्र अंधार पसरतो**
**प्रकाश दाखवणार**
**कुणीच भेटत नसतं'**

समुद्राचे औदार्य, चंद्राची शीतलता, सूर्याची प्रखरता, पृथ्वीची विशालता यांचा सुरेख संगम म्हणजे आई.आईच्या मायेत स्वर्ग असतो म्हणून आपण आपल्या आईची मनोभावे सेवा करावी.

चंद्रकांत नांगरे, ग्रंथपाल,
पोदार इंटरनॅशनल स्कूल, हिंगोली

## सर्व-धर्म-समभाव

जात, धर्म, पंथ, वर्ण, वर्ग
कशाला...? भेदभाव तुकडी
माणसाने माणसासाठी
करू नये माणुसकी वाकडी

आधार म्हणून तिसरा पाय
घेतली होती गांधींनी काठी
भिरकावली जनमाणसात
फक्त वर्णभेद मिटवण्यासाठी

खंजीर, भाले, बंदूक, गोळ्या
होतो तणावपूर्ण जमाव
तनमनाच्या अणूरेणूत हवे
सलोखा, सामंजस्याचे गाव

रक्ताचा रंग एक....लाल
भूक तडफड ही समान
तरीही रुतून आहे अजुनी
मनात...धर्म-जातीचे बाण

सोडा आता बुरसटलेला
मी...तू...पणाचा अहंभाव
मनामनाच्या खोल तळाशी
रुजू द्या "सर्व-धर्म-समभाव"

कल्पना मापूसकर
मीरारोड, ठाणे
90826 46494

## दिव्यांची वात पेटली

जनू रात
काजव्यानी लकलकली
अंधारात जनू
दिव्यांची वात पेटली
काळरात्र हिरमुसली
प्रकाशात झगमगली
जनू रात
काजव्यानी लकलकली
अंधारात जनू
दिव्यांची वात पेटली
रातकिड्यांनी बोंभाटे फोडली
सळळळ वारे सुसाट सुटली
ही काळकुट्ट रात्र
चौफेर पसार फिरली
जनू रात
काजव्यानी लकलकली
अंधारात जनू
दिव्यांची वात पेटली
अंधाराच अंजन
डोळ्यात झनझनल
जनू रात
काजव्यानी लकलकली
अंधारात जनू
दिव्यांची वात पेटली
- लक्ष्मण वाल्डे-कन्नड,
जि.संभाजीनगर

## अवकाळी ...!

उन्हाळ्याच्या दिवसामध्ये
अकाली आभाळ गळते,
अचानक वारा - गारांचा
पाऊस शिवारी पळतो.
वादळ-वारा, पावसात
पिके होतात मातीमोल,
कुणब्याचे धैर्य खचून
त्याचा ढासळतोया तोल.
पाण्यात जळतो हंगाम
कुणब्याने गाळले घाम,
गारपीटीला पाहुनीया
घेई तो ईश्वराचे नाम.
साऱ्या पिकांची करे हानी
अकाली झालेला पाऊस,
बळीच्या हाता-तोंडातला
हिरावून घेतो तो घास.
असे कसे रे ईश्वरा तू
कुणब्याला दिले हे शाप,
पिके करतो मातीमोल
कुणब्याच्या भाळी हे पाप.

- अय्युब पठाण लोहगांवकर,
मो. ९७६४३५०३७४.

## उन्हाळ्यातील फुले

पळस फुलला, गुलमोहर फुलला
निसर्गाची शोभा वाढली
सारेच बघती त्यांच्याकडे
मी सुद्धा त्यांच्या प्रेमात पडली

बहावा फुलला पिवळ्या रंगाने
जसे सोन्यासारखे तेजोमय
हिरवेगार झाडे बाजूला
तेही झाले आनंदमय

कुड्याचे फुले पांढरे शुभ्र
सुंगधही त्यांचा येतो
भाजी लागते चविष्ट
आरोग्याला लाभदायक ठरतो

उन्हाळ्यात फुलणारी फुले
माणसांना शिकवण देतात
शिकून घ्यावे त्यांच्याकडून
ते कसे जगून दाखवतात

निसर्गाची ही देण सारी
आहे हो किती न्यारी
मन मोहून टाकतात
उभे राहती भूमातेवरी

सौ.संगीता संतोष ठलाल
मु.कुरखेडा जि.गडचिरोली
७८२१८१६४८५



## डिप्रेशन ..

धकाधकीचे जीवन
यांत्रिकयुगाचा शाप
डेडलाईन्स सांभाळे
लागते कायम धाप

अनामिक काळजी
चेह-यावर पडे छाप
हरवून गेली विश्रांती
वाढत जाणारे व्याप

पुरेशी मिळेना झोप
डोक्याला नवा ताप
अस्वस्थ मना वेदना
वाढत जातो संताप

वेळे मागे धावाधाव
गणिताला बसे चाप
नकारात्मकता वाढे
नको वाटे उपद्व्याप

असंतुलित रेआहार
दावी आपले प्रताप
हळू हळू नवी पिढी
काळजीग्रस्त अमाप

डिप्रेशनचे होई बळी
सुरू हो तिथे विलाप
वेळेचं व्हावे सावध
माझेमाथी माझे पाप

- हेमंत मुसरीफ पुणे.
9730306996.



## धर्मवीर शंभूराजे

धन्य झाला पुरंदर,
धन्य झाल्या जिजाबाई...
कौतुकाने पाहीरूपं,
शिवरायां अन् सईबाई...१
सखू, राणू, अंबिका,
तिन्ही बहिणींच्या पाठी...
शंभूबाळं जन्मां आले,
राणी सईच्या हो पोटी...२
जन्मं देऊन छाव्याला,
सईराणी गेल्या दूरं...
मायं धाराऊने दिली,
पुन्हां अमृताची धारं...३
घेऊन पदराच्या आडं,
देई धारामायं पान्हां...
तिच्या कुशीत सुखावें,
बाळं सईचा गं तान्हां...४
दिसां- मासाने वाढलां,
बाळं शिवबां - सईचा...
त्याच्यासाठी झुरें जीवं,
आजी जिजाऊं बाईचा...५
स्वराज्याच्या संग्रामात,
सुकलं जणूं बालपणं...
भेटीसाठी शिवबांच्या,
किती आतुरले मनं...६
येसुराणींची लाभली,
तेंव्हा सौभाग्याने साथ...
उडी घेती शंभूराजे,
स्वराज्याच्या संग्रामात...७
धर्मवीर शंभूराजा,
धन्य तुमचे बलिदानं...
अवघ्या मराठी मातीला,
तुमचा सार्थ अभिमानं...८
तुमचा सार्थ अभिमानं...
-सौ. शारदा श्रीकृष्ण वानखेडे-चोपडे,
परभणी.९८२३०६६६०६

## ओळखा पाहू मी कोण...?

नीलू, सोनू, शौर्य, स्वरा, प्रिन्स, ऋतू, राज आणि राणी
नको फळा नको पाटी खेळ खेळातूनी गाऊ सुंदर गाणी.
हिरव्या हिरव्या रानी, टुणूक टुणूक उडया मारुनी,
लाल भडक डोळे दिसतात गुंजेवाणी!
हिरव्या भाज्या, न करून्म कुरुम्म गाजर,
हम हम्म ....सांगा सांगा कोण टाके मटकावूनी,
ओळखा पाहू मी कोण... ? ओळखलत का मला कोणी ?
नदीच्या किनारी, आंब्याच्या वणी निळा, हिरवा, करड्या
रंगाचे फुललेले फुलच जणू !
मन टाकते मोहवूनी काळया काळया ढगात
विज गाते जेव्हा गाणी, म्याव म्याव चा आवाज
घुमतो वनराई तुनी, ओळखलत का मला ओळखा
ओळख मी कोण.. ? हम... हम्म !
ओळखेल का मला कोणी.. ? हिरवा हिरवा देठ हिरवी हिरवी पाने,
अन् अवती भवती पाणीच पाणी, पांढऱ्या गुलाबी पाकळ्या
प्रभातीला खुल्या मावळतीला घेतात पाकळी पाकळी मिटूनी.
सांगा सांगा मी कोण.. ? हम...हम्म.. ओळखलत का मला कोणी ?
लाल, गुलाबी, पांढरा, केशरी किती किती रंगातूनी,
पाहणाऱ्याचे मन सौंदर्याने माझ्या टाकतो मी मोहवूनी
वापर माझा होतो आर्युवेद आणि सौंदर्यप्रसाधनातूनी
'फुलांचा राजा' फुललो का सांगा, तुमच्या विचारा विचारातुनी,
हम् हम्म...सांगा सांगा मी कोण... ?
कोण ..कोण.. ओळखलत का मला कोणी ?

©वैशाली महाडिक
संपार्क - ९७६७४३७९२३




## फुल

एका क्षणी वाटले मला
व्हावे फुल भूलवणारे
फांदीच्या हिंदोळ्यावर
बसुनि नित्य झुलणारे

हिरव्या नाजूक पात्यामध्ये
फुलून लाल पाकळ्यांनी
झगमगणारे पराग पिवळे
काट्यांची ती मोहळ जाळी

मंद मंद वायूसंगे
डुलत गाईन गाणी
वसुंधरेच्या ओठांवरली
मी होईल लाली

नभाच्या निरव शांतीत
मिटेल पाकळ्या कणाकणांनी
उष : कालच्या आगमनाने
येईल उमलून क्षणाक्षणांनी

प्रा.डॉ.संगीता दोंदे

## कोयता

हाती धरुनी कोयता दिसभर।
नवरा बायकोने केली मरमर ।।
अन् ऊस तोडला हो गाडीभर ।
तेव्हा मिळते सांजेला भाकर।।
पंधरा दिवसाला होई पगारपानी ।
आम्ही आंगट्याचे आहोत धनी।।
उचल फेडून फेडून राजाराणी । कायमच दशा असे केविलवाणी।।
मलई मुकादमाला,वाढे आम्हाला।
रात्री पहाटेच्या खेपा घालून त्याला।।
दुकानदारांची उधारी, अन उसनवार।
सोसनां भार,राजासर्जाला पडे मार ।।
शेळीबकरी गाय वासरू वेळेला आधार।
हाती धरून कोयता ऊस तोडू ट्रकभर ।।
हेही दिस जातील होऊ आत्मनिर्भर ।
तोरणं बांधु गाडीलाअन होऊं कणखर।।
रचनाकार :आहेर वा.र. नासिक
९९५८७८२९८२


## प्रेम

वेगळीच भाषा मी शिकत आहे
आवारात तुझ्या येउनी ! भान हरवले माझे सगळे
छंद वेगळा घेउनी ! एकटे पणाची साथ सोडुनी
सहवास तुजा बाळगतो मी ! सुरवातीचं क्षण वेचूनी
वाटचाल ही करतो मी ! प्रसंग आपले आठवुनी
नाजुक गालात हसतो मी ! मनात माझ्या शब्द साठवुनी
विचार करत बसतो मी ! स्पष्ट रितीची शिकवन घेउनी
कर्म मनात रुजवतो मी ! पूर्ण जगाचे शब्द वाचुनी
अर्थ तुझ्यात शोधतो मी ! पांढरे शुभ्र आभाळ पाहुनी
चित्र तुझे रेखाटतो मी ! प्रवासात या शांत बसुनी
वाट तुझी ही बघतो मी!
- अक्षय बसवंते, नांदेड

## माझिया जन्मालया

ओलावली पापणी, जड झाले ते पाय,
आवंढा गिळून येता दारी, हांबरते गोठ्यातील गाय.
अडखळे उगी पाय,अन्
कोनाड्या तून आवाज येई
राहिलं का ग तुझ काय,
नजर चुकविता आव आणत
भासतात बाबाजणूअसहाय.
आठवणींचा पिंगा, नि उतू जाते,
उकळत्या दुधावरली साय, ठेचं लागते पायी परतीच्या
वाटेवरी, परी मन परतून पहाय.
हाताचे स्पष्ट अस्पष्ट पालव,
उसासा सांडून तो जाय,
दूर देश खुणावतो, जड झाले जरी पाय,
लेक ओटितलं धान,अंकुरता
उद्या....! म्हणूनच की काय,
सासर माहेर ची घालून गुंफण
पाय रोवून ते ताठ, दारात उभी जणू ती रखुमाय.
दारात उभी जणू ती रखुमाय.
© सौ.वैशाली महाडिक.
संपर्क क्र.- ९७६७४३७९२३

# आईचे महात्म्य



उद्धव भयवाळ
छत्रपती संभाजीनगर

आधुनिक केसरी

**जगातील प्रत्येक धर्म आईचा अपार महिमा सांगतो. प्रत्येक धर्मात आणि संस्कृतीत ' आई'च्या अलौकिक गुणांचे आणि रूपांचे विलक्षण वर्णन आहे. आई' या दोन अक्षरी या शब्दाचा महिमा सारं विश्व व्यापून आहे. मराठी साहित्यात आईचे मोठेपण वर्णन करणाऱ्या साहित्यकृतींमध्ये 'श्यामची आई' ही सर्वश्रेष्ठ आहे, हे कुणीही नाकारू शकत नाही. सानेगुरुजींच्या सिद्धहस्त सृजनशील लेखणीतून साकारलेली ही साहित्यकृती रसिकवाचकांना अतिशय उत्कटतेने मातृमहिमा सांगून मंत्रमुग्ध करते. ' आई ' हा तो अलौकिक शब्द आहे, ज्याच्या नुसत्या स्मरणाने हृदय फुलून जाते, भावनांचा अंतहीन सागर हृदयात आपोआप साठवला जातो आणि मन आठवणींच्या समुद्रात बुडून जाते. 'आई' हा अगम्य मंत्र आहे , ज्याच्या केवळ पठणाने प्रत्येक वेदना नष्ट होतात.**

आई'चे प्रेम शब्दात वर्णन करता येत नाही, ते फक्त अनुभवता येते. बाळाला नऊ महिने पोटात ठेवणे, प्रसूती वेदना सहन करणे , स्तनपान करणे, बाळासाठी रात्रभर जागे राहणे , त्याच्याशी गोड गोड बोलणे, त्याच्यासोबत खेळणे , बोट धरून चालायला शिकवणे, प्रेमाने फटकारणे, त्याला सुसंस्कारित करणे, सर्वात मोठ्या आव्हानाला धैर्याने सामोरे जाणे या सगळ्या गोष्टी फक्त आईच करू शकते. आपले वेद , पुराणे , तत्वज्ञान , स्मृती , महाकाव्ये , उपनिषदे इत्यादी सर्वच 'आई' च्या अगाध महात्म्याने आणि स्तुतीने परिपूर्ण आहेत. अनेक ऋषी, तपस्वी, पंडित, महात्मे, विद्वान, तत्त्वज्ञ, साहित्यिक या सर्वांनी आईविषयी निर्माण होणाऱ्या भावना शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे . इतकं सगळं असूनही 'आई' या शब्दाची संपूर्ण व्याख्या आणि त्याचा असीम महिमा आजपर्यंत कोणीही शब्दात मांडू शकलेलं नाही. आपल्या भारत देशात आई हे 'शक्ती'चे रूप मानले जाते आणि वेदांमध्येसुद्धा आई ही प्रथम पूजनीय आहे, असे म्हटले आहे. पुढील श्लोकातही प्रमुख देवतेला प्रथम ' माता' असे संबोधले आहे. त्वमेव माताच, पिता त्वमेव, त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव, त्वमेव विद्या, द्रविणम् त्वमेव, त्वमेव सर्वम मम देव देव। ऋग्वेदात मातेचा महिमा अशाप्रकारे सांगितला आहे की, ' हे उषेसारख्या जीवाची माता! महान मार्गावर चालण्याची प्रेरणा द्या. तुम्ही आम्हाला कायद्याचे पालन करणारे बनवा. आम्हाला कीर्ती आणि अथांग ऐश्वर्य द्या.' सामवेदात एक प्रेरणादायी मंत्र सापडतो, ज्याचा अर्थ आहे, ' हे जिज्ञासू पुत्रा! आईच्या आज्ञेचे पालन करा. तुमच्या गैरवर्तनाने आईला त्रास देऊ नका. आईला जवळ ठेवा. मन शुद्ध करून आचाराचा दिवा लावा. प्राचीन ग्रंथांमध्ये अनेक औषधांच्या वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्मांची तुलना मातेशी करण्यात आलेली आहे . एका प्राचीन ग्रंथात, अमलाला ' शिव ' ( कल्याणकारी ) , '



वैस्थ ' ( राज्याचे रक्षणकर्ता ) आणि ' धात्री ' ( मातेप्रमाणे संरक्षक ) म्हटले आहे. राजा बल्लभ निघंटू यांनीही ' हरितकी' ( हरडा ) च्या गुणांची तुलना एके ठिकाणी आईशी केली आहे. यस्य माता गृहे नास्ति, तस्य माता हरितकी ।, म्हणजे ज्या घरात आई नसते त्याठिकाणी हरितकी ( हरडा ) मानवाला त्याच्या आईसमान हितकारक असते. श्रीमद् भागवत पुराणात नमूद केले आहे की, मातेच्या सेवेतून मिळालेले वरदान, सात जन्मांचे दुःख आणि पाप दूर करते आणि तिची भावनिक शक्ती मुलांसाठी संरक्षणाची ढाल म्हणून काम करते. यासोबतच श्रीमद् भागवतात ' आई ' ही मुलाची पहिली गुरू आहे, असे सांगितले आहे. रामायणात श्रीराम आई'ला स्वर्गापेक्षा श्रेष्ठ मानतात. ते म्हणतात- 'जननी जन्मभूमीश्च स्वर्गदपि गरियासी ।' , ( म्हणजे आई आणि जन्मभूमी स्वर्गापेक्षा श्रेष्ठ आहेत. ) महाभारतात यक्ष धर्मराजा युधिष्ठिराला विचारतो, 'जमिनीपेक्षा भारी कोण ? ' तेव्हा युधिष्ठिर उत्तरतो-'माता गुरुतरा भूमेः' म्हणजे, 'आई या भूमीपेक्षा खूप भारी आहे.' महाभारताच्या अनुशासन पर्वात पितामह भीष्म म्हणतात, 'भूमीसारखे दान नाही, मातेसारखा गुरू नाही, सत्यासारखा धर्म नाही आणि दानासारखे पुण्य नाही. , यासोबतच महाभारत महाकाव्याचे लेखक महर्षी वेद व्यास यांनी आई बद्दल लिहिले आहे- **'नास्ति मातृसमा छाया, नास्ति मातृसमा गतिः।**

**नास्ति मातृसमं त्राण, नास्ति मातृसमा प्रिया ।।'**

( म्हणजे आईसारखी सावली नाही , आईसारखा आधार नाही. आईसारखा रक्षक नाही आणि आईसारखी प्रिय वस्तू नाही. )

तैत्तिरीय उपनिषदात ' आई ' बद्दल पुढीलप्रमाणे उल्लेख आहे- 'मातृ देवो भवः ।' ( अर्थात, आई देवासमान आहे.} ' आई'च्या चरणी स्वर्ग आहे, असे संतांचेही स्पष्ट मत आहे . आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती यांनी 'सतपथ ब्राह्मण' या स्तोत्राचा त्यांच्या ' सत्यार्थ प्रकाश' या ग्रंथाच्या सुरुवातीच्या टप्प्यात पुढीलप्रमाणे उल्लेख केला आहे- अथ शिक्षण प्रक्रियाः मातृमान् पितृमान आचार्यवान् पुरुषो वेदः ( म्हणजेच , जेव्हा तीन उत्तम शिक्षक असतील, म्हणजे एक आई, दुसरा पिता आणि तिसरा शिक्षक, तेव्हाच माणूस ज्ञानी होईल. ) 'चाणक्य नीती'मध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, ' मातेसारखी कोणतीही देवता नाही. आई ही सर्वोच्च देवी आहे.' मराठी वाङ्मयामध्येसुद्धा माधव ज्युलियन, भास्कर दामोदर पाळंदे, कवी यशवंत आणि अलीकडील काळातील फ. मुं. शिंदे या आणि इतर कवींनी आपल्या कवितांमधून आईची महती सांगितली आहे. भारतीय चित्रपटसृष्टीतही आईवर आधारित अनेक चित्रपट आणि गाणी बनवली गेली आहेत. अनेक गाणी इतकी हृदयस्पर्शी झाली आहेत की , ती ऐकून माणूस पूर्णपणे भारावून जातो. हिंदू धर्मात देवींना 'माता' असे संबोधले जाते. धार्मिक परंपरेनुसार, संपत्तीची देवी ' लक्ष्मी माँ', विद्येची देवी 'सरस्वती मां' आणि शक्तीची देवी ' दुर्गा माँ' आहे. नवरात्रात आईची नऊ वेगवेगळ्या रूपात पूजा केली जाते . ख्रिश्चन धर्मातही आईला सर्वोच्च स्थान देण्यात आले आहे. ख्रिश्चनांच्या पवित्र ग्रंथात स्पष्टपणे लिहिले आहे की, आईशिवाय जीवन नाही. यासोबतच प्रभु येशूची आई मदर मेरी हिला सर्वोच्च मानले जाते. बौद्ध धर्मात, महात्मा बुद्धांच्या स्त्री रूपातील तारा देवीची स्तुती केली गेली आहे. ज्यू लोकही ' आई'ला सर्वोच्च स्थानी ठेवतात. थोडक्यात, देश कोणताही असो, संस्कृती किंवा सभ्यता कोणतीही असो आणि भाषा, बोली कोणतीही असो' मातेबद्दल अतूट आणि अपार आदर आहे.

# आई.....फक्त आईच असते....!



रुपाली वागरे/वैद्य
संपर्क क्र.: ९८६०२७६२४१

आधुनिक केसरी

**मातृत्व ही जगातील अतिशय सुंदर आणि अवर्णिय भावना. आई हा एक अनुभव आहे.आई...या दोन अक्षराने प्रत्येकाच्या मनाचा कोपरा असतो व्यापलेला ...मनाच्या गाभा-यात कायम मायेचा ओलावा असतो दाटलेला...आई या शब्दातच खूप जादू आहे...!!! आई...सृष्टीचे सर्वश्रेष्ठ रुप...क्षितीजावरची प्रात:काळची प्रसन्न सुवर्णप्रभा म्हणजे आई असते... उन्हामधली ती शितल सावली असते...**

पावसातली छत्री होउन ती स्वताःहा मात्र भिजते.लेकरांसाठी जीव धोक्यात घालणारी ती एक हिरकणी असते...उपाशी पोटी राहून ती लेकरांना घास भरवते,आपल्या धैर्याने प्रत्येक संकट ती हरवते... आई खरचं काय असते ?उभ्या जगाचे दैवत असते...अमृताची खाण असते,वात्सल्याचा पान्हा होउन,वादळ,वारा,संकट प्रसंगी तीच खंबीर बाणा असते..आई खरचं काय असते ?

अतुलनीय तीची माया असते...सद्भावनेचा अखंड झरा असते...संवेदनांचे पाट होउन,मायेचा स्पर्श ती देत असते... लेकरांचा ती प्राण असते,नऊमास कुशित सांभाळून ती आयुष्याचा श्वास होते..आई खरचं काय असते ?

आई सुखाचं गोंदण असते...आपुलकीच कोंदण असते.. हजार चूकांना पोटात घेणारी ती क्षमेची मूर्ति असते...जगण्याची स्फुर्ति असते...संस्काराची शिदोरी असते...सरतही नाही आणि उरतही नाही अशी मायेची ऊब असते...आई खरचं काय असते ?

शेवटी आई आपल्या रक्तातच असते...कवीच्या शब्दात असते...गझलेच्या मतल्यात असते...फुलांच्या सुगंधात असते... वात्सल्य,प्रेम,ममता,माया,आणी करुणेनं भरलेलं व्यक्तीमत्व म्हणजे आई असते...आपल्या लहान पणा पासून आपल्यावर डोळे झाकून प्रेम करणारी फक्त आईच असते.खरच,आई फक्त आईच असते...तीची जागा कुणीच घेऊ शकत नाही!

# शिक्षणदृष्टी पेरणारे पुस्तक -ऐसपैस शिक्षण

आधुनिक केसरी

**वर्तमानात शिक्षण हा समाजातील प्रत्येकाचाच जीव्हाळ्याचा विषय बनत चालला आहे. आपल्या समाजात आणि समाज माध्यमात अलिकडे शिक्षणासंबंधनाने सातत्याने चर्चा होते असते. पालकही शिक्षणांच्या गुणवत्तेबददल गंभीरपणे बोलू लागली आहेत. शिक्षणाची गुणवत्ता म्हणजे नेमके काय ? मुलांने मिळणारे मार्क म्हणजे गुणवत्ता की,मुलांच्या समग्र विकासाचा मार्ग म्हणजे गुणवत्ता याचा विचार करण्याची गरज वारंवार व्यक्त होते आहे. शिक्षणा संदर्भाने समाजात जनजागृतीचे कार्यक्रम होता आहेत. त्यासाठी काही लोक आणि सामाजिक संघटना प्रयत्न करता आहेत. त्याचवेळी वर्तमानपत्रात शिक्षणावर अधिक काही लिहून येते आहे. अलिकडे वर्तमानपत्रात शिक्षण विषयीच्या बातम्या, शिक्षणासंबंधीचे विविध सदरे, विश्लेषन,संपादकीय लेख मोठया प्रमाणात प्रकाशित होता आहेत.**

. वर्तमान पत्रे,नियतकालिकांमधील शिक्षणाचे वाढते स्थान आनंददायी आहे. या माध्यमातून लोकांचे शहाणपण उंचावण्याचा प्रयत्न कौतूकास्पद म्हणायला हवा.माध्यमातून शिक्षणाचा विचार समाजापर्यंत पोहचत असल्याने समाजमनात शिक्षणाविषयी आत्मियता आणि जिज्ञासा देखील उंचावत आहे.

शिक्षण हा समाजमनाचा जिव्हाळ्याचा विषय बनत चालला आहे. शिक्षण हे पालकांना आपले भविष्य वाटू लागले आहे. आपल्या पाल्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे म्हणून शिक्षणासाठी लोक पैसे मोजू लागले आहे. पालक आज खर्च करत आहे पण , तो खर्च म्हणजे ती भविष्याची गुंतवणूक आहे अशी त्यांची धारणा बनत चालली आहे. एका अर्थाने शिक्षणाचा विचार व्यापक होऊ लागला आहे. जागतिकीकरण,उदारीकरण,मुक्त अर्थव्यवस्थेनंतर शिक्षणाबददलच्या विचार प्रक्रियेतही बदल होताना दिसत आहे. शिक्षणाचा विचार आणि तेथील स्पर्धा देखील जागतिक बनत चालली आहे. त्यामुळे शिक्षणात अध्ययन,अध्यापन,मूल्यमापन गुणवत्ता,आंतरक्रिया, अभ्यासक्रम,मूल्य,जीवन कौशल्य यांचाही विचार गंभीरपणे केला जात आहे. एका अर्थाने शिक्षण हा सर्वांसाठी चिंतनाचा विषय आहे त्याचप्रमाणे चिंतेचा देखील विषय बनत आहे. जगभरात शिक्षणासंदर्भाने होणारे संशोधने , बुध्दीशास्त्रातील संशोधने यामुळे देखील शिक्षण प्रक्रियेत परिवर्तन अपेक्षित आहे. नव्या बदलांचा वेध घेण्याची गरज सातत्याने व्यक्त होत असताना प्रक्रियेकडे पाहण्याचा दृष्टीकोनातील बदलही महत्वाचा आहे. त्यामुळे नवे बदल लक्षात घेऊन प्रक्रियेत देखील बदल होता आहेत. त्याचा परिणाम म्हणून सरकारी धोरणातील बदलही अपरिहार्य आहे. त्या बदलाच्या संदर्भाने समाजमनात जागृती महत्वाची आहे. अनेकदा शिक्षणाबददल समाज माध्यमात सरकारी धोरण,शासन निर्णय याबददल चर्चा होत असतेच . शिक्षणावरील चर्चेत नेहमीच व्यापक दृष्टीकोन असेल असे नाही. अनेकदा ती चर्चा खूपच वरवरची असू शकते. शिक्षणाचा पारंपारिक दृष्टीकोनही समाज मनात अधिक खोलवर रूजलेला आहे.जुने तेच सोने ही धारणा अजूनही पक्कीच आहे. अशावेळी त्या दृष्टीकोनाला छेद देण्याची गरज आहे.

शिक्षण प्रक्रियेत होणारे बदल,शिक्षणात झालेली संशोधने,शिक्षणासंबंधाने वेळोवेळी येणारे विविध अहवाल, विविध क्षेत्रातील बदल लक्षात घेऊन येणारे शासन निर्णय लक्षात घेतले की, त्या संदर्भान अधिक चर्चा होते. वर्तमान पत्रातही त्या संदर्भाने अनेक मते,विचार प्रवाहाचे दर्शन घडते. शिक्षण हे बालकांच्या व्यक्तीमत्वाचे विकासाचे साधन आहे. शिक्षणातून आपण जी पेरणी करत असतो त्या पेरणीतून समाज परिवर्तन होत असते. त्यामुळे शिक्षणबाबत अधिक व्यापक विचार करण्याची गरज असते.शिक्षण हे केवळ लिहिणे वाचने आणि गणन करणे एवढ्या पुरते मर्यादित अर्थाने समजावून चालत नाही.त्याचा व्यापकतेने विचार होण्याची गरज असते. अशावेळी शिक्षणा संदर्भाने श्री.संदीप वाकचौरे यांनी केलेले लेखन वाचकांना शिक्षणात दडलेला व्यापक अर्थ उलगडून दाखविण्यास मदत करत असते. वाकचौरे हे शिक्षण क्षेत्रात कार्यरत असल्याने ते अधिक सखोल आणि नेमकेपणाने मांडणी करतात. त्यांचे वर्तमानपत्रातील लेखन हे वाचकांना एखादा विषय सखोलपणे समजून घेण्यास मदत करणारे ठरते.शिक्षण हे एकांगी स्वरूपात समजून न घेता त्याचा विविध अंगी विचार करण्याची गरज असते.त्या अर्थाने शिक्षणाचा विचार करणारे अनेक लेख ' ऐसपैस शिक्षण ' या पुस्तकात समाविष्ट आहे.त्यामुळे शिक्षणाचा व्यापक दृष्टीकोन जाणून घेण्यास वाचकांना मदत होणार आहे. शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले तरच तो आलेख उंचावणे शक्य आहे.त्यादृष्टीने प्रयत्न करण्यासाठीचा विचार वाकचौरे यांनी अनेक लेखात मांडला आहे.




शिक्षण विषयक जाणीव आणि चिंतन आपल्या समाजात सखोल स्वरूपात होताना दिसत नाही. शिक्षणा संदर्भाने विविध अंगी विचार करण्याची गरज असते.शिक्षकांची आणि शिक्षणांची गुणवत्ता,शिक्षण विषय दृष्टीकोन, विविध सामाजिक संस्थांचे प्रकाशित होणारे अहवाल त्यातील महत्वाचे काय आहे , त्याच बरोबर त्या अहवालाकडे नेमके कशाप्रकारे पाहण्याची गरज आहे यासंदर्भाने वाचकांना दृष्टी देण्याचा प्रयत्न अनेक लेखात झाला आहे. शिक्षणात जसे चांगले घडते आहे त्याचे कौतूक होते आहे. वाईट काही घडत असेल तर त्यासंदर्भान देखील जागृती करण्याचे कामही त्यांच्या लेखनातून घडते आहे. शिक्षण प्रक्रियेत अपेक्षित बदल सुचविण्याचा प्रयत्न करताना दिशादर्शन घडते आहे. त्याप्रमाणे त्याचे अपेक्षित परिणामही ते दर्शित करतात आणि गरज असेल तर योग्य ते उपाय सूचवताना दिसतात. शालेय शिक्षण प्रक्रियेत शालेय परीक्षांच्या माध्यमातून आपण काय करण्याची गरज आहे. त्याच बरोबर परीक्षां म्हणजे केवळ मार्क नाही तर त्या प्रक्रियेकडे मुलांचे शिकणे म्हणून पाहण्याची गरज आहे.मुलांचे शिकणे परिणामकारक होण्यासाठी मूल्यमापनाचा विचार आहे पण , तो विचारच आज हरवत चालल्याचे लेखांतून अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे.त्याकडे कोणत्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे या विषयीची भूमिका आपल्याला अनेक लेखांमध्ये वाचण्यास मिळते.

संदीप वाकचौरे हे सातत्याने राज्य स्तरावर विविध प्रशिक्षणाच्या संदर्भाने साहित्य निर्मिती आणि विकसन प्रक्रियेबरोबर तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून भूमिका बजावत आहेत. त्याचवेळी गावं पातळीवर देखील प्रत्यक्ष काम करत असल्याने दोन्हीमधील समन्वयाची मांडणी त्यांच्या एकूण लेखनात प्रतिबिबींत झालेली वाचकांना अनुभवास येते. त्यांच्या लेखनात कोठेही केवळ आदर्शवादी भूमिका नाही.जेथे जेथे जे उपाय करणे शक्य आहे तेच त्यांनी अधोरेखित केले आहे. मात्र संपूर्ण लेखनात कोठेही शिक्षणाचा मूळ विचार आणि गाभा सुटत नसल्याने वाचकांना पुस्तक विचार करण्यास प्रेरीत करते.लेखक वाचकांपर्यंत शिक्षणाचा योग्य विचार पोहचविण्यासाठी प्रयत्न करत आहे. तोच विचाराचा दृष्टीकोन निर्माण करण्यात हे पुस्तक यशस्वी होईल अशी खात्री वाटते.

# मागण्या मंजूर करून घेतल्याबद्दल डोईफोडे यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे यांनी अनेक वर्षांपासून प्रलंबित मागण्या मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या समोर प्रभावीपणे मांडल्या. तर जेष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनीही पूर्वीच्या काही मुख्यमंत्र्यांनी काही मिनिटात निर्णय घेण्याची आठवण देत पत्रकारांच्या मागण्यांकडे लक्ष्य वेधून घेतले.त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे यांनी बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेत, ११ हजार वरून थेट २० हजार रुपयांपर्यंत वाढ केली. तर अधिस्वीकृती समित्या स्थापन करण्यास मान्यता दिली .तर पत्रकारांच्या इतर मागण्याही मंजूर करण्याची जाहिर घोषणा केली. त्याबद्दल मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे यांचे शाल आणि पुष्पगुच्छ देऊन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, (मुंबई) प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी अभिनंदन केले. यावेळी जेष्ठ पत्रकार चंदन शिरवळे, नितीन सावंत, कमलाकर वाणी आदी उपस्थित होते.

मुंबईत मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर संघाच्या विविध पुरस्कारांचे वितरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. पुरस्कार वितरणाच्या निमित्ताने पत्रकार संघाच्या व्यासपीठावर आलेल्या मुख्यमंत्र्यांसमोर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे यांनी पत्रकारांच्या प्रलंबित मागण्या अत्यंत प्रभावीपणे आणि मोजक्या शब्दात मांडल्या तर ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी अधिकारावानिने पत्रकारांच्या प्रश्नांकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले. परिणामी मुख्यमंत्र्यांनी काही मिनिटात पत्रकारांच्या प्रमुख मागण्या मंजूर केल्या. यामुळे महाराष्ट्रातील पत्रकारांनकडून प्रमोद डोईफोडे व त्यांच्या सहकाऱ्यांबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे. वर्षानुवर्ष अनेक पत्रकार व संघटना विविध माध्यमातून मागण्या करत असले तरी सरकार फारशी गांभीर्याने लक्ष देत नव्हते. मात्र डोईफोडे यांनी अत्यंत चाणाक्षपणे पत्रकारांच्या मागण्या मांडून सोडवून घेतल्या त्याबद्दल त्यांचा राज्यातील पत्रकारांच्या वतीने कृज्ञता व्यक्त करत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाकडून सत्कार करण्यात आला.






# स्टार्टअप संस्कृतीला प्राधान्य द्यावे : विखे पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** नव्या शैक्षणिक धोरणात नवकल्पना, स्टार्टअप संस्कृती, कौशल्य विकास यावर भर देण्यात आला आहे. ज्ञानदानाची ११४ वर्षांची जाज्वल्य परंपरा असलेल्या पुणे विद्यार्थी गृहाने नव्या गोष्टी राबविण्याला, तसेच कार्यक्षम, कृतिशील व कार्यकुशल पिढी घडवण्याला प्राधान्य द्यावे," असे प्रतिपादन राज्याचे महसूलमंत्री व पुणे विद्यार्थी गृहाच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. पुणे विद्यार्थी गृहाच्या ११४ व्या वर्धापन दिनानिमित्त, तसेच संस्थेच्या महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या शताब्दी पूर्ती निमित्त स्मरणिका प्रकाशन सोहळ्यात विखे पाटील बोलत होते. संस्थेचे ज्येष्ठ माजी विद्यार्थी श्रीधर पाटणकर अध्यक्षस्थानी होते. प्रसंगी नियामक मंडळाच्या पौर्णिमा लिखिते, पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष सुनील रेडेकर, उपकार्याध्यक्ष सुभाष जिर्गे, कार्यवाह प्रा. डॉ. राजेंद्र कांबळे, कोषाध्यक्ष आनंद कुलकर्णी, कुलसचिव अमोल जोशी, संचालक संजय गुंजाळ, कृष्णाजी कुलकर्णी, राजेंद्र बोऱ्हाडे, राजेंद्र कडुस्कर, रमेश कुलकर्णी यांच्यासह सल्लागार व कार्यकारी मंडळाचे सदस्य, माजी विद्यार्थी, देणगीदार, हितचिंतनक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आदी उपस्थित होते. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, "सामाजिक बांधीलकीच्या भावनेतून स्थापन झालेल्या पुणे विद्यार्थी गृहाच्या वाटचालीत अनेक दानशूरांचे योगदान, अनेकांचा त्याग यामुळे गरीब मुलांच्या शिक्षणासाठी गेली ११४ वर्षे हा ज्ञानयज्ञ तेवत राहिला आहे. संस्थेने अनेकांना घडवले आहे. मूलभूत ध्येयापासून विचलित न होता कालानुरूप बदल करत संस्थेने प्रगतीचे अनेक टप्पे गाठले, ही समाधानाची बाब आहे." सुनील रेडेकर यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेताना सांगितले की, संस्थेच्या सर्व विभागाची कामगिरी उल्लेखनीय होत आहे. अभियांत्रिकी, मुद्रण महाविद्यालयात विद्यार्थ्यांकडून अनेक तंत्राविष्कार पाहायला मिळत आहे. नुकत्याच नवी दिल्ली येथे झालेल्या शैक्षणिक प्रदर्शनात संस्थेला गौरविण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या शताब्दी पूर्तीनिमित्त स्मरणिकेचे प्रकाशन झाले. यामध्ये विद्यालयाच्या शंभर वर्षाच्या वाटचालीचा आढावा घेण्यात आला आहे. तसेच संस्थेच्या विविध विभागात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पाटील यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सकाळी संस्थेच्या आवारातील धनुर्धारी श्रीराम मंदिरात रेडेकर यांच्या हस्ते शास्त्रोक्त पूजा झाली. श्रीधर पाटणकर यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. प्रा. माणिक जोशी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. राजेंद्र कांबळे यांनी आभार मानले.

# वैजापुरात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखानाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** राज्यातील कामगार, मजुर, नौकर, हमाल, कामकरी याना त्यांच्या फावल्या वेळे समयी आरोग्य सेवा मोफत तपासणी, मोफत उपचार, मोफतऔषधी ऊपलब्ध व्हावी म्हणून महाराष्ट्र सरकारने अशा लोक. राहत असलेल्या झोपडपट्टी किंवा वाडीवस्ती कामगार वस्ती अशा ठिकाणी हिन्दु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे"आपला दवाखाना" सुरु करुन रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा" असे जे धोरण आखले ते अभिनंदनीय आहे, असे वक्तव्य आ,प्रा,रमेश पा,बोरनारे यानी शनिवार( ता,१३ )रोजी मोढा मार्केट वस्तीत शासनाच्या सार्वजनीक आरोग्य विभाग मार्फत हिन्दु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे,आपला दवाखाना उदघाटन प्रसंगी काढले,मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आता पर्यंत ६०कोटी रुपये मा,मुख्यमंत्री ना,एकनाथरावजी शिंदे नी रुग्णांना दिल्याचा उल्लेख करुन हे सरकार गोर गरीब,दीन दुबळ्याना सहाय करण्यास सदैव तयार असल्याचे ते बोलले,आधी फीत सोडून व धन्वंतरी पूजन झाले,प्रास्ताविक तालुका आरोग्य अधिकारी डॉ,गुरुनाथ इंदुरकर यानी केले,आभार व सत्र संचलन माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यानी केले. या प्रसंगी मावळते उपनगरध्यक्ष साबेरखान, पं,स,माजी सभापती बाबासाहेब जगताप, शिवसेना तालुका प्रमूख राजेंद्र पा,साळुंके, शिवसेना शहर प्रमूख पारस घाटे,भाजपा शहर प्रमूख दिनेश राजपूत,सुलभा भोपले, नगरसेवक स्वप्निल जेजुरकर,इम्रान करशी, गणेश खैरे, कृषी समिती संचालप्र आप्पासहेब पाटील,गणेश इंगळे प्रशांत त्रिभुवन, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ,सुधाकर सोनवने,गट विकास अधिकारी एच,आर,बोय -नार,शिवा थोरात,तसेच या रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ,अंजली राहण ,शिवनाथ राहणे,सहायक जोत्स्ना भगुरे,शुभम राजपूत,मोती वाघ,विशाल त्रिभुवन,कमलेश आंबेकर,यांची उपस्थिति होते या परिसरातील नागरिकांनी या आरोग्य सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ इंदुलकर यांनी केले आहे.



# राज्यात उष्णतेची लाट येणार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राज्यात हवामान बदलाच्या पर्वाला सुरुवात झाली आहे. अवकाळी पावसाने माघार घेतली असून सुर्यनारायणाने तेवढ्याच दमदारपणे पावले टाकण्यास सुरवात केली आहे. तापमान वाढीचा पारा राज्यात झपाट्याने वर जात असून ४४ अंश सेल्सिअसचा टप्पा त्याने पार केला आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार राज्यात पुढील चार दिवस उष्णतेची लाट कायम असणार आहे. दिवसागणिक उन्हाची तीव्रता वाढणार असून उन्हाच्या झळा मात्र नागरिकांना सोसाव्या लागणार आहेत.

या आठवड्याची अखेर व पुढील आठवड्याची सुरुवात उष्णतेच्या लाटेसह होणार आहे. शुक्रवारी अकोल्यातील तापमानाने ४४ अंश सेल्सिअसचा टप्पा पार केला होता. तर इतर शहरात देखील तापमान ४१ अंश सेल्सिअसपेक्षा अधिक होते. विदर्भाला या तापमानाची सवय असली तरीही मुंबई, पुणे या शहरांमध्ये अलीकडच्या कालावधीत तापमान वाढ होऊ लागली आहे. मुंबईसह कोकण आणि मध्य महाराष्ट्रामध्ये उन्हाचा तडाखा वाढण्याचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. राज्यातील आरोग्य यंत्रणांनी देखील नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला असून काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.



# मोलगापुडी तवा इडली

लय भारी सुगरण



सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.
संपर्क क्र. 9503434424

आधुनिक केसरी



**साहित्य :** मोलगापुडी मसाला बनवण्याचे साहित्य :1 वाटी हरभरा डाळ, अर्धी वाटी उडीद डाळ, पाव वाटी तीळ, 17..18 बेडगी मिरच्या, पाव चमचा हळद अर्ध चमचा मेथ्या , 1 चमचा हिंग, अर्धा चमचा मिरे,1 चमचा जिरे, 1 वाटी कढिपत्ता पाने, 1 चमचा साखर, 1 चमचा मीठ.

**इन्स्टन्ट इडली बनवण्याचे साहित्य :** 1 वाटी तांदूळ पीठ, अर्धी वाटी उडीद डाळ पीठ, पाव वाटी पोहे, अर्धी वाटी दही ,1 वाटी पाणी, 2 चमचे इनो पावडर

**भाजी साहित्य :** 1 वाटी मध्यम चिरलेला कांदा, 1 वाटी सिमला मिरची ,अर्धी वाटी टोमॅटो, आवडत असतील तर थोडे कॉर्न किंवा मटार, अर्धा चमचा आले लसूण पेस्ट, तेल, बटर

**कृती :** मोलगापुडी मसाला बनवण्यासाठी प्रथम दोन्ही डाळी खमंग भाजून तीळ भाजावेत. मग जिरे व मिरे भाजून अर्धा चमचा तेल घालून त्यात मेथ्या गुलाबी रंगावर तळून त्यातच हिंग परतावा. ते काढुन कढिपत्ता कुरकुरीत होईपर्यंत गरम करून काढावा . मग 1 चमचा तेल घालून मिरच्या कुरकुरीत होईपर्यंत परतून घ्याव्यात. हा सर्व मसाला एकदम मंद आचेवर करावा म्हणजे छान टेस्टी होतो . मग सर्व मसाला, मीठ व साखर घालून मिक्सर मधून छान पावडर करून ठेवावा. खूप महीने हा छान राहतो. इन्स्टंट इडली बॅटर बनवण्यासाठी 1 वाटी तांदूळ पीठ, अर्धीवाटी उडीद डाळ पीठ ,पाव वाटी पोहे पीठ मोठ्या बाउलमध्ये एकत्र करून त्यात अर्धी वाटी दही, चवीनुसार मीठ घालून पाणी घालून बॅटर तयार करून 5 ते 10 मिनिटे झाकून ठेवावे. कढईत 2 चमचे तेल घालून त्यात कांदा गुलाबी रंगावर परतून आले लसुण पेस्ट घालुन सिमला मिरची ,कॉर्न घालून परतून टोमॅटो घालून छान परतावा. मग त्यात 2 चमचे मोलगापुडी मसाला व मीठ घालून छान परतून खमंग भाजी बनवून घ्यावी. गॅस वर तवा गरम करून थोडे तेल लावून बटर घालावे .मग त्यात 2 चमचे भाजी घालून थोडी पसरून इडलीच्या बॅटर मध्ये इनो घालून त्यावर 1 चमचा पाणी घालून छान फेटून त्यातील डावभर पीठ तव्यावरच्या भाजीवर घालून त्यावर झाकण ठेवावे. मंद आचेवर 2..3 मिनिटे ठेवून झाकण काढून इडली फुगून रंग बदललेला दिसला की त्यावर बटर सोडून उलथण्याने उलटून दुसऱ्या बाजूनेही छान भाजून सर्व्हिंग डिशमध्ये काढून सर्व्ह करावी.

**वैशिष्ट्य :** ही आगळी वेगळी डिश खमंग व चटपटीत असल्यामुळे सर्वांना नक्कीच आवडेल. आवडत असेल तर शेवटी चीझ किसून घातले तर खूपच टेस्टी लागते.



# घटनांद्रा येथे ढेपले महाराजांचे कीर्तन

आधुनिक केसरी न्यूज

**घाटनांद्रा :** आज वैकुंठवासी गहेनाजीबाबा गवरे घाटनांद्रा तालुका सिल्लोड जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांच्या ऊत्तरकार्यानिमित्त म्हणजे तेरवीनिमत्त हरी भक्त पारायण कैलासजी महाराज ढेपले पाथ्रीकर तालुका फुलंब्री जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांची किर्तन सेवा झाली. प्रमुख उपस्थिती हभप संगितविषारद परमेश्वर महाराज जावळे आडगाव पैठण नामदेव महाराज आगळे पैठणकर मृदंगाचार्य गौरव महाराज मोकाशे पिशोर समस्त ग्रामस्थ पंचक्रोशीतील भजनी मंडळी सर्व प्रमुख पाहुणे मंडळी उपस्थित होती.

# ॲम्बिशन इंग्लिश स्कूलमध्ये लोकशाहीचा जागर

आधुनिक केसरी न्यूज

**सातारा :** आदर्की बुद्रुक येथील ॲम्बिशन इंग्लिश मिडीअम स्कूलला सुशिल गायकवाड यांनी सदिच्छा भेट दिल्यानंतर शाळेस अस्लम बागवान यांची लोकशाहीचा जागर नावाची पुस्तके भेट देण्यात आली. यावेळी शाळेचे क्रीडा शिक्षक हणमंत काकडे, उपशिक्षक गणेश भोसले व शिक्षकेत्तर कर्मचारी लिपिक राजेंद्र कुचेकर, कनिष्ठ लिपिक पवार मॅडम, सर्व महिला कर्मचारी मंदा शेंडगे, शोभा बोडके, ज्योती मिसाळ, सुप्रिया काकडे, उज्वला कुचेकर आदी उपस्थित होते. यावेळी सुशिल गायकवाड यांनी संविधान संवाद साधला.संविधान आहे म्हणून आपण सर्व जण आहोत.हे संविधान लोकांपर्यंत घेऊन जाण्याची जबाबदारी सुद्धा प्रत्येकाची असल्याची सुशिल गायकवाड यांनी म्हटले. यावेळी उपशिक्षक गणेश भोसले यांनी सुशिल गायकवाड यांच्या संविधान विषयक कार्याबद्दल थोडक्यात माहिती सांगितली. "लोकशाहीचा जागर"हे पुस्तक पुणे ( कोंढवा ) येथील संविधान अभ्यासक असलेले अस्लम इसाक बागवान यांचे असून पुस्तकातील शब्दांकन करण्याचे काम प्रा.मोनेश सुपेकर यांनी केलेले आहे.संविधानाच्या जनजागृतीच्या दृष्टीने अस्लम बागवान यांचे कार्य सुरू असून लोकांपर्यंत हे संविधान पोहचले पाहिजे म्हणून त्यांची तळमळ आहे.त्यामुळे त्यांनी लोकशाहीचा जागर नावाच्या पुस्तकास पुढे आणले आहे.तरडगाव ता.फलटण येथील सुशिल गायकवाड यांच्या कडून हे पुस्तक लोकांपर्यंत घेऊन जाण्याचा प्रयत्न केला जात आहे. ॲम्बिशन इंग्लिश मिडीअम स्कूलला भेट देत असताना लोकशाहीचा जागर नावाचे पुस्तक दिल्याने समाधान वाटत असल्याची प्रतिक्रिया सुशिल गायकवाड यांनी दिली.संविधान जनजागृती साठी संविधानाच्या संबंधित विशेष उपक्रम हाती घेण्याची गरज असून हे पुस्तके विविध संस्था व व्यक्ती यांच्या पर्यंत पोहचविण्याची जबाबदारी सुद्धा आपल्या सर्वांची आहे.हीच जबाबदारी ओळखून हे संविधानाचे कार्य महत्त्वाचे असल्याचे गणेश भोसले यांनी म्हटले.शाळेचे शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याशी संवाद साधत असताना हे पुस्तक वाचून लोकशाहीचा जागर करण्याचा प्रयत्न केला जाईल.

# सत्यशोधकी नवदांपत्यास भारतीय संविधानाची प्रत भेट

आधुनिक केसरी न्यूज



**नांदेड :** ढाकणी, ता. लोहा येथील सुप्रिया संजय गायकवाड व खांडेगाव, ता. वसमत येथील गंगेश्वर दत्ता बापुले यांचा सत्यशोधक विवाह आज दि.१२ मे २०२३ रोजी संपन्न झाला. यावेळी विवाहीत सत्यशोधकी नवदांम्पत्यास सामाजिक कार्यकर्ते निवृत्ती गायकवाड यांनी त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून 'भारतीय संविधान' भेट देऊन एक नवा पायंडा पाडला. यावेळी लोकस्वराज्य आंदोलन युवक आघाडीचे जिल्हाध्यक्ष अंकुशदादा गायकवाड,गोपाळ वाघमारे यांच्यासह सत्यशोधक चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या

स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
- मासिक पाळी अनियमित असणे
- हॉर्मोन्स चे असंतुलन
- मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
- PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
- मासिक पाळी बंद होणे
- वारंवार गर्भपात होणे
- श्वेत प्रदर (पांढरे जाणे)

पुरूषांना होणाऱ्या समस्या
- शुक्राणु कमी असणे
- शुक्राणुची गती कमी असणे
- शुक्राणु स्खलन
- स्वप्न दोष
- सेक्स इच्छा कमी होणे इ.

फीस - 300 रू.

संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्सलटींग उपलब्ध

पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर